
# माणूस

शनिवार । २१ मे १९७७
७५ पैसे



साहित्य संमेलनाचे
अध्यक्षपद....
काळाचा
संदर्भ
विशेष
अनुकूल
कोणाला आहे ?
लेखनस्वातंत्र्याच्या
दिंडीतील एक
वारकरी....
श्री. प्रभाकर पाध्ये

# साप्ताहिक माणूस

वर्ष सोळा–अंक एक्कावन्नावा

२१ मे १९७७

मूल्य पंचाहत्तर पैसे



संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
◻
वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये
◻


प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.


◻
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.
◻
साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०
◻
दूरध्वनी : ४३४५९


सर्व मराठी रसिकांना, पुणे, १० मे १९७७

सप्रेम नमस्कार,

यंदाचे साहित्य–संमेलन पुणे मुक्कामी होत आहे हे आपणाला माहीत आहेच. या संमेलनाच्या अध्यक्षपदासाठी ख्यातनाम साहित्यिक प्रा. गंगाधर गाडगीळ यांचे नाव आम्ही सुचवीत आहोत. यासाठी आम्हाला आपलाही पुरस्कार हवा आहे.

प्रा. गाडगीळांच्या वाङमयीन कर्तृत्वाबद्दल आम्ही आपणास वेगळे सांगावे असे नाही. विशेषत: मराठीचे पहिले नवकथाकार म्हणून त्यांची कामगिरी अव्वल दर्जाची व अमोल आहे. त्यांनी मराठी कथेला नवे रूप दिले एवढेच नव्हे, तर तिला आत्माही दिला. महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार यांनी ' मराठी कथेचे प्रधान–पुरुष ' या उचित शब्दांत त्यांचा गौरव केला आहे.

कथेप्रमाणेच विनोद, प्रवास–वर्णन, कादंबरी, नाट्य व विशेषत: समीक्षा या क्षेत्रांतही गाडगीळांनी बहुमोल लेखन केले आहे. साहित्यिक व वाङमयीन विषयांवरील ते एक अधिकारी व नावाजलेले वक्ते व रसिक आहेत.

गाडगीळांच्या साहित्यिक कर्तृत्वाची जाण ठेवून येत्या साहित्य–संमेलनाच्या अध्यक्षपदाचा मान त्यांना आपण सर्वांनी द्यावा असे आम्हाला फार वाटते. शिवशाहीर श्रीमान बाबासाहेब पुरंदरे आपल्या पत्रात म्हणतात, ' राजश्री गंगाधरराव गाडगीळ साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झाले तर, मला मनापासून आनंद होईल. त्यांची साहित्य–सेवाही फार मोठी आहे. राजश्री गंगाधरराव गाडगीळांना सन्मानपूर्वक अध्यक्षपद देण्यात यावे ही माझीही मनापासून इच्छा आहे. माझा हार्दिक पाठिंबा आहे. पण राजश्री गंगाधररावांची एकमताने किंवा बिनविरोध निवड व्हावी हाच त्यांचा खरा सन्मान आहे. हे घडो. '

या अगोदरही प्रा. गंगाधर गाडगीळांचे नाव अध्यक्षपदासाठी सुचविले गेले होते. पण ज्येष्ठत्वाचा मान राखण्यासाठी त्यांनी ते मागे घेतले होते. हे लक्षात घेऊन जो बहुमान गाडगीळांना केव्हाच मिळायला हवा होता, असे कविवर्य विंदा करंदीकर म्हणतात, तो मान आपण त्यांना आता एकमताने द्यावा अशी आम्ही आपणास नम्र विनंती करीत आहोत. आपण मोठ्या संख्येने स्वागत–समितीचे सभासद व्हावे व हे साहित्य संमेलन यशस्वी करावे, ही विनंती.

आपले

व्यंकटेश माडगूळकर
शंकरराव खरात
मंगेश पाडगावकर
शंकर पाटील
डॉ. ना. गो. कालेलकर
डॉ. स. गं. मालशे
उद्धव शेळके
प्राचार्य सदाशिव आठवले
दत्त रघुनाथ कवठेकर
राजा मंगळवेढेकर
प्रभाकर तामणे.
डॉ. आनंद नाडकर्णी
रमेश तेंडुलकर
शि. द. फडणीस
सौ. शकुंतला फडणीस
माधव कानिटकर
डॉ. सुभाष भेंडे
श्री. दा. पानवलकर
कमल देसाई
शिरीष पै.
डॉ. भीमराव कुलकर्णी
रत्नाकर मतकरी
महादेवशास्त्री जोशी.
विंदा करंदीकर
बाबासाहेब पुरंदरे
दि. बा. मोकाशी
माधव मनोहर
वसंत कानेटकर
य. दि. फडके
मु. शं. किर्लोस्कर
श्रीमती इंदिरा संत
वसंत सबनीस
चंद्रकांत काकोडकर
राजेंद्र बनहट्टी
प्राचार्य बाळ गाडगीळ.
मंगेश पदकी
सौ. सरिता पदकी
प्रा. के. ज. पुरोहित ( शांताराम )
मधुकर केचे
बाबा पाटील
अनील रानडे
डॉ. गं. ना. जोगळेकर
वि. शं. पारगावकर
प्रा. गंगाधर पानतावणे

# रा. प्रभाकरपंत पाध्ये यांचे अगत्य असो द्यावे ही विनंती.

जयप्रकाशांच्या बिहारमधील भ्रष्टाचार-विरोधी आंदोलनाला पाठिंबा व्यक्त करण्यासाठी १ ऑगस्ट १९७४ या दिवशी शनवारवाड्यासमोर सामुदायिक उपोषणाचा एक वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रम झाल्याचे पुणेकर नागरिकांना आठवत असेलच. विविध राजकीय पक्षांचे कार्यकर्ते, अपक्ष नागरिक, युवक संघटनांचे प्रमुख, निवडक विचारवंत मिळून सुमारे पाचशे व्यक्तींनी या उपक्रमात भाग घेतला होता. सकाळी मोर्चा, दिवसभर गटशः चर्चा व सायंकाळी सभा अशी या उपक्रमाची आखणी होती. या उपक्रमातूनच पुढे पुण्यातील ग्राहक चळवळीला चालना मिळाली व ग्रामीण भागात कार्य करण्याचा निर्णयही काही युवक संघटनांनी घेतला. जयप्रकाशांच्या चळवळीला महाराष्ट्रातून तरी त्यापूर्वी असा भरीव व कृतीशील पाठिंबा लाभलेला नव्हता. या घटनेनंतर इतर ठिकाणीही असे छोटेमोठे उपक्रम हाती घेतले गेले व भ्रष्टाचारविरोधी चळवळीचे लोण हळूहळू महाराष्ट्रातही पोचू लागले. शनवाड्यासमोरील १ ऑगस्टच्या कार्यक्रमात सर्वांनी सहभागी व्हावे म्हणून सुरुवातीला जे 'आवाहन' प्रसिद्ध करण्यात आले ते असे होते–

## आवाहन

'जयप्रकाशांनी सुरू केलेल्या भ्रष्टाचार-विरोधी आंदोलनाला साथ देण्यासाठी अनेक व्यक्ती, संस्था, संघटना, पक्ष पुढे येत आहेत. या आंदोलनामुळे भ्रष्टाचार नष्ट होईल, अशी ग्वाही जरी कुणी देऊ शकत नसले, तरी भ्रष्टाचार हा एक शिष्टाचार होण्याची प्रवृत्ती काही प्रमाणात रोखली जाईल, देशभर भ्रष्टाचारविरोधी एक वातावरण तयार होईल, याविषयी दुमत होण्याचे कारण नाही. आपल्याकडील परिस्थितीला साजेसा हा एक लोकशाही शुद्धिकरणाचा प्रयोग आहे असेही म्हणता येईल. यादृष्टीने या आंदोलनाला महाराष्ट्रातूनही साथसंगत लाभावी, पाठिंबा मिळावा असे आम्हाला वाटते. आत्तापर्यंत दोन–तीन सभांतून असा पाठिंबा व्यक्तही झालेला आहे. पुढचे पाऊल म्हणून आता एक युवक–नागरिक स्त्री–पुरुषांचा मोर्चा व त्याला जोडून चोवीस तासांचे एक लाक्षणिक उपोषण असा कार्यक्रम आम्ही लोकांसमोर ठेवीत आहोत. तूर्त १ ऑगस्ट १९७४ हा दिवस ठरलेला आहे. सर्वांनी हा कार्यक्रम उचलून धरावा व सद्यस्थितीविषयीचा आपला असंतोष परिणामकारक पण संयमपूर्णरीत्या व्यक्त करावा अशी विनंती आहे, असे आवाहन आहे.'

या आवाहनपत्रकावर 'निमंत्रक' म्हणून पहिली सही श्री. प्रभाकर पाध्ये यांची आहे. प्रकृती बरी नसतानाही मोर्चात व दिवसभरच्या उपोषण–चर्चा कार्यक्रमांत अगदी मन:पूर्वकतेने त्यांनी भाग घेतला होता, याचे महत्त्व त्यावेळीही अनेकांना जाणवल्याशिवाय राहिले नाही.

या घटनेचे–उपक्रमाचे–स्मरण आज करून देण्याची आवश्यकता अशासाठी की, लवकरच पुणे येथे भरणाऱ्या मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीचे वारे वाहू लागणार आहेत व त्यासाठी श्री. गंगाधर गाडगीळ, श्री. पु. भा. भावे यांच्या जोडीनेच श्री. प्रभाकर पाध्ये यांचेही नाव उमेदवार म्हणून पुढे आलेले आहे. जयप्रकाश आंदोलनाचा संदर्भ आगामी पुणे अधिवेशनाला अपरिहार्यपणे लाभलेला आहे. या आंदोलनाशी श्री. पाध्ये यांचे घनिष्ठ नाते आहे. अध्यक्षपदाची निवड करताना हे नाते ध्यानात घेणे यावेळी फार औचित्याचे ठरणार आहे. म्हणून केवळ १ ऑगस्ट १९७४ मधील उपक्रमाची व त्यातील श्री. पाध्ये यांच्या सहभागाची आठवण येथे करून दिलेली आहे.

तशी ही तिन्ही नावे आपापल्या परीने श्रेष्ठच आहेत. गंगाधर गाडगीळ यांची मराठी कथेच्या क्षेत्रातील मौलिक कामगिरी अढळ स्वरूपाची आहे. पु. भा. भावे यांनी वाङ्मयक्षेत्राप्रमाणेच पत्रकारितेचे क्षेत्रही पादाक्रांत केलेले आहे. त्यांची जाज्वल्य हिंदुत्वनिष्ठा अनेकांना स्फूर्तिप्रद ठरलेली आहे. कुणाला श्री. पाध्ये यांची प्रवासवर्णने, व्यक्तिचित्रणे महत्त्वाची वाटतील, कुणाला त्यांची कथा लक्षणीय वाटेल. पण सौंदर्यशास्त्राचे गाढे अभ्यासक व वाङ्मयसमीक्षक म्हणून श्री. पाध्ये यांचे स्थान तर साहित्यप्रांतात एकमुखाने मान्यता पावलेले आहे. व्यासंगी व वैचारिक पत्रकारिता आजकाल दुर्मिळ झालेली आहे. श्री. पाध्ये यांच्या पत्रकारितेचे हे एक वैशिष्टच होते. आपापल्या परीने ही तिन्ही नावे अशी मान्यताप्राप्त आहेत. त्या दृष्टीने निवड करणे ही खरोखरच अवघड व पेचात टाकणारी गोष्ट आहे. तरी पण काही वेळा काळाचा संदर्भ ध्यानात घेणे उचित ठरते, जसा तो गेल्या खेपेस कऱ्हाड साहित्य संमेलनाच्या वेळी श्रीमती दुर्गा भागवत यांच्याबाबतीत घेतला गेला. हा काळाचा संदर्भ आगामी पुणे अधिवेशनदृष्ट्या श्री. पाध्ये यांना सर्वांत जास्त अनुकूल आहे, यात मात्र काही दुमत होण्याचे कारण नाही. श्री. पाध्ये समाजवादी विचारांचे असले तरी, स्वातंत्र्यवादी दिंडीत प्रथमपासून रंगलेले आहेत व आणीबाणीच्या भयानक काळातही त्यांनी ही दिंडी सोडली नाही. दिंडीत राहून जमेल ती वाटचाल ते करीतच राहिले. स्वातंत्र्यप्रेरणेप्रमाणेच नैतिकतेची प्रेरणाही श्री. पाध्ये यांनी महत्त्वाची मानलेली आहे व त्यांच्या लेखनात या दोन्ही प्रेरणांचा आग्रह प्रकर्षाने व्यक्त झालेला दिसतो. या प्रेरणांची आज नितांत आवश्यकता आहे–साहित्यप्रांतातही आहे, हे बहुतेकांना मान्य होईल. यादृष्टीने अध्यक्षपदासाठी श्री. पाध्ये यांच्या नावाचा सर्वांनी विचार करणे औचित्याला फार धरून होणार आहे. सूज्ञास अधिक सांगणे नलगे. रा. प्रभाकरपंत पाध्ये यांचे अगत्य असो द्यावे ही विनंती.

**–श्री. ग. माजगावकर**

## सर्व सेवासंघ अधिवेशन

# विसर्जन टळले : पुढे काय?

माहितगार

सर्व सेवा संघाचे विसर्जन करावे अशी सूचना आचार्य विनोबा भावे यांनी केली होती. सर्व सेवा संघाचे कार्य संपलेले नाही, त्यामुळे संघाचे अस्तित्व कायम ठेवावे असा आग्रह जयप्रकाश नारायण यांनी धरलेला. मुंबईत ६, ७, ८ मे रोजी सर्व सेवा संघाचे अधिवेशन भरले होते. या अधिवेशनात संघ कायम ठेवायचा की मोडीत काढायचा यावर बराच खल झाला. त्यात पुन्हा एकदा विनोबावाद्यांचा पराभव झाला. आचार्य धर्माधिकारी आर. के. पाटील व श्रीमन्नारायण यांनी म. गांधींनी कॉंग्रेस विसर्जित करावी असा सल्ला दिला होता तसाच सल्ला विनोबांनी दिला आहे. विनोबांच्या सूचनेप्रमाणे संघ बरखास्त करावा यासाठी आग्रह धरला होता. प्रतिनिधींनी तो मानला नाही आणि जयप्रकाश नारायण यांच्या इच्छेप्रमाणे संघाचे काम पुढे चालवण्याचा निर्णय घेतला. जमलेले प्रतिनिधी विनोबांच्याविषयी अनादराने बोलत नव्हते हे खरे; पण त्यांच्याविषयी आदर बाळगूनही नव्हते. विनोबांचे नाव घेऊन एखाद्याने भाषण केले, की त्याला प्रतिसाद मिळत नव्हता. बहुसंख्य का, बहुतेक सगळेच प्रतिनिधी बाबांचे नाव टाळून बोलत. जयप्रकाश नारायण यांचा आवर्जून उल्लेख करत. आणीबाणीच्या काळात विनोबांनी जी भूमिका घेतली त्याविषयी प्रतिनिधींना तिरस्कार होता, हे त्यांच्या भाषणातून जाणवत होते. विनोबा भावे यांचे उजवे हात मानले जात असलेले नरेंद्र दुबे व निर्मला देशपांडे यांच्यावर उत्तर प्रदेश व बिहारमधील प्रतिनिधींनी त्यांची नावे घेऊन हल्ला केला, तर इतर काहींनी नावे न घेता आणीबाणीच्या काळात पोलिसांचे, सरकारचे खबरे म्हणून यांनी काम केले, आणीबाणीला विरोध करणाऱ्या सर्वोदयी व सर्व सेवा संघाच्या कार्यकर्त्यांना पकडून देण्याचे काम केले असे प्रतिनिधींना सांगितले. विनोबांच्या भूमिकेविषयी कार्यकर्त्यांना तिरस्कार का वाटतो, याचे हे कारण होते. या लोकांना विनोबांनी हटकले नाही. उलट आपले प्रतिनिधी म्हणून निर्मला देशपांडे व नरेंद्र दुबे यांना श्रीमती इंदिरा गांधींच्या भेटीसाठी विनोबा पाठवत होते.

**आणीबाणीच्या प्रश्नावर आचार्य विनोबा भावे व त्यांचे बंधू शिवाजी भावे यांच्यातही मतभेद होते. हुकूमशाही लादणाऱ्या पंतप्रधान म्हणून इंदिरा गांधींचे सरकार सत्तेवरून दूर गेलेच पाहिजे, आणीबाणीला विरोध केला पाहिजे हे मत शिवाजी भावे यांनी व्यक्त केले होते.**

जयप्रकाश नारायण यांना शिवाजी भावे यांचा पाठिंबा होता. शिवाजी भावे बोलत नाहीत. अतिशय कमी बोलतात. पण जेव्हा ते बोलले तेव्हा त्यांनी आपल्या बंधूला–विनोबांना–एकप्रकारे चापलेच असे म्हणावे लागेल. विनोबांच्या आश्रमात राहून खबऱ्याची कामगिरी पार पाडणारी निर्मला देशपांडे, नरेंद्र दुबे ही दुक्कल होती तशीच शिवाजी भावे यांच्यासारखीही भावाला ठणकावणारी मंडळी होती. प्रभाकर शर्मा यांच्यासारखी आणीबाणीच्या निषेधार्थ स्वत:ला जाळून घेणारे महापुरुषही होते. त्यामुळे पवनारचा महापुरुष कोण? विनोबा की प्रभाकर शर्मा? असा प्रश्न पडावा! शर्मा यांनी पोटदुखीला कंटाळून आत्महत्या केली, असे निर्लज्ज विधान महाराष्ट्र सरकारने विधान परिषदेत केले होते. शर्मा यांनी कशासाठी आत्मदाह केला, याची माहिती विनोबांना होती, आणि सरकारने काय कारण जाहीर केले, याचीही माहिती विनोबांच्या कानांवर गेली. पण धादांत असत्य सांगणाऱ्या सरकारला, सत्य अहिंसेचा पुरस्कार करणाऱ्या विनोबांनी पाठिंबा दिला होता. सर्व सेवा संघाच्या अधिवेशनाला आलेल्या प्रतिनिधींच्या मनात या आठवणी ताज्या होत्या. त्यामुळे विनोबाजींविषयीचे आदराचे शब्द त्यांच्या भाषणातून निघत नव्हते. (अनुदार उद्‌गारही कोणी काढले नाहीत!) खरे म्हणजे प्रतिनिधींनी विनोबांचा अनुल्लेखच केला. उल्लेख टाळला. म्हणूनच तो विनोबांचा पराभव आहे. विनोबांचे उजवे हात निर्मला देशपांडे व नरेंद्र दुबे यांना अधिवेशनासाठी बोलावणे पाठवले होते. रीतसर निमंत्रण त्यांना दिले होते. पण ते आले नव्हते. सर्व सेवा संघात त्या दोघांनाही काडीमात्र स्थान राहिलेले नाही. त्यामुळे ते आले नसावेत, अशी समजूत होती. तरीही त्यांच्या अनुपस्थितीसंबंधी चौकशी केली तेव्हा त्या दोघांनी सर्वोदय परिषद व सर्वोदय मिशन अशा दोन वेगवेगळ्या संस्था स्थापन केल्या असल्याचे समजले. विनोबांना मानणारे आर. के. पाटील! त्यांना या दोन संस्थांविषयी विचारले तेव्हा त्यांनीही नरेंद्र दुबे यांनी सर्वोदय मिशन व निर्मला देशपांडे यांनी सर्वोदय परिषद सुरू केल्याचे मान्य केले. आर. के. पाटील यांनीच मान्य केले असल्यामुळे सर्व सेवा संघाला पर्यायी संस्था स्थापन केल्याबद्दल संशय राहण्याचे कारण नाही.

सर्व सेवा संघाचे विसर्जन करावे, असा सल्ला विनोबांनी दिला आहे. म्हणून संघाचे विसर्जन करावे आणि नवा संघ स्थापन करावा, असे विचार आर. के. पाटील यांनी अधिवेशनात मांडले होते. प्रतिनिधींनी संघाचे अस्तित्व कायम ठेवण्याचा निर्णय केला होता.

त्यामुळे विनोबानुयायी आर. के. पाटील पुढे काय करणार, असा प्रश्न आला. आर. के. पाटलांनाच त्याबाबत मी विचारले, 'संघाचे विसर्जन करून नवा संघ काढा, असे तुम्ही म्हणता. पण संघाचे विसर्जन करायचे नाही, असे ठरवले आहे. तेव्हा तुम्ही आता संघातून बाहेर पडणार का? किंवा नवा संघ स्थापणार काय? अथवा, नव्याने निघालेल्या दोन पर्यायी संस्थांपैकी एकीमध्ये जाणार काय?'

'जे नवे संघ स्थापन केले आहेत त्यामध्ये मी जाणार नाही किंवा आणखी नवी संस्था काढणार नाही. पण सर्व सेवा संघातून बाहेर पडावयाचे की नाही याविषयी काही ठरवले नाही' असे आर. के. पाटील म्हणाले. असलेल्या संघाचे विसर्जन करावयाचे आणि नवा संघ स्थापन करावयाचा ही पाटील यांची सूचना विसंगत तरी म्हणावी लागेल किंवा डावपेचात्मक तरी मानावी लागेल. असलेला संघ विसर्जित करून नवा संघ स्थापन करावयाचा म्हणजे जयप्रकाश नारायण यांना मानणाऱ्यांना वगळून पाटलांना नवा संघ अभिप्रेत आहे का?

आचार्य दादा धर्माधिकारी यांची द्विधा मनःस्थिती झाली होती. पहिल्या दिवशी त्यांनी प्रतिकाराचे महत्त्व प्रतिपादले होते. आणीबाणीचा प्रतिकार विद्यार्थ्यांनी केला नाही म्हणून आपल्याला दुःख झाले असे दादांनी सांगितले. अन्यायाचा, अत्याचाराचा प्रतिकार केला पाहिजे असे दादा धर्माधिकारी यांनी सांगितले. दुसऱ्या दिवशी मात्र त्यांनी महात्मा गांधींचा हवाला दिला आणि काँग्रेस विसर्जित करा असा सल्ला गांधींनी दिला होता, त्याचप्रमाणे संघ विसर्जित करा असा सल्ला विनोबांनी दिला असल्यामुळे संघाचे विसर्जन करावे असे दादा धर्माधिकारी म्हणाले. अन्याय, अत्याचार यांचा पक्षातीतपणे प्रतिकार करण्याचे तत्त्व मान्य केले की, कोणत्याच पक्षाला न बांधलेला सर्व सेवा संघ कायम ठेवणे अधिकच निकडीचे होऊन बसते. दादांना तेच मान्य नव्हते. सर्व सेवा संघाजवळ कार्यकर्ते अधिक असून त्यांनी ग्रामीण भागात ठाण दिलेले आहे. कार्यकर्त्यांच्या व्याख्येत कोणत्याही राजकीय पक्षाचे कार्यकर्ते बसणार नाहीत, पण त्या व्याख्येत सर्व सेवा संघाचे कार्यकर्ते बसतील. काँग्रेस, गांधींमुळे ग्रामीण भागापर्यंत पोचली आहे. तिच्याजवळ संस्थेच्या परिभाषेत सर्वांत अधिक कार्यकर्ते आहेत. पण हे कार्यकर्ते काँग्रेसजवळ सत्ता असल्यामुळे राहिले आहेत. सत्तेवरून काँग्रेस जाताच तिचे कार्यकर्ते पक्ष सोडू लागले आहेत. इतर पक्ष सर्व खेड्यापर्यंत पोचलेले नाहीत. हे लक्षात घेता सर्वोदयी कार्यकर्तेच खेड्यात ठाण मांडून बसलेले असून त्यांची संख्याही मोठी आहे. म्हणूनच अन्याय, अत्याचार यांचा प्रतिकार याच कार्यकर्त्यांकडून खऱ्या अर्थाने होणार आहे. होऊ शकेल! मात्र त्यासाठी प्रतिकार, संघर्ष यांची बैठक असलेली संघटना असावी लागेल. प्रतिकाराची आवश्यकता दादा धर्माधिकारी प्रतिपादतात पण त्याच्या दुसऱ्याच दिवशी प्रतिकाराचा आग्रह कायम ठेऊन अस्तित्व ठेवू पाहणारा संघच मोडीत काढा असे ते म्हणू लागतात. ही त्यांची विसंगती प्रतिनिधींना चांगलीच जाणवत होती. गांधींनी काँग्रेस विसर्जित करा असा सल्ला दिला होता पण तो केव्हा? सल्ल्याचे स्वरूप व त्याची वेळ श्री. दादा धर्माधिकारी, आर. के. पाटील व श्रीमन्नारायण विसरलेले दिसतात. केवळ विसर्जन या एकाच शब्दाचे साधर्म्य गांधी व विनोबा यांच्या सल्ल्यात आहे. सिद्धारज ढड्डा, ठाकुरदास बंग, वसंतराव नारगोळकर आदींनी विनोबांच्या विसर्जनाच्या सल्ल्याची चांगलीच चिरफाड केली. काँग्रेस हे स्वातंत्र्य मिळवण्याचे साधन होते.

आता स्वातंत्र्य मिळाले आहे. त्यामुळे काँग्रेसची आवश्यकता राहिलेली नाही म्हणून काँग्रेसचे विसर्जन करावे असा सल्ला महात्मा गांधींनी दिला होता. विनोबांच्या संस्थांचे तसे नाही. सर्वोदय समाज, शासनमुक्त समाज ही सर्व सेवा संघाची ध्येये आहेत. ती पूर्ण झालेली नाहीत. जोपर्यंत सर्वोदय समाज व शासनमुक्त समाज निर्माण झालेला नाही तोपर्यंत संघाचे कार्य पूर्ण होत नाही. संघाचे कार्य पूर्ण झालेले नाही. असे असताना सर्व सेवा संघाचे विसर्जन करण्याची जरूरी नाही. त्यांच्या अस्तित्वाची जरूरी आहे असे सिद्धराज ढड्डा, बंग व नारगोळकर आदींनी सांगितले. दादा धर्माधिकारी यांनी संघाचे प्रयोजन संपलेले आहे असे म्हटले होते. त्यालाही या लोकांनी प्रयोजन संपलेलं नाही हे सप्रमाण दाखवून दिले. सर्वोदय समाज निर्माण होईल की नाही हा प्रश्न वेगळा! पण ते ध्येय बाळगून सर्व सेवा संघाची स्थापना झाली होती. असे असताना विनोबा तरी विसर्जनाचा सल्ला का देत आहेत? विनोबांना संघ मानेनासा झाला. त्यांच्यापेक्षा जयप्रकाश नारायण यांचा शब्द संघात परवलीचा झाला आहे. जयप्रकाश लोकशाही, नागरिकांचे स्वातंत्र्य यासाठी संघाला प्रतिकारार्थ सिद्ध करू लागले व संघही त्याच विचारांचा झाला म्हणून सर्व सेवा संघच बरखास्त करावयाचा? विनोबांच्या सल्ल्याचा हाच अर्थ आहे. नाही तर सर्वोदय समाजाचे स्वप्न साकार झालेले नसताना संघ विसर्जित करण्याच्या सल्ल्याचा दुसरा कोणता अर्थ निघू शकतो!

विनोबांच्या नेतृत्वाखाली सर्व सेवा संघ चुकीच्या मार्गाने चालला होता तेव्हा जयप्रकाश नारायण यांनी संघाला नेतृत्व देऊन योग्य मार्गावर आणून ठेवले व पुढे गेले असे वसंतराव नारगोळकर म्हणाले. जोपर्यंत विनोबा वाक्यम् प्रमाणे संघ चालला तोपर्यंत त्यांच्या विसर्जनाचा प्रश्न उपस्थित झाला नव्हता. विनोबांना गांधींचे वारस म्हटले जाते. पण विनोबा खरेच गांधींचा वारस आहेत का याचे मूल्यमापन मधू लिमये यांच्याशिवाय कोणी केले नव्हते. त्यामुळे विनोबा या सरकारी संतांविषयी अनेकांच्या उगाचच काही कल्पना होऊन बसल्या. काही वर्षांपूर्वी दिवाळी अंकात मधू लिमये यांनी विनोबा गांधींचे वारस कसे ठरतात? ते गांधींचे वारस नाहीत याविषयी लेख लिहिला होता. गांधींचे तत्त्वज्ञान संघर्षावर आधारित आहे. अन्यायाचा प्रतिकार करणे, त्यासाठी संघर्षाला तयार राहणे व समाजाला तयार करणे हे गांधींच्या जीवनाचे सूत्र होते. विनोबांचा संघर्षालाच विरोध आहे. संघर्ष विनोबांना मान्य नाही. असे असताना विनोबा गांधींचे वारस कसे ठरतात? ते गांधींचे वारस असतील तर, गांधींच्या जीवनातील अध्यात्माच्या अंगाचे वारस फार तर ठरतील. असे विवेचन मधू लिमये यांनी केले होते. तेच अचूक होते. संघर्षाचा प्रश्न निर्माण होताच, सर्व सेवा संघ बरखास्त करावा अशी भूमिका विनोबांनी घेतली आहे. विनोबांनी भूदान चळवळ सुरू केली. सर्वोदयाची कल्पना त्यातून पुढे आली. पक्षीय राजकारणाला वैतागलेले जयप्रकाश नारायण विनोबांच्या चळवळीत दाखल झाले. जयप्रकाशांमुळे विनोबांच्या चळवळीत कार्यकर्ते मोठ्या संख्येनें दाखल झाले होते. कार्यकर्त्यांवर जयप्रकाशांचा प्रभाव होता. त्याचेच परिणाम आज दिसून येत आहेत. जयप्रकाश यांच्यामुळे विनोबांच्या चळवळीत आलेले कार्यकर्ते जयप्रकाश नारायण यांच्याबरोबरच राहिले आहेत. म्हणूनच विनोबा व जयप्रकाश यांच्या विचारात संघर्ष निर्माण झाला तेव्हा कार्यकर्ते

जयप्रकाशांबरोबरच गेले. सर्व सेवा संघामध्ये ९० टक्के कार्यकर्ते जयप्रकाशांबरोबर राहिले त्याचे कारण हे आहे. विनोबांनी याचा विचार कधी केला होता की नाही कोण जाणे? गांधींनी कार्यकर्ते तयार केले आणि त्यांना एकत्र ठेवले होते. जयप्रकाश नारायण यांच्या बाबतीतही तोच अनुभव आहे. त्यांनी कार्यकर्त्यांना एकत्र ठेवले होते. कार्यकर्ते एकत्र ठेवण्याची त्यांची किमया होती म्हणूनच डॉ. राम मनोहर लोहिया यांचे निधन झाल्यानंतर राजनारायण जयप्रकाशाकडे गेले आणि 'हम समाजवादी बिखर जायेंगे! आपही हमारा नेतृत्व कर सकेंगे!' असे जयप्रकाशांना आवर्जून सांगत होते.

जयप्रकाश नारायण यांनी सर्वोदय चळवळीला नवी दिशा दिली हे आर. के. पाटील यांनीसुद्धा मान्य केले. जयप्रकाश नारायण यांनी सर्व सेवा संघाला नवी दिशा दिली. नवा 'अध्याय' दिला असे पाटील म्हणाले. जेपींनी विनोबांची चळवळ पुढे नेली हे धर्माधिकारीही मान्य करतात.

जयप्रकाश नारायण यांना अधिवेशनाला हजर राहता यावे याचसाठी सर्व सेवा संघाचे अधिवेशन मुंबईत घेण्यात आले. पण विधात्याच्या मनात वेगळेच होते. त्यांची प्रकृती बिघडल्यामुळे जयप्रकाशांना अमेरिकेला जावे लागले. परंतु अधिवेशनासाठी जयप्रकाश नारायण यांनी संदेश पाठवला. संघाचे अस्तित्व कायम ठेवावे असे जयप्रकाशांनी प्रतिनिधींना संदेशाद्वारे सांगितलेच, पण आणीबाणीत संघाने जी भूमिका घेतली त्याबद्दल आपले परखड विचारही जयप्रकाश नारायण यांनी संदेशामध्ये मांडले होते. अन्यायाचा प्रतिकार करण्याऐवजी पलायनवादी भूमिका घेऊन सरकारी संताची भूमिकाच वठवणाऱ्या विनोबांचा उल्लेख न करता, जयप्रकाशांनी विनोबावाद्यांच्या डोळ्यात अंजन घातले.

देशात हुकूमशाही लादली जात होती तेव्हा संघाने, संघ म्हणून प्रतिकार केला नाही. लोकशाहीचे खांब एकामागून एक असे ढासळत होते तेव्हा संघाने त्याचा प्रतिकार केला नाही यासारखी शरमेची गोष्ट नाही.' असे जयप्रकाश नारायण यांनी आपल्या संदेशात म्हटले होते. 'जे. पीं. नी संदेश पाठवण्यापूर्वी मी त्यांना भेटलो असतो तर, त्यांनी असा संदेश दिला नसता. इतकेच नव्हे तर, त्यांनी 'संघ विसर्जित करा असाच सल्ला दिला असता.' असे आचार्य दादा धर्माधिकारी म्हणाले. 'तुम्ही त्यांना संदेशापूर्वी भेटला असतात तर, तुमचेच मत बदलले असते' असे धर्माधिकारी यांना ढड्डा, बंग, राममूर्ती, नारगोळकर आदींनी सांगितले.

विनोबावाद्यांना जयप्रकाश नारायण यांचा संदेश चांगलाच झोंबला आहे. संदेशाची भाषा जयप्रकाशांनी सौम्य करावी यासाठीही प्रयत्न केले गेले. पण शरिराने खचलेले जयप्रकाश मनाने, विचाराने वाकलेले नाहीत. ते त्यादृष्टीने चांगलेच खंबीर होते. म्हणूनच त्यांनी आपली भाषा आणखी सौम्य केली नाही. 'संदेशाची भाषा कठोर झाली आहे. ती आणखी सौम्य करा' असे सांगण्यासाठी गेलेल्या नेत्याला जयप्रकाशांनी वेगळ्या भाषेत चापलेच!

**'संदेशात वापरलेली भाषा तुम्हाला कठोर वाटते. पण माझ्या हृदयात त्या भावना आहेत त्या तशाच्या तशा व्यक्त करणारी भाषा मी वापरलेली नाही. ज्या भावना आहेत त्यांपैकी थोड्याशाच संदेशात उतरलेल्या आहेत. त्यामुळे संदेश आणखी सौम्य करावा असे मला वाटत नाही.' असे जयप्रकाश नारायण यांनी भाषा सौम्य करण्याचा प्रयत्न करणारांना बजावले.**

संदेशामध्ये विनोबांचे प्रत्यक्ष नाव नसले तरी, रोख विनोबांनाच जास्ती लागू पडतो. विनोबा व जयप्रकाश नारायण पुनः जवळ येणे शक्य नाही इतक्या लांब दोघेही गेले आहेत. अन्याय निवारण करण्याकरता प्रतिकार व तो लोकशाही मार्गाने करणे ही गरज आहे, असे जयप्रकाश मानतात, तर प्रतिकार, लोकशक्तीचे दर्शन म्हणजे 'दबाव व दबाव म्हणजे हिंसा' असे विनोबा मानतात. दोघांची ही दृष्टी परस्पर विरोधी असताना दोघे जवळ कसे येतील? आचार्य दादा धर्माधिकारी यांनी विनोबा व जयप्रकाश नारायण यांनी समास नेतृत्व करावे असे म्हटले आहे. समास नेतृत्व म्हणजे संयुक्त नेतृत्व! या भिन्न स्वरूपाच्या दृष्टिकोनाचा समास तरी कसा होणार? त्यामुळे दादा धर्माधिकारी यांची इच्छा ही सदिच्छाच म्हणावी लागेल.

संघाच्या अध्यक्षपदासाठी तेरा नावे सुचवण्यात आली. ती बहुतेक जयप्रकाश यांना मानणारी होती. सिद्धराज ढड्डा यांचे नाव एकमताने स्वीकारण्यात आले आणि अध्यक्षांना सल्ला देण्यासाठी सात जणांचे अध्यक्ष मंडळ नेमावे, अशीही सूचना पुढे आली. आजपर्यंत अध्यक्ष मंडळाची प्रथा संघाच्या व्यवस्थेत नव्हती. प्रथमच ती पुढे आली. परंतु प्रतिनिधींना या सूचनेविषयी संशय वाटू लागला. सिद्धराज ढड्डा जयप्रकाशवादी असल्याने त्यांना अध्यक्ष म्हणून काम करू देण्यात अडथळा आणावा किंवा त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्याच्या हेतूने अध्यक्ष मंडळाची सूचना पुढे आली असावी, असे प्रतिनिधींना वाटू लागले. त्यामुळे ही सूचना मांडली जाताच त्यांनी ती मोठ्याने ओरडून लगेच आम्हाला, ही सूचना मान्य नाही, असे सांगण्यास सुरुवात केली.

सर्व सेवा संघाचे निर्णय एकमताने घेण्याची पद्धती संघाने अवलंबली होती. त्यामुळे आणीबाणीत कोणती भूमिका घ्यावी, यावर संघात एकमत झाले नाही. ९० टक्के लोक जयप्रकाश यांच्या विचाराचे असूनही १० टक्के लोकांच्या मतामुळे संघाने आणीबाणीपूर्वी बिहार आंदोलनासंबंधी कोणताच निर्णय घेतला नव्हता. जयप्रकाशांनी संघाचे अस्तित्व कायम ठेवण्याची आवश्यकता प्रतिपादली आहे. तीमध्ये संघाची निर्णय घेण्याची पद्धतही बदलली पाहिजे, असे म्हटले आहे. एकमताने निर्णय घेण्याऐवजी बहुमताने निर्णय घ्यावेत. अगदीच महत्त्वाच्या प्रश्नावर ७५ टक्के मताधिक्याने निर्णय घेतले जावेत, अशी सूचना जयप्रकाशांनी केली आहे व ती मान्यही होईल. पण त्यासाठी संघाच्या घटनेचा अडसर येण्याची शक्यता आहे. संघाच्या घटनेनुसार घटना बदलावयाची झाल्यास एकमताची आवश्यकता आहे व घटनाबदलही एका अधिवेशनात होत नाही. दोन अधिवेशनात घटनाबदल मंजूर करावा लागतो. त्यामुळे पहिल्या अधिवेशनात कार्यपद्धत बदलण्यास एकमताने मंजुरी मिळाली आणि दुसऱ्या अधिवेशनात एकाने जरी विरोध केला तरी, घटनेत बदल करता येणार नाही. संघ विसर्जित करून नवा संघ स्थापन करावा, या मताचे आर. के. पाटील आहेत. संघ विसर्जित केला जात नाही. तरीही पाटील संघातच राहण्याचे बोलून दाखवत आहेत. संघाच्या घटनेत बदल करण्याच्या प्रश्नावर विरोधी मत देऊन घटनाबदल होऊ द्यावयाचा नाही, हा विनोबावाद्यांचा विचार असावा! □

# अवती-भवती

शरद कृष्णन्

## निवडणुका निनादू लागल्या....

लोकसभा निवडणुकांमध्ये जनता पक्षाला जे झंझावती यश मिळाले, त्यामुळेच येऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकांसाठी जनता पक्षाची उमेदवारी मिळाली की, जादूची कांडी फिरून विधानसभेचे दरवाजे आपल्यासाठी खुले होणार याची उमेदवारांना खात्री वाटू लागल्यामुळे जनता पक्षाच्या तिकिटांसाठी ही झुंबड उडालेली दिसते. पक्षाला एक झेंडा, एक अध्यक्ष मिळाला असला तरी, अजून एक विचार मात्र मिळालेला नाही. त्यामुळे जनता पक्षांतर्गत जी प्रचंड रस्सीखेच चालू आहे त्याचे दर्शन सातत्याने होत आहे. वाटप जनता पक्षाच्या तिकिटांचे पण बातमी येते-मध्य प्रदेशामध्ये जनसंघाचे पारडे जड. उत्तर प्रदेशात-भारतीय लोकदलाचे वर्चस्व. बिहारमध्ये समाजवाद्यांना जास्त जागा मिळणार ! जनता पक्षाला राजकीय विचार आणि आर्थिक धोरण प्राप्त झाल्यावर-हे जुने दाखले कदाचित वापरले जाणार नाहीत. पण अजून तरी जनता पक्षाच्या तिकिटांचे हिशेब-जुन्या पक्षांच्या नावाशी निगडित झालेले दिसतात. ज्या नऊ राज्यांमध्ये निवडणुका येऊ घातल्या आहेत त्याचे धावते चित्र 'इंडिया टुडे' या पाक्षिकाच्या ताज्या अंकामध्ये पाहावयास मिळते.

### बिहार

जनता पक्षाचे प्रेरकस्थान असलेले जयप्रकाशजी आणि ज्यांचा येथील जनतेवर प्रचंड प्रभाव आहे ते संरक्षणमंत्री बाबू जगजीवनराम यांचे हे राज्य. तब्येत बरी असताना जयप्रकाशजींचे वास्तव्यही पाटण्यातच असते. पूर्ण क्रांतीच्या आंदोलनाला प्रारंभ झाला तोही याच राज्यात. लोकसभा निवडणुकांमध्ये काँग्रेसने असा जबर मार खाल्ला आहे की, जनता पक्ष अथवा राज्य पातळीवर प्रभावी असलेल्या छात्र संघर्ष समितीशी लढा देण्याची ताकद आणि नैतिक बळ काँग्रेसजवळ असल्याचे दिसत नाही. बिहारच्या विसर्जित विधानसभेचे ३१९ सदस्य होते. याच राज्यात जास्तीत जास्त आमदारांनी राजीनामे दिले. जुन्या विधानसभेमध्ये उजवे कम्युनिस्ट हा एक बलशाली पक्ष होता. या पक्षाचे ३५ सदस्य होते. कम्युनिस्ट आणि काँग्रेस एकत्र येऊन ही निवडणूक लढवत आहेत. म्हणजे केवळ जागा वाटपापुरती ही दोस्ती नाही तर, स्नेहसंबंध दृढ करणारा हा करार आहे असे मानवळते मुख्यमंत्री डॉ. जगन्नाथ मिश्रा म्हणतात. अशा कराराचा खरा फायदा काँग्रेसलाच मिळेल. कारण झटून काम करणारे सुमारे एक लक्ष चाळीस हजार कम्युनिस्ट कार्यकर्ते कामाला लागतील तेव्हा त्यांना, आपल्या पक्षाच्या उमेदवारांबरोबरच काँग्रेसचा प्रचारही करावा लागेल. विधानसभेच्या जागांची संख्या ३१९ वरून ३२४ वर गेलेली आहे. एकंदर वातावरण केवळ बिहारमध्येच नव्हे तर, इतरत्रही-जनता पक्षाला अनुकूल आहे. जनता पक्षाच्या उमेदवारांची निवड हीच खरी अडचण आहे. छात्र संघर्ष समितीने २०० जागांची मागणी केली आहे. एवढ्या जागा मिळाल्या नाहीत तर, सर्व ३२४ जागांसाठी आपण स्वतंत्र उमेदवार उभे करू असेही त्यांनी घोषित केले आहे. संघर्ष समितीला २०० जागा कोणी देणार नाही, पण २०० जागांची मागणी केली म्हणजे निदान १०० ते १२५ तरी मिळतील असा हा हिशेब आहे. आचार्य कृपलानी आणि आचार्य राममूर्ती हे जनता पक्षाचे निरीक्षक आहेत. कर्पुरी ठाकूर, माजी मंत्री व समाजवादी नेते रामानंद तिवारी यांच्या मतांना विशेष महत्त्व आहे. तसेच बाबू जगजीवनराम यांना मान्य नसणाऱ्या उमेदवाराला जनता पक्षाचे तिकीट मिळणे जड जाणार आहे.

### उत्तर प्रदेश

उत्तर प्रदेश म्हणजे चरणसिंह असे सध्या समीकरण होऊन गेले आहे. त्यात पुन्हा जनता पक्षाने निरीक्षक म्हणून चरणसिंह यांची निवड केल्याने त्यांचे महत्त्व वाढले आहे. स्वतःच्या राज्यामध्ये निरीक्षक म्हणून काम करणारे ते एकमेव नेते आहेत. हेमवतीनंदन, बहुगुणा आणि चरणसिंह यांचे फारसे जमत नाही. तथापि विधानसभेच्या तिकीटवाटपाच्या वेळी याच दोघांना एकत्र येऊन वाट काढावी लागणार आहे. उत्तर प्रदेशमध्ये तापल्या तव्यावर पोळी भाजून घेण्याचे सोपे काम असले तरी-उमेदवार निवडीवरून इतके वादंग उठले आहेत की, या कटकटींना कंटाळून चरणसिंह यांनी आपण निरीक्षक म्हणून काम करण्यास तयार नसल्याचे जनता पक्षाला कळवले आहे. सी. बी. गुप्ता यांनी थेट मोरारजींकडे जाऊन आपल्याविरुद्ध तक्रार करावी ही गोष्ट त्यांना रुचलेली नाही. निवडणुकीच्या यशाबद्दल जनता पक्षाला इतकी खात्री आहे की, निवडणुका होण्यापूर्वीच भावी मुख्यमंत्री कोण होणार याबद्दल चर्चा चालू आहे. सी बी. गुप्ता, एम. पी. त्रिपाठी आणि राजमंगल पांडे या तिघांच्या नावांची चर्चा चालू आहे. बळी द्यायला काढलेल्या बोकडासारखी काँग्रेसची अवस्था झाली आहे. ४२५ सदस्य असलेल्या विसर्जित विधानसभेमध्ये काँग्रेसचे २१४ सदस्य होते. जनता पक्षाची संख्या फुगत फुगत १३५ वर जाऊन पोचली होती आणि तेव्हा स्वतंत्र असलेल्या लोकशाही काँग्रेसचे ४४ सदस्य विसर्जित विधानसभेमध्ये जास्तीत जास्त जागा मिळवण्यासाठी-काँग्रेस झटून प्रयत्न

करील, असे विधान नरिन दत्त तिवारी यांनी केले आहे आणि त्यादृष्टीने प्रयत्न म्हणून उपाय काय तर, कम्युनिस्टांशी पुन्हा गट्टी. अर्थात प्रयत्न कसेही केले तरी, हे सगळेच उसने अवसान आहे हे विसरता येणार नाही. तिवारी काय किंवा अन्य कोणी नेता काय कोणत्या तोंडाने मते मागायला जाणार हा खरा प्रश्न आहे. जनता पक्षांतर्गत जी रस्सीखेच चालणार आहे त्यामध्ये जनसंघवाले भरपूर ताणून धरणार अशी लक्षणे दिसत आहेत. नानाजी देशमुख यांच्या शब्दाला विशेष मान राहील. परंतु जनता पक्षाच्या उमेदवारांच्या अंतिम निवडीवर सगळ्यांत जास्त प्रभाव चरणसिंह यांचाच राहील.

## पश्चिम बंगाल

जनता पक्ष आणि डावे कम्युनिस्ट यांची गट्टी जमली की, जनता पक्षाला बंगालमध्ये निवडणुका लढवणे फारसे अवघड जाणार नाही. ११ जून आणि १४ जून अशा दोन दिवशी येथे निवडणुका होत आहेत. केवळ जागांचे वाटप आणि भावी मंत्रिमंडळामध्ये मिळणारा सत्तेचा वाटा या गोष्टींवर डावे कम्युनिस्ट आणि फॉरवर्ड ब्लॉकचे नेते जागांचे वाटप करण्यास तयार नाहीत.निश्चित कार्यक्रम घोषित करून मगच जनतेसमोर जावे असे आपल्याला वाटते असे फॉरवर्ड ब्लॉकचे नेते अशोक घोष यांनी सांगितले आहे. कम्युनिस्टांचे धोरण काहीसे ताठर झाले आहे. जनता पक्ष फक्त जागावाटपाच्या गोष्टी करतो, हे डाव्या कम्युनिस्टांना मान्य नाही. सन्माननीय तडजोडीसह सत्तेमधील सहभाग संभवत नसेल तर, असे डावे कम्युनिस्ट नेते पी. सुंदरैय्या म्हणतात. पश्चिम बंगालमधील डाव्या कम्युनिस्टांना मात्र एवढे ताठर धोरण मानवत नाही. तेथील डावे कम्युनिस्ट नेते प्रमोददास गुप्ता म्हणतात, जनतेला जनता पार्टी आणि कम्युनिस्ट यांनी एकत्र काम करावे असे वाटते. मात्र वाटेल त्या अटी स्वीकारून ही दोस्ती टिकवणे त्यांनाही बरोबर वाटत नाही. जनता पक्षाचे धोरण ताठर आहेच. पश्चिम बंगाल जनता पक्षाचे अध्यक्ष पी. सी. सेन यांनी २९४ जागांपैकी केवळ ८० जागा डाव्या कम्युनिस्टांना देऊ केल्या आहेत आणि संयुक्त मंत्रिमंडळाची भाषाही करण्यास ते तयार नाहीत. कांग्रेसला आपले अंतर्गत मतभेद विसरून एकत्र येणे भाग आहे. मावळते मुख्यमंत्री सिद्धार्थ शंकर रे यांनी आपण पुन्हा विधानसभा निवडणूक लढवणार असल्याचे घोषित केलेच आहे. सिद्धार्थ शंकर रे त्यांना पराभूत करून कांग्रेस अध्यक्षपदी विराजमान झालेल्या ब्रह्मानंद रेड्डी यांच्या कार्यकारी समितीवर सभासद म्हणून काम करणार नसले तरी, आपण कांग्रेस सोडणार नाही, स्वतः निवडणूक लढवू आणि निवडणुकीचा प्रचारही करू, हे त्यांनी स्पष्ट केले आहे. विसर्जित विधानसभेमध्ये कांग्रेसचे २१६ सदस्य होते. २८० सदस्य असलेल्या सभागृहामध्ये असे खणखणीत बहुमत असूनही संजय गांधी यांच्या कारवाया आणि पक्षांतर्गत संघर्ष यामुळे सिद्धार्थबाबूंना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. त्यांची गादी अखेरपर्यंत सुरक्षित राहिली, हाच चमत्कार मानावा लागेल. केंद्रशासनातून इंदिराजी बाजूला झाल्याने सिद्धार्थबाबूंना असलेल्या पक्षांतर्गत विरोधाची धार बोथट झाली आहे. तथापी युवक कांग्रेसनेते प्रियरंजनदास मुन्शी यांच्याबरोबर खरा समझोता झाला तर, बंगालमधील निवडणुका लक्षवेधी करण्याची कामगिरी सिद्धार्थ शंकर रे करू शकतील. बंगालमध्ये जनता पक्ष म्हणजे जुनी संघटना कांग्रेस आणि लोकसभा निवडणुकीच्या वेळी ज्याला शक्ती मिळाली तो डावा कम्युनिस्ट पक्ष आणि सात डाव्या पक्षांची आघाडी यांची. जनता पक्षामागे ही सारी शक्ती पुन्हा उभी राहिली तरच, राज्यपातळीवर जनता पक्षाला उभारी घेता येईल.

## अध्यक्ष चंद्रशेखर

जनता पक्षाच्या नवीन अध्यक्षांभोवती जनतेचा सतत गराडा पडलेला असतो. त्यांची मुलाखत घेण्यासाठी गेलेल्या 'करंट'च्या आयुब सैद यांना त्यांच्या शयनगृहामध्ये घुसावे लागले. तसा तेथेही सगळ्यांना प्रवेश आहे म्हणे. दिल्लीच्या साऊथ अॅव्हेन्यूमधील त्यांचे निवासस्थान केवळ गजबजलेले नसते तर, माणसांच्या भाऊगर्दीमध्ये सतत न्हाऊन निघालेले असते. बरे, कोणालाही कोठेही प्रवेश असल्याने मंडळी चौफेर निवांत बसलेली असतात. बसायची पुढची खोली, स्वयंपाकघर, शयनगृह सगळ्या ठिकाणी माणसे बसलेली असतात. आणि आता देशाचे भवितव्य घडवणे ज्याच्या हाती आहे ते चंद्रशेखर...चाळीस वर्षांचे, दाढी वाढलेले, सिग्रेसाधे तरुण जमलेल्या मंडळींबरोबर बोलत–फिरत असतात. म्हणजे वेळ ठरवून त्यांना भेटणे वगैरे शक्यच नसते. कोणते ना कोणते काम घेऊन त्यांना भेटायला येणाऱ्या प्रत्येकाचा असा ग्रह असतो की, चंद्रशेखर यांना भेटणे हा त्याचा हक्क आहे आणि चंद्रशेखरने त्यांची वास्तपुस्त करणे हे त्यांचे कर्तव्य आहे आणि खरोखरच कर्तव्यभावनेने ते प्रत्येकाशी बोलत असतात. फोन सारखा खणखणत असतोच. तोही उचलावा लागतो. तिकडचे बोलणे संपले की, समोरच्या माणसाकडे लक्ष द्यावे लागते आणि त्याला शक्य तितक्या लवकर कटवायचे असले तरी, आपण कटवले गेलो, अशी भावना त्याच्या मनात रुजून चालण्यासारखे नसते. माणसांच्या गराड्यात बसलेल्या चंद्रशेखरची मुलाखत म्हणजे एक कसरतच की. आणि तरीही वेळ ठरवून (आणि तीही सकाळी ६ वाजताची !!) गेलेल्या वार्ताहराला पोचण्यापूर्वी अर्धा तास उशीर झाला तर, याच्याभोवती पाचपंचवीस माणसे जमलेली. तशाच गप्पा सुरू झाल्या. केंद्रस्थानी सत्तेवर असलेल्या पक्षाचे तुम्ही अध्यक्ष.

हे असले हुडेलहप्पी जीवन तुम्हाला मानवेल ?

'अहो, मी पक्षाचा पक्षाध्यक्ष झालो म्हणून काम वाढले, माणसांची वर्दळ वाढली. पण त्यामुळे माझ्या आर्थिक परिस्थितीमध्ये काही सुधारणा होणार आहे का ? अगदी माझी जरी इच्छा असली तरीसुद्धा नेकीने व्यवहार करीत असल्यामुळे मला संपन्न आयुष्य जगता येणार नाही. कारण माझी आर्थिक शक्ती फारच मर्यादित आहे.

असं. तुमची एकूण मालमत्ता तरी किती आहे हो ? आणि कपड्यांवर वगैरे किती खर्च करता ?

चंद्रशेखर : माझी धोतरे मी काही मोजलेली नाहीत. परंतु निवडणुकीच्या काळात असावीत डझनभर. आता मात्र चारएक

धोतरजोड्या असतील. जमीनजुमला म्हणाल तर, तिकडे गावाकडे बालिआ जिल्ह्यामध्ये इब्राहिमपट्टी येथे तीन एकर जमिनीचा तुकडा आणि चार खोल्यांचे एक मोडके घर आहे. मात्र ही मालमत्ता माझी एकट्याची नाही. आम्ही चांगले चार भाऊ आहोत आणि हे तीन एकर आम्हा चौघांचे आहेत. दुसरीकडे माझे कुठेही घर वगैरे नाही. गावाकडेच एक जिप आहे आणि बँकेमध्ये चारएक हजारांची रोकड आहे.

प्रश्न : एवढेच, एवढ्यात कसे भागते तुमचे ?

चंद्रशेखर : अहो, भागत नाहीच, कसेतरी भागवतो, आणि नेकीचे असेल तेच आपले असे म्हटल्यावर फार अपेक्षा ठेवणेही बरे नाही.

प्रश्न : तुम्ही लिखाण करताच, ते चालू ठेवणार आहात का ?

चंद्रशेखर : अर्थातच. आणि हो सांगायचे राहूनच गेले, बिर्लांच्या करचुकवेपणाची मी माहिती दिली, म्हणून मला नऊ हजार रुपये 'खबऱ्या' म्हणून शासनाकडून मिळाले. ही रक्कम मी मित्राकडे ठेव म्हणून ठेवली आहे. आणि आणखीनही काही रक्कम येणे आहे.

प्रश्न : आणखी रक्कम आणि ती कुठून ?

चंद्रशेखर । अहो शासनाकडून. मी दिलेल्या माहितीमुळे शासनाला बिर्लांकडून करांच्या रूपाने कोट्यवधी रुपये मिळाले. नियमाप्रमाणे मला या रकमेपैकी १० टक्के रक्कम 'खबऱ्या' म्हणून मिळाली पाहिजे. माझ्या अंदाजाप्रमाणे मला अजून ९० हजार रुपये मिळाले पाहिजेत. आता ही सारी रक्कम मी व्यक्तिगत खर्चासाठी वापरणार नाही. माझ्या डोक्यात 'खबऱ्या' लोकांसाठीच एक ट्रस्ट करण्याची कल्पना आहे.

प्रश्न : काय हो, हे पैसे मिळवण्यासाठी तुम्ही आग्रह धरणार का ?

चंद्रशेखर : हे पैसे मला मिळालेच पाहिजेत. अगदी शासकीय नियमाप्रमाणे मला ते मिळणे जरूर आहे. पुन्हा मी ते काही असे तसे खर्च करणार नाही.

प्रश्न : निवडणुकीच्यावेळी लावलेल्या पैजेपोटी तुम्हाला १० लाख रुपये मिळणार आहेत असे ऐकतो ते खरे आहे काय ? आणि असल्यास हा दुर्दैवी प्राणी कोण.

चंद्रशेखर : पैजेचे पैसे द्यायचे असतात असे मानले तर, मला ही रक्कम मिळाली पाहिजे. आणि ती देणारा दुर्दैवी प्राणी असेल– रामनाथ गोएंका.

प्रश्न : सत्ताधारी पक्षाचे अध्यक्ष म्हणून काम करताना तुम्हाला काय वाटते ?

चंद्रशेखर : खरं तर, हे अध्यक्षपद मला मिळेल असे मला वाटले नव्हते. त्यासाठी मी प्रयत्नही केला नाही. अनेक रथी महारथी पक्षामध्ये असताना माझ्यावर ही जबाबदारी टाकण्यात आली. मला या गोष्टीचे दडपण वाटत नाही अथवा माझ्या मनामध्ये काही वेगळेपणाची भावनाही नाही.

प्रश्न : ब्रह्मानंद रेड्डी यांची काँग्रेसपक्षाच्या अध्यक्षपदी निवड झाली आहे त्याबद्दल तुमचे मत काय ?

चंद्रशेखर : आपल्या पक्षाच्या अध्यक्षपदाबाबतचा निर्णय त्यांनी घ्यायचा आहे. त्याबाबत मी काय सांगणार ?

प्रश्न : जनता पक्षाचे प्रमुख म्हणून तुमची प्रतिक्रिया मला हवी आहे.

चंद्रशेखर : मला वाटते की, रेड्डी यांच्याकडून–त्यांच्या पक्षाच्या ज्या अपेक्षा आहेत त्या ते पूर्ण करतील. ते माझे चांगले स्नेही आहेत.

प्रश्न : यापेक्षा चांगला अध्यक्ष निवडणे काँग्रेसला शक्य नव्हते काय ?

चंद्रशेखर : अहो हा मतभेदाचा मुद्दा आहे. आणि चांगल्यापेक्षा अधिक चांगले नेहमीच असते. अमुक एक व्यक्ती अथवा गोष्ट सर्वोत्तम असे कधीच म्हणता येत नाही.

प्रश्न : जनता पक्षप्रमुख म्हणून तुमच्यासमोर असलेले महत्त्वपूर्ण प्रश्न कोणते ?

चंद्रशेखर : या नवीन विधानसभा निवडणुकीसाठी पक्षाला सज्ज करणे हे एक अवघड काम आहे. पक्ष चालवण्यासाठी उत्तम साथीदार मिळणे ही एक अवघड गोष्ट असते आणि भारतसारख्या खंडप्राय देशामध्ये तर, हे काम जास्तच बिकट बनते. त्यात पुन्हा आमचा पक्ष म्हणजे अनेक विचारसरणींच्या पक्षांच्या विलिनिकरणातून आकाराला आलेला. या सगळ्या शक्तीतून एकसंध, एकविचारी पक्ष निर्माण करण्याच्या दृष्टीने मला प्रयत्न करावे लागणार आहेत. जनता पक्षाबाबत वेळोवेळी जे आक्षेप लावले गेले ते खोटे ठरले आहेत. एक शक्तिशाली राजकीय पक्ष म्हणून जनता पक्षाची प्रभावी होत असलेली वाटचाल मला नवीन विश्वास देते.

प्रश्न : जनता पक्षाचा आर्थिक कार्यक्रम कसा असेल ?

चंद्रशेखर : पुष्कळांची अशी समजूत आहे की, जनता पक्षाने केवळ लोकशाही विरुद्ध हुकुमशाही असे नारे लगवत लोकसभेच्या निवडणुका लढवल्या. पण प्रत्यक्षात आर्थिक कार्यक्रमाबाबतही काही निश्चित धोरण होतेच. सार्वजनिक उद्योगधंद्यांना प्राधान्य, आर्थिक व सामाजिक तफावतीबाबत उपाययोजना याबाबत जनता पक्षाने आपली भूमिका त्यावेळी स्पष्ट केली होती. फक्त त्याला प्राधान्य दिले गेले नाही इतकेच.

प्रश्न : राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जनता पक्षामध्ये विसर्जित करण्याबाबत तुम्ही केलेल्या विनंतीला सरसंघचालकांनी स्पष्ट नकार दिला आहे. संघाला बाहेर ठेवून जनसंघ आत आला यामुळे गोंधळ होणार नाही का ?

चंद्रशेखर : सरसंघचालक बाळासाहेब देवरस यांच्या नकाराने मला आश्चर्य वाटले नाही. एखाद्या संस्थेला सर्वस्व वाहून तिची उभारणी केल्यानंतर त्या संस्थेबद्दल मनुष्य संवेदनाक्षम असतो. आपल्या संस्थेचे स्वतंत्र अस्तित्व धोक्यात येणे त्याला साफ नामंजूर असते. बाळासाहेब आज या प्रश्नाकडे याच दृष्टिकोनातून पाहत आहेत. शिवाय हा चुटकीसरशी सुटणारा प्रश्न नाहीच. या प्रश्नाच्या सोडवणुकीला प्रदीर्घ काळ लागणारच, आणि या प्रश्नाबाबत माझे विचार जसे मी मोकळेपणे मांडू शकतो तसेच सरसंघचालक त्यांचे विचार मांडू शकतात. कारण ही लोकशाही आहे. अशा मतभेदांबाबत घाबरण्याचे कारणच नाही.

प्रश्न : देशामध्ये पुन्हा एकदा एकाच पक्षाचे प्रचंड वर्चस्व निर्माण होण्यास प्रारंभ झाला आहे. आताचे वातावरण पाहता–विधानसभा निवडणुकांमध्ये काँग्रेसपक्षाची पूर्ण धूळधाण होणार असे दिसते आहे ही प्रक्रिया लोकशाहीला धोकादायक नाही का ? आणि तशी ती

पृष्ठ २९ वर

## चक्रमूचक्री (१३)

दीर्घस्मृति विश्वनाथ

# झाली विठ्ठला उपरती

**काय**, गेल्या आठवड्यात काही भेटलाच नाहीत ?

फार मोठी गंमतच झाली गेल्या आठवड्यात. झालं काय की, आपले चाफाजीराव आले.

चाफाजीराव म्हणजे तेच ना, ज्यांना कॉंग्रेसचं तिकीट मिळावं म्हणून तुम्ही दिल्लीला गेलात आणि 'स्मरण संतोष' विठ्ठलरावांना भेटलात ?

हां. आता 'स्मरण संतोष' म्हणू नका बरं का, बॅरिस्टर कावतात.

का ?

अहो, बॅरिस्टर साहेबांना 'स्मरण संतोष' ही पदवी बाईंनी दिली होती; आणि आता बाई म्हणजे भस्मासूर झाल्यात. त्यांचा ज्यांना आशीर्वाद त्यांचं जनता भस्म करून टाकते.

बरं, मग चाफाजीरावांचं काय ?

तर चाफाजीराव आले आणि म्हणाले, 'पाहू तर, चल जरा, विठ्ठलरावांना भेटून येऊ.' मी म्हणालो, 'चाफाजीराव, आता विठ्ठलरावांना भेटून काय उपयोग ? ते तर निवडणुकीत पडले; त्यांचे परममित्र शंकररावजी यांनाःयशवंतरावांनी फेकून दिले; आता काही ते तुम्हाला सहकारी–साखर–कारखाना–संघाचे अध्यक्ष करू शकणार नाहीत. कशाला उगाच खिजवायला जायचं?' तेव्हा चाफाजीरावांना गहिंवरून आले. म्हणाले, 'तसं नव्हं मास्तर, आरं, आता कोणबी विचारत नसल त्याला. 'समाचारा' ला गेलं पायजे. काकासाहेबांच्यापासून ओळखतोय् त्याला.'

मग गेलात बॅरिस्टर साहेबांना भेटायला ?

हो. असे दुपारचे गेलो मेहूणपुऱ्यातल्या त्यांच्या घरी. दाराशीच एक पत्रकार भेटले. म्हणाले की, विठ्ठलराव नि जयंतराव दोघेही वर आहेत. तुम्हाला भेटतील असं वाटत नाही. पण तुम्ही काही तसेच परत जाणार नाही, तेव्हा जाऊन या वर.'

वर गेलो. बऱ्यांपैकी मोठी खोली आहे. प्रत्येक खिडकीला वाळ्याचे पडदे लावून खिडकी झांकून टाकली होती. सगळ्या पडद्यांवर नुकतेच पाणी मारले असल्याने गारवा आणि वाळ्याचा घमघमाट पसरला होता. आम्ही हळूच दारात लावलेला वाळ्याचा पडदा किंचित बाजूला सारून आत डोकावलो.

काय दिसलं ?

'अहो, खोलीभर केळीची पानं पसरली होती. एका कोपऱ्यात बारकसं टूल होते. त्यावर थंड पेयांच्या बाटल्या होत्या. भिंतींना लावून अनेक बारक्या चौपाया होत्या. त्यांवर मोठाल्या घमेल्यांतून बर्फाच्या लाद्या ठेवल्या होत्या. छताशी दोन पंखे फिरतच होते. वाळ्याच्या पडद्यांनी खिडक्यादारं झाकलेली असल्यानं आत अंधूकच दिसत होतं.

अहो पण विठ्ठलराव–जयंतरावांचं काय ?

तेच सांगतो ना. दोघेजण एकमेकांच्या खांद्यावर हात टाकून, जमिनीवर पसरलेल्या केळीच्या पानांचा गारवा शोषून घेत होते !

मग ? आम्ही पडदा बाजूला केला, तो प्रकाशाची एक तिरीप खोलीत शिरली. त्याबरोबर दोघांनी डोळे झाकून घेतले. जयंतराव म्हणाले, 'विठ्ठलराव, जनता आलेली दिसते.' विठ्ठलराव लगेच कण्हले, 'जनते, माफी मागतो.' त्याच सुरांत जयंतराव कळवळे, 'पुनः असं होणार नाही.'

आम्ही ताबडतोब खाली उतरलो. पत्रकार अंगणांत उभेच होते. चाफाजीराव पत्रकारांना म्हणाले, 'काय झाले हो, या दोघांचे असे ? डॉक्टरला घरी बोलवा.' पत्रकार म्हणाले, 'आणीबाणीच्या काळात सत्तेचा जो कैफ चढला होता त्याचा पश्चात्ताप दोघांना झाला आहे. व्यक्तिस्वातंत्र्याच्या गळचेपीला आपल्याकडून जो पाठिंबा मिळाला त्याचा उद्वेग त्यांना वाटत आहे. जनतेची मनमोकळी माफी मागावी असे त्यांना वाटतंय. पश्चातापाचा दाह कमी करण्यासाठी हा गारवा !'

मी म्हणालो की, माफी अशी खाजगी रीतीने कशासाठी मागायची ? विठ्ठलरावांनी अशी कोपऱ्यात स्वतःशी पुटपुटून माफी मागितली तर ती लोकांना कशी कळणार ? पत्रकार काय म्हणाले ?

म्हणाले सांगून बघतो जयंतरावांना तरी !

### माफी–फोरम

पत्रकारांनी सांगितलं असावं जयंतरावांना. कारण, परवाच टी. ए. पैंच्या संजयला शिव्या देणाऱ्या भाषणावर टीका करणाऱ्या अग्रलेखात 'केसरी' नं म्हटलंय की, कॉंग्रेसजनांनी जनतेची माफीच मागितली पाहिजे.

त्यापूर्वी तीन मेच्या 'महाराष्ट्र टाईम्स'–मध्ये विठ्ठलरावांनी माफी-फोरमचा जाहीरनामाच प्रसिद्ध केला.

हा कोणता माफी–फोरम ?

कॉंग्रेसमध्ये पूर्वीपासूनच फोरमचं प्रस्थ आहे. सोशॅलिस्ट फ़ोरम, नेहरू–फोरम असे परस्पर-प्रशंसक गट कॉंग्रेसमध्ये असत. तसाच हा विठ्ठलराव-जयंतरावांचा माफी-फोरम. सध्यातरी विठ्ठलराव अध्यक्ष आणि जयंतराव सेक्रेटरी अशी दोनच माणसं या फोरममध्ये दिसतात.

काय म्हटलंय या माफी–फोरमच्या जाहीरनाम्यात ?

विठ्ठलरावांनी म्हटलंय् की, पक्षाला पुनः जनतेपुढे जाता यावे यासाठी 'गेल्या १९ महिन्यांत जे घडले त्याबद्दलची आपली नैतिक जबाबदारी पक्षाने प्रथम मनमोकळेपणे आणि जाहीरपणे मान्य केली पाहिजे. आणीबाणीच्या काळात व्यक्तिस्वातंत्र्य आणि लोकशाहीमूल्ये यांची गळचेपी करून सत्तेचा जो कैफ आला होता त्याबद्दल भारतीय जनतेची क्षमा मागितली पाहिजे. पुन्हा असा प्रकार आम्ही होऊं देणार नाही असे नम्र आश्वासन आणि वचन जनतेला दिले पाहिजे.'

अरेच्या, चांगलीच पलटी खाल्ली की या बॅरिस्टरानं. म्हणजे आणीबाणी याला अमान्य दिसत्येय् !

हा हा, अशी घाई करू नका. आणीबाणीची घोषणा योग्यच होती. असंच विठ्ठलराव म्हणतात. त्यांनी लिहिलं आहे, 'वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून विचार करता

आणीबाणीमुळे अराजक निर्माण होण्याचा धोका टळला. परंतु आणीबाणीचा कसा आणि किती गैरवापर केला जाईल, याची कल्पना बहुसंख्य कॉंग्रेसजनांना आली नाही. आणि आली त्यावेळी फार उशीर झाला होता ! '

म्हणजे विठ्ठलराव मंत्री झाले होते ! मला तरी काहीं अर्थ दिसत नाही या माफी-फोरमच्या चन्हाटात.

अगदी बरोबर. पराभवाच्या धक्क्याने विठ्ठलरावांच्या तर्कशक्तीचा कणाच तुटलेला दिसतो. इतका असंबद्ध लेख बॅरिस्टरांनी लिहावा हे त्यांना शोभत नाही. एकदा म्हणतात, 'स्वातंत्र्यानंतर कॉंग्रेसच्या संघटनेत आमूलाग्र बदल झाला नाही.' त्यानंतर लगेच लिहितात 'गेल्या तीस वर्षांत अशा रीतीने कॉंग्रेसच्या स्वरूपात इतका मूलभूत बदल झाला की...' मध्येच म्हणतात आणीबाणी आणि आणीबाणीच्या काळात घडलेले प्रकार हा एका ऐतिहासिक प्रक्रियेचा परिपाक होता ! ही प्रक्रिया कोणती त्याचा पत्ताच नाही. लेखाच्या शेवटी लास्की साहेबांची स्वातंत्र्याची व्याख्या कशासाठी दिलेय् हाही प्रश्नच आहे. त्यांच्या या लेखातून तर्कसंगत अर्थ काढणं हा दारूड्याच्या बडबडीतून वैदिक ऋचा ऐकण्याइतकंच कठीण आहे. 'कॉंग्रेस चळवळच राहिली' हे एकच वाक्य दोन-तीन वाक्यं सोडून दोनदा आलं आहे. त्याचा अर्थ काय हाही मुद्दा आहेच.

### मतलब

पण हे माफी-प्रकरण काढण्यात विठ्ठलरावांचा काहीतरी मतलब असणार. तो म्हणजे काही साधासुधा माणूस नाही !

मतलब तर आहेच आणि तो त्यांनी आपल्या लेखात स्पष्टही केला आहे. कॉंग्रेस-पक्षाला नवचैतन्य द्यायचे असेल तर, जनतेंपुढे यायला पाहिजे. जनतेपुढे उभे रहायचे तर, आणीबाणीतल्या पापांचा झाडा द्यावा लागणार ! ते टाळण्यासाठी आपली अगोदरच माफी मागून टाकावी हे उत्तम. विठ्ठलरावांच्या माफीमागचा मतलब हा असा आहे. ती केवळ एक राजकीय सोय आहे; पश्चात्तापाचा उमाळा नव्हे.

पण इतर कॉंग्रेसवाल्यांना माफीची ही भानगड का पटत नाही ? एक मेला सातान्याला यशवंतरावांनी कार्यकर्त्यांपुढे भाषण करताना 'कार्यकर्त्यांनी धैर्य आणि आत्मविश्वास खचू न देता कार्य करावे' असं सांगितलं. त्यानंतर मुंबईत माथाडी कामगारांसमोर तर वीरश्रीयुक्त भाषण करून जनता पक्षावर हल्लाही चढवला. त्यात पुढे ते आणीबाणीतल्या पापांचं ओझं वागवीत बोलतायत असं दिसलं नाही. तेव्हा आपल्या विठ्ठलराव-जयंतराव यांनाच माफी मागितल्याशिवाय जनतेपुढे जाता येणार नाही असं का वाटतं ?

यशवंतरावांची राजकीय पुण्याई मोठी आहे. आणीबाणीतल्या पापांची वजावट केली तरी, उरलेल्या पुण्याच्या राशीवर उभे राहून आपण जनतेला आवाहन करू शकू याची खात्री त्यांना आहे. यशवंतरावांचा आशीर्वाद लाभलेल्या वसंतरावदादा पाटील, शरद पवार यांचीही स्थिती तशीच आहे. ज्या जनतेचे ते लोकनेते आहेत, त्या जनतेशी त्यांचे 'आई-मुलाचे' नाते आहे. विठ्ठलराव-जयंतराव यांची स्थिती तशी नाही. वाड-वडिलांच्या पुण्याईने काही संस्था त्यांचे हाती आहेत. त्या संस्थांतून एक प्रकारचे प्रतिष्ठित राजकारण ते करू शकतात. पण असे राजकारण सत्तास्थाने मिळवून देऊ शकत नाही. अशा राजकारणातून त्यांना फारतर पुणे विद्यापीठाचे कुलगुरूपद मिळू शकेल. खासदारकी किंवा मंत्रिपद नाही. त्यासाठी जमावाचेच राजकारण खेळले पाहिजे, लोकांत मिसळले पाहिजे, जन-आंदोलने केली पाहिजेत. पण विठ्ठलरावांना ज्या जनतेला तोंड द्यायचे आहे ती पडली मध्यमवर्गीय शहरी जनता. ती विठ्ठलरावांचे आणीबाणीतले चाळे आणि जयंतरावांचे उर्मट अग्रलेख सहजी विसरणार नाही; जनतेला आणीबाणीचा विसर पाडायला लावील इतकी पुण्याईही त्यांचे गाठी नाही म्हणून हे माफीचे नाटक.

### माफीचे नाटक

पण विठ्ठलरावांच्या प्रामाणिकपणाविषयी तुम्ही ही शंका का घेता ? त्यांना खरोखर पश्चात्ताप झालाही असेल.

पहिली गोष्ट म्हणजे आणीबाणी पुकारणे हा अपराध होता, असे विठ्ठलरावांनी म्हटलेले नाही. इंदिराबाईंची निवडणूक अलाहाबाद हायकोर्टाने रद्द ठरविली आणि पंधरा दिवसांत आणीबाणी आली यात काही कार्यकारण-भाव आहे, असे त्यांना वाटत नाही. बाईंची निवडणूक रद्द ठरवली गेली, याचा उल्लेखही ते करीत नाहीत. दुसरी गोष्ट अशी की, १९ महिन्यांत जे झाले त्यात कॉंग्रेसची जबाबदारी फक्त नैतिक होती, प्रत्यक्ष जबाबदारी कॉंग्रेसपक्षावर येत नाही; असे ते मानतात. म्हणजे असं की, दडपशाही काय ती सरकारी-यंत्रणेने केली. कॉंग्रेसचा दोष इतकाच की, या दडपशाहीला पक्षाने विरोध केला नाही ! खरी गोष्ट अशी होती की, आणीबाणीत सरकार आणि कॉंग्रेस पक्ष यांत काही अंतरच उरले नव्हते. तिसरे म्हणजे विठ्ठलराव वैयक्तिक माफी मागत नाहीत. सर्व कॉंग्रेसजनांनी माफी मागावी, असे ते म्हणतात. विठ्ठलरावांनी स्वतःपासूनच सुरुवात का करू नये ? गृहपाठ न करता विद्यार्थी शाळेत गेला की, पहिल्यांदा आपल्यासारखेच गृहपाठ न केलेले कितीजण आहेत, हे पाहत असतो; म्हणजे त्या घोळक्यात आपण लपले जाऊ, अशी त्यांची अपेक्षा असते. तसे कॉंग्रेसजनांच्या घोळक्यात स्वतःला लपविण्याचा हा पळपुटेपणा कशासाठी ?


**पूर्णिया**

अनिल अवचट

किंमत : सहा रुपये

राजहंस प्रकाशन

पुणे ३०

आणि आपण असे लपू शकू, अशी आशा विठ्ठलरावांना वाटते तरी कशी? महाराष्ट्राचा दौरा करताना संजयला विमान वापरता यावे म्हणून तर विठ्ठलरावांना संरक्षण खात्यात मंत्री करण्यात आले. आपल्या विमानात संजयला घालून त्याच्यावर चामरे ढाळीत विठ्ठलराव गावोगाव हिंडत होते हे आम्ही विसरू शकणार नाही, मग विठ्ठलरावांनी कितीही तोंड लपविण्याचा प्रयत्न करावा! चौथी, शेवटची सगळ्यांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे, ते फक्त क्षमा मागतात, प्रायश्चित्त घेण्याची तयारी दाखवत नाहीत. कारण आणीबाणीतली दडपशाही ही त्यांच्या दृष्टीने काँग्रेसच्या हातून घडलेली चूक आहे, अपराध नाही. 'आणीबाणीचा गैरवापर केला जाईल, याची कल्पना बहुसंख्य काँग्रेसजनांना आली नाही' ही ती आपाततः घडलेली चूक होय. पण जनतेच्या दृष्टीने आणीबाणी आणि दडपशाही ही काँग्रेसच्या हातून नकळत घडलेली चूक नव्हती, तो काँग्रेसच्या हेकट, कर्कश आणि सत्ताभिलाषी नेतृत्वाने जाणून-बुजून केलेला गुन्हा होता. चुकीला माफी मिळू शकते, अपराधाला प्रायश्चित्तच घेतले पाहिजे. तेव्हा काँग्रेसजनांच्या घोळक्यात लपून, आणीबाणीतल्या दडपशाहीला आपण फार तर नैतिकदृष्ट्या जबाबदार होतो अशी बतावणी करीत, झाली चूक ती नकळत झाली, अशा मानभावीपणाने छद्मी माफी मागून आपल्याला मोकळे होता येईल आणि जनतेपुढे उजळ माथ्याने मिरवायला मोकळीक मिळेल अशी विठ्ठलरावांची समजूत असेल तर ते जमणार नाही, असे त्यांना स्पष्टपणे सांगितले पाहिजे.

### प्रायश्चित्ताचा विधी

पश्चात्ताप प्रामाणिक असल्याची खात्री पटविण्यासाठी काय केले पाहिजे?

विठ्ठलरावांनी प्रथम राज्यसभेच्या सभासदत्वाचा राजीनामा दिला पाहिजे. मागे हाफीज महंमद इब्राहिम म्हणून एक मंत्री होते. ते राज्यसभेत होते. त्रेसष्ट साली त्यांनी कृपलानींविरुद्ध लोकसभेची निवडणूक लढवली. तीत त्यांचा पराभव झाला. त्यानंतर त्यांनी तावडतोब मंत्रिपदाचाच नव्हे तर, राज्यसभेच्या सभासदत्वाचाही राजीनामा दिला. ही 'अभिमानास्पद परंपरा' विठ्ठलरावांनी राखली पाहिजे. नाहीतर पश्चात्तापाचा हा उमाळा म्हणजे जनतेची फसवणूक आहे, असेच मानले जाईल. त्यानंतर विठ्ठलरावांना प्रायश्चित्त देण्याचा विधी ठरवता येईल.

हा विधी कोणता?

विठ्ठलरावांनी 'सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटी' किंवा 'सिटिझन्स फॉर डेमॉक्रसी' अशासारख्या संस्थेला आपण प्रायश्चित्त घेणार असल्याचे कळवावे. त्या संस्थेने जनतेकडून विठ्ठलरावांच्या राजकीय जीवनाविषयी असलेल्या सर्व शंकाकुशंका आणि प्रश्न मागवावेत. त्या प्रश्नांच्या आधारे एक उलटतपासणी घ्यावी. उलटतपासणीनंतर विठ्ठलरावांचा जो काही अपराध ठरेल त्यानुसार न्यायमूर्तींनी त्यांना शिक्षा द्यावी. हे न्यायमूर्ती निवृत्त राजकीय कार्यकर्ते असावेत. दादा धर्माधिकारी, अण्णासाहेब सहस्रबुद्धे किंवा वि. अ. नाईक अशी किती तरी नावे सुचविता येतील.

मोठाच सोहळा होईल की हा.

ही थट्टा नाही. विठ्ठलराव कर्तृत्ववान आहेत. त्यांच्या हातून अपराध घडला ही गोष्ट खरी. पण आता प्रायश्चित्त घेऊन ते पुनः स्वच्छ मनाने सार्वजनिक कामात उतरले तर, जनतेचे भलेच होणार आहे. □

# विधानसभा निवडणुका

## समझोत्यातील अडचणी

वा. दा. रानडे.

दहा राज्ये आणि दोन केंद्रशासित प्रदेशात विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवार निवडणे, समझोते करणे या हालचालीत गेला आठवडाभर राजकीय पक्ष गढले होते. आज २१ मे हा उमेदवारीचा अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस. त्या दिवसापर्यंत या हालचाली होत्या.

पंजाब, हरियाना, हिमाचल प्रदेश, राजस्थान, उत्तर प्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल, ओरिसा, मध्य प्रदेश ही उत्तरेकडची नऊ राज्ये आणि दक्षिणेत तामिळनाडू अशा दहा राज्यांत व गोवा, पाँडिचरी या दोन केंद्रशासित प्रदेशात १० ते १४ जूनच्या दरम्यान २०७१ जागांसाठी निवडणुका व्हावयाच्या आहेत. याशिवाय काश्मीरमध्येही जून अखेर निवडणुका होतील. त्यांच्या तारखा अजून जाहीर व्हावयाच्या आहेत.

भारताचा राजकीय नकाशा बदलून टाकणाऱ्या आणि काँग्रेसची तीस वर्षांची सत्तेची मक्तेदारी संपविणाऱ्या ऐतिहासिक लोकसभा निवडणुकीनंतर दोन महिन्यांच्या आतच या निवडणुका होत आहेत. या दोन निवडणुकांमध्ये एक महत्त्वाचा फरक म्हणजे, लोकसभा निवडणुका सबंध देशभर झाल्या तर, विधानसभा निवडणुका काश्मीरसह अकरा राज्ये आणि दोन केंद्रशासित प्रदेशात आहेत. सबंध देशात विधानसभांच्या निवडणुका घेण्यास घटनेची अडचण होती. इंदिरा गांधींच्या राजवटीने आणीबाणीत घटनादुरुस्ती करून विधानसभांची मुदत सहा वर्षे केली. त्यानुसार फेब्रुवारी १९७८ पर्यंत निवडणुका घेणे शक्य नव्हते. तातडीने घटनादुरुस्ती करून घेण्यासाठी आवश्यक ते दोन तृतीयांश बहुमत जनता पक्षाला दोन्ही गृहात नव्हते. एक बिल मांडण्याचा प्रयत्नही सरकारने केला, पण राज्यसभेत काँग्रेसने त्याला सुचविलेली दुरुस्ती पास झाली त्यामुळे बिल पुढे न मांडण्याचे जनता सरकारने ठरविले. त्यानंतर उत्तरेकडील नऊ राज्यांपुरत्याच निवडणुका घ्याव्यात असे ठरले. लोकसभा निवडणुकीत या राज्यांत काँग्रेसचा पूर्ण धुव्वा उडाला. नऊ राज्यांपैकी ओरिसात ४, पश्चिम बंगालमध्ये ३, राजस्थानात १, मध्य प्रदेशात १, अशा अवघ्या ९ जागा काँग्रेसला मिळाल्या. पंजाब, हरियाना, हिमाचल प्रदेश, उत्तर प्रदेश, बिहार या पाच राज्यात काँग्रेसला एकही

जागा मिळाली नाही त्यामुळे तेथील विधान-सभा जनमताच्या प्रातिनिधिक राहिलेल्या नाहीत. तेव्हा विधानसभा विसर्जनाची शिफारस या राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी राज्य-पालांना करावी असा सल्ला केंद्रीय गृहमंत्री चरणसिंह यांनी त्यांना दिला. त्यावर केंद्राने असा निर्णय घेतल्यास त्याच्या अंमलबजावणीस मनाई करावी असा अर्ज कॉंग्रेस राज्यांतर्फे सुप्रीम कोर्टात करण्यात आला. कोर्टाने तो फेटाळल्यानंतर विधानसभा बरखास्तीचा जाहीरनामा काढण्यात आला. राष्ट्रपतींनी त्यावर सही करण्यास विलंब लावल्याने पेच-प्रसंग निर्माण होणार काय असे वाटले होते पण तो टळला.

या निवडणुकांत जास्तीत जास्त जागा मिळवून राष्ट्रपती निवडणुकीत आपले बळ वाढविण्याचा जनता पक्षाचा उद्देश आहे. पण लोकसभा निवडणुकांसारखेच मोठे यश या निवडणुकीत जनता पक्षाने मिळवले तरी; तेवढ्या बळावर राष्ट्रपती निवडणूक जिंकणे सोपे जाणार नाही. राष्ट्रपती निवडणुकीत राज्यसभेची मते निर्णायक ठरणार असून तेथे कॉंग्रेसला दोन तृतीयांश बहुमत आहे. काही थोडे सभासद फुटले तरी, तेवढ्याने निर्णायक फरक पडणार नाही. राज्यसभेचे एक तृतीयांश सभासद दर दोन वर्षांनी निवडले जातात. नव्या लोकसभेतील राजकीय पक्षबळानुसार राज्यसभेचे सभासद निवडले जाण्यास सहा वर्षे लागतील. तोपर्यंत लोकसभेच्या नवीन निवडणुका होतील. म्हणजे तोपर्यंत राज्यसभेतील प्रतिनिधित्व पुनः जुने झालेले असेल. राज्यसभेतील प्रतिनिधित्व लोकसभा प्रतिनिधित्वाशी सुसंगत राखण्यासाठी राज्यसभा निवडणुकीची पद्धती बदलायला हवी. लोकसभा निवडणुका व विधानसभा निवडणुका एकाचवेळी व्हाव्या आणि त्यानंतर लागलीच विधानसभा प्रतिनिधींनी राज्यसभा प्रतिनिधींची निवड करावी. राज्यसभेची मुदत लोकसभेच्या मुदतीएवढीच असावी. त्यापेक्षाही महत्त्वाचा प्रश्न म्हणजे राज्यसभेची आवश्यकता आहे काय? याचाही विचार व्हावा. राज्यसभेच्या आतापर्यंतच्या कार्याचा आढावा घेण्यात यावा. लोकसभेपुढे मांडण्यात आलेल्या निरनिराळ्या बिलांत राज्यसभेने कोणत्या दुरुस्त्या सुचविल्या, त्या लोकसभा प्रतिनिधींनी सुचविलेल्या बदलांपेक्षा अधिक लोकहिताच्या होत्या का? राज्यसभा अस्तित्वात नसती तर, देशावर असे कोणते संकट कोसळले असते, की देशाला त्यातून वाट काढता आली नसती. याचाही वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून विचार व्हावा.

राज्यसभेची काही आवश्यकता नाही असे माझे मत आहे. आज राज्यसभेत कॉंग्रेसचे बहुमत आहे म्हणून काही ही सूचना मी केलेली नाही तर, राष्ट्रपती निवडणुकीवर लिहिताना डॉ. झकीर हुसेन यांच्या निवडणुकीच्या वेळीच हे मत मी प्रदर्शित केलेले आहे. त्यावेळी लिहिलेल्या एका लेखात तीन प्रश्न उपस्थित केले होते. १. राज्यसभा आवश्यक आहे का? २. राज्यसभेची निवडणूक कोणत्या पद्धतीने व्हावी? ३. राज्यसभा सभासदांना राष्ट्रपती निवडणुकीत मतदानाचा अधिकार असावा काय? सध्याच्या घटनेप्रमाणे राज्यसभेचे सभासद हे काही लोकांनी प्रत्यक्ष निवडलेले नसतात. तर विधानसभांच्या सभासदांमार्फत त्यांची निवड होते. विधानसभा सभासदांना राष्ट्रपती निवडणुकीत मतदानाचा अधिकार असताना त्यांनीच निवडलेल्या राज्यसभेच्या सभासदांना मतदानाचा हक्क देणे म्हणजे विधानसभा सभासदांनी एक प्रकारे दोनदा मतदान करण्यासारखे आहे. लोकशाही तत्त्वांशी, हे विसंगत आहे. ज्या कारणांसाठी विधानपरिषद सभासदांना राष्ट्रपती निवडणुकीत मतदानाचा अधिकार नाही त्याच कारणांसाठी राज्यसभा सभासदांनाही तो अधिकार नसावा असे मी त्या लेखात प्रतिपादले होते व तेच माझे आजही मत आहे.

राज्यसभा नको त्याचप्रमाणे विधानपरिषदाही नकोत. ज्यांना लोकसभा व विधानसभेवर निवडून आणता येत नाही, ज्यांना या निवडणुकांची दगदग न करता त्याचे फायदे मात्र हवे आहेत त्यांच्यासाठी राज्यसभा व विधानपरिषदा आहेत. आपल्या काही नेत्यांची सोय करण्यास राजकीय पक्षांना या संस्था सोयीच्या वाटत असल्याने त्यांची काही आवश्यकता नाही हे मत राजकीय नेत्यांपैकी कोणीही आग्रहाने मांडले नाही. पण तात्पुरत्या फायद्याचा विचार बाजूला ठेवून शुद्ध लोकशाही भूमिकेतूनच या प्रश्नांचा विचार होणे आवश्यक आहे.

विधानसभा निवडणुकांसाठी समझोते करणे लोकसभा निवडणुकांइतके सोपे नाही असा अनुभव जनता पक्षाला त्याचप्रमाणे कॉंग्रेसलाही येत आहे. पश्चिम बंगालमध्ये जनता पक्ष आणि मार्क्सवादी आघाडी यांच्यात समझोत्याच्या वाटाघाटी फिसकटल्या. समझोत्यासाठी आणखी प्रयत्न होतील पण त्यात यशाची फारशी आशा नाही. निवडणुकीनंतर संयुक्त सरकार स्थापण्याबाबत आणि किमान कार्यक्रमाबाबत एकमत व्हावे अशा मार्क्सवाद्यांच्या प्रथम दोन भेटी झाल्या पण त्याबाबतीत त्यांनी आग्रह धरला नाही. लोकसभा निवडणुकांत मार्क्सवादी आघाडीस ३१ टक्के व जनता पक्ष आणि लोकशाही कॉंग्रेसला २१ टक्के मते मिळाली. जागा मार्क्सवादी आघाडीस २५ व जनता पक्ष–लोकशाही कॉंग्रेसला १४ मिळाल्या हे प्रमाण लक्षात घेता आपणास बहुसंख्य जागांची मागणी मार्क्सवाद्यांनी केली असती, तरी ते समर्थनीय ठरले असते. पण त्यांनी २९४ पैकी १४० म्हणजे ४८ टक्के जागांची मागणी केली. जनता पक्ष १०४ पेक्षा अधिक जागा देण्यास तयार नाही त्यामुळे बोलणी फिसकटली. ओरिसामध्ये नंदिनी सत्पथींना निवड समितीवर घेण्यास व तिकीट देण्यास काहींना विरोध होता. उत्तर प्रदेशात चरणसिंहांनी निरीक्षकपदाचा राजीनामा दिल्याने पेच निर्माण झाला होता पण तो टळला. तामिळनाडूमध्ये कॉंग्रेस आणि अण्णा द्र. मु. क. यांच्यातील समझोत्याची बोलणी फिसकटली. जनता पक्षानेही कोणाशी समझोता केला नाही त्यामुळे तेथे बहुरंगी सामने यावेळी होतील व कोणत्याही एकाच पक्षास बहुमत मिळणे कठीण आहे.

# मुंबईच्या अवतीभवती वाढणाऱ्या कारखानदारी जगतात अलीकडे घडलेल्या काही सत्यघटनांवर आधारित एक छोटी कादंबरी ( पूर्वार्ध )

# ॥ लढा ॥

## माधव शिरवळकर

गुळाच्या कणाभोवती जशा एक एक मुंग्या जमा व्हाव्यात तसे ऑफिसच्या कडेकडेने कामगारांचे घोळके जमा झाले. सगळे अजून तरी गप्प होते. पण साऱ्या ऑफिसला केव्हाच चाहूल लागली होती. त्याच वेळेला आठवलेसाहेबांचा फोन खणखणला आणि फॅक्टरीतलं काम कामगारांनी बंद केल्याचं त्यांना कुणीतरी कळवलं. फोन ठेवल्यानंतर दोन तीन क्षणांतच खाली जमलेल्या कामगारांची चाहूल आठवलेसाहेबांनाही लागली. डोकं खिडकीबाहेर काढून त्यांनी खाली पाहिलं आणि मनातून ते चरकले. हा काय प्रकार आहे, ह्याचा ते विचार करू लागले, तेव्हा, युनियनचं हातभर पत्र त्यांच्या डोळ्यांसमोर आलं, आणि त्यांनी रुमालानें घाम टिपला. हात सरावल्यासारखे फोनकडे गेले आणि पर्सोनेल मॅनेजर सबनीस लाईनवर आले.

एकदम स्फोट व्हावा तशा घोषणा सुरू झाल्या. 'वालावलकर इंडस्ट्रीज लिमिटेड वर्कर्स युनियन झिंदाबाद', 'युनियनच्या पत्रांचा ?...जबाब द्या — जबाब द्या', 'आमच्या मागण्या ?...मान्य करा—मान्य करा', 'वालावलकर इंडस्ट्रीज लिमिटेड वर्कर्स युनियनचा ?...विजय असो—विजय असो.' घोषणांच्या त्या गोंधळात आठवलेसाहेबांना फोनवर बोलणंही अवघड जात होतं. त्यांनी फोन आपटला आणि खस्सकन् बेल दाबली. केबिनचं दार किलकिलं करत एकनाथ आत आला. आठवलेंनी त्याला पाणी आणायला सांगितलं.

वातावरण एकाच बिंदूभोवती एकवटलं. सगळे डोळे आपल्या नजरा खाली फेकू लागले. कामगारांचं चित्रण करू लागले. सगळ्या पोरींचे टाईपरायटर बडबडायचे थांबले. बऱ्याच तोंडांनी 'आ' केला. 'आज काय होणार' हा प्रश्न असंख्य प्रश्नचिन्हे फेकू लागला. फॅक्टरीतलं काम कामगारांनी थांबवलं होतं आणि त्यांनी काम का थांबवलं हे पाहण्यासाठी ऑफिस स्टाफचं काम विनाकारण बंद पडलं होतं.

आवाज एकवटत गेला. घोषणा बंद होतील तर बर असं वाटू लागलं. ऑफिसची बिल्डिंग थरथरा कापू लागली. त्याच गोंधळात पर्सोनेल मॅनेजर सबनीस पळत पळत आठवलेसाहेबांच्या केबिनमध्ये शिरले. मागोमाग एकनाथनं थंड पाण्याचा ग्लास आणून ठेवला. क्षणात तो रिकामा झाला. पाणी पिऊन दम घेत आठवलेंनी डाव्या हातानेच सबनिसांना बसायला सांगितलं. घोषणांमुळे सबनीसांचं डोकं ढवळलं होतं. आठवलेंनी कपाळाला आठ्या घालत बोलणं सुरू केलं —

'मिस्टर सबनीस, काही दिवसांपूर्वी युनियनकडून एक पत्र आपल्याला आलं होतं. त्याच्यावर आठवण करण्यासाठी मी तुम्हाला सांगितलं होतं. तुम्ही मला आठवण केली नाहीत. फर्स्ट थिंग ? ओके. नाऊ हा प्रॉब्लेम आपल्याला फेस करावा लागणार आहे. बघू ते लेटर कुठे आहे ? '

'अं साहेब, ते लेटर...म्हणजे ह्या क्षणाला अॅव्हेलेबल नाही...म्हणजे ते कुठे आता सापडत नाहीय्ये, कुठेतरी फाईल केलंय...म्हणजे — '

'ओहो मिस्टर...सब—' आठवलेंनी कपाळावर हात मारला. 'छाः मिस्टर सबनीस, यू आर पर्सोनेल मॅनेजर ऑफ धीस वेलनोन कन्सर्न. अहो आज मी नसतो तर, हा लेबर प्रॉब्लेम तुम्हाला फेस करावा लागला असता. खुशाल तुम्ही म्हणता पत्र हरवलं म्हणून. अहो हे कामगारांना कळलं तर गळा धरतील तुमचा—आमचा. डू यू इमॅजिन. महत्त्वाचे पेपर्स तरी नीट सांभाळायचे. हाऊ केअरलेस! आता बोला काय करायचं ? तुम्ही हा प्रॉब्लेम फेस करता? '

सबनिसांनी मान टाकली. ते 'व्हेरी सॉरी—सॉरी ' वगैरे बडबडत राहिले.

'तुम्ही मला वेळेवर आठवण केली असतीत तर, काहीतरी थातुरमातुर रिप्लाय दिला असता. ही वेळ आली नसती. एनी वे. नाऊ...'

आठवलेसाहेब हात चोळत इकडे तिकडे पाहू लागले. एव्हाना त्यांच्या टायची गाठ ढिली पडली होती आणि एअर कंडिशन्ड केबीनमध्येसुद्धा त्यांना तो उबदार कोट काढावा लागला होता. मॅनेजिंग डायरेक्टरच्या जबाबदारीनं त्यांना घाम फुटला

होता. खाली नव्या नव्या घोषणा जन्म घेत होत्या. आवाज चढत होता.

आठवलेसाहेबांनी घाई केली. पटकन एक कोरं पॅड पुढं काढलं. त्यावर उंची बॉल पेननं खरडत सहीचा रपाटा ओढून टर्रकन कागद फाडून सबनीसांना दिला आणि उतावीळपणे म्हणाले—

'गो. गो. बीं हरी, गिव्ह धीस टू युनिअन पीपल, रिक्वेस्ट देम टू स्टॉप शाऊटिंग...'

'सर हे प्रभाकर शेलारकडे पाठवू नं'

'ऑफ कोर्स यू मिस्टर सबनीस...प्रभाकर शेलार हा एकच चॅप ह्या युनिअनचा होल अँन्ड सोल लीडर आहे हे मी तुम्हाला सांगू का? मिस्टर सबनीस यू हॅव वरीड, लर्न टू होल्ड युवर पेशन्स, गो. बी. हरी.

सबनीस धावलेच. आठवलेसाहेबांच्या केबीनचा दरवाजा आपोआप बंद झाला. एकनाथने चंची सावरत पटकन उठून सबनीसांना सलाम ठोकला आणि सबनीस तावातावाने पर्सनल डिपार्टमेंट म्हणजे त्यांच्या राज्यात शिरले.

● ●

आठवलेसाहेबांना हे प्रकरण हाताळायचं होतं. त्यांना नक्की काहीच सुचत नव्हतं. वालावलकर साहेबांना फोन करावा असं त्यांना वाटलं. पण त्यांचे तेच साशंक झाले. एकतर, वालावलकर साहेब वेळी अवेळी भेटणं कठीण होतं. दुसरं म्हणजे काही तोडगा काढण्याऐवजी ते भडकले असते आणि पोलिसांना बोलावून त्यांच्या मदतीनं कामगारांना थोपवायला सांगून त्यांनी फोन बंद केला असता, किंवा त्यांनी स्वतःच पोलीस कमिशनरला फोन केला असता. कारण कमिशनर त्यांच्या चांगल्या परिचयाचा होता. आणि सगळं कमिशनरवर सोपवून आठवलेना गप्प राह्यला सांगितलं असतं. पण कामगारांचा गलका ऐकून आठवले साहेबांच्या डोक्यात चिखल झाला असता आणि शिवाय प्रकरण थोडं गरम व्हायचा संभव होता. आठवले सुन्न झाले होते.

तसे वालावलकर इंडस्ट्रीजमध्ये येण्यापूर्वी बाहेरच्या कंपन्यांत त्यांनी लेबर ऑफिसरच्या जबाबदारीनं लेबर प्रॉब्लेम्स हाताळले होते. पण एकूण जबरदस्त तडाखे आठवलेसाहेबांनी कधी अनुभवलेच नव्हते. आता पूर्वी महागाई कमी होती म्हणून म्हणा, किंवा आठवलेसाहेब सुदैवी म्हणून म्हणा, त्यांच्या पंचवीस वर्षांच्या Executive Service मध्ये त्यांनी लेबर डिसप्युट्स् अनुभवायला पाहिजेत तसे अनुभवले नव्हते. आठवलेसाहेब सुदैवी हेच खरं. कामगार म्हणून जीवन सुरू करून ते मॅनेजिंग डायरेक्टरच्या पदापर्यंत गेले होते. बरेच वर्षे बऱ्याच कंपन्यांत लेबर ऑफिसरची नोकरी झाल्यानंतर वालावलकर साहेबांच्या सासुरवाडीकडले नातेवाईक म्हणून ते वालावलकर इंडस्ट्रीजमध्ये आले. पर्सोनेल मॅनेजर म्हणून. पुढे जनरल मॅनेजर, पुढे मॅनेजिंग डायरेक्टर साहेबांच्या सौजन्याने आठवलेंचा एवढा प्रवास झाला. आता मॅनेजिंग डायरेक्टर म्हणून अवाढव्य पगार खाताहेत पन्नास एक्कावन्नाव्या वर्षी. तर त्यांचं हे असं सगळंच सुदैव. आज हा वर्कर्स प्रॉब्लेम म्हणजे त्याला लागलेलं गालबोट, असंच एखादं.

● ●

आज राडा होणार हे काही अगोदर ठरलेलं नव्हतं. पण आज दुपारी गप्पा मारता मारता पवार जे बोलला ते ऐकून प्रभाकर भडकला. प्रभाकरला भडकवायचं असा काही हेतू पवारचा नव्हता. पण पवारच्या बोलण्याने प्रभाकर सणकला.

देवळीकरच्या कॉलेजच्या परीक्षेसाठी रजा नाकारली होती. चौगुलेला गावाला बाप आजारी आहे म्हणून रजा पाहिजे होती. पण प्रोसीजरला दोन दिवस लागणार होते. त्यामुळे तो वैतागला होता. कुणाला कर्ज मिळत नव्हतं. कुणाचं काय कुणाचं काय. कुठचाही कामगार वैतागला की, तो प्रभाकर शेलारकडे यायचा आणि वैतागून बोलायचा. म्हणजे अजूनीही असंच चालतं. प्रभाकर ऐकून घेतो. अगदीच वाटलं तर त्याच्याकडे एक लाल डायरी असते त्याच्यात लिहून घेतो. मग विचार करतो आणि त्याला ठीक वाटलं तर, जीव ओतून थेट एम. डी. कडे जावून तो ते मिळवतोच.

देसाई हीटवर काम करतो. हातानं उचलता येणार नाही असं लोखंड देसाईच्या भट्टीत वितळतं आणि कोळशासारखा देसाई घामानं थबथबून खुनाकडे पहावं तसं भट्टीत पाहत काही ना काही आत लोटत असतो. पलीकडून लोखंडाचा तपकिरी रसरसता रस मोठ्या बॅरलमधून पुढे जातो. ह्यामुळं देसाईचं डोकं नेहमीच भट्टीसारखं तापलेलं असायचं. मुतारीतसुद्धा तो 'आयाबैनी' उद्धारत हळदीच्या पाण्यासारखा मुतत असे वीस-वीस मिनीटं. देसाईला कुठून तरी कळलं आणि त्याचं डोकं फिरलं. इतर कंपन्यांत हीटवर काम करणाऱ्याला भरपूर बार्ली वॉटर मिळायचं आणि हीट अलाऊन्स १० रु. नी जास्त मिळायचा. त्याचं कामही देसाईपेक्षा हलकं असायचं. हे ऐकून देसाई आपलं दब्ब शरीर गदागदा उडवत प्रभाकरकडे गेला आणि प्रभ्याच्या अंगावर त्यानं शब्दांचे विस्तव फेकले, तेव्हा प्रभाकरने विचार करून ते डायरीत लिहून देसाईला थोपटत शांत केला होता आणि प्रभाकरचं हृदय भरून आलं होतं.

● ●

वालावलकर इंडस्ट्रीजच्या कामगारांचं आणि त्यांच्या युनिअनचं एक वेगळेपण होतं. प्रभाकर शेलारची एकुलती एक युनिअन वालावलकर इंडस्ट्रीजवर राज्य करीत होती. प्रत्येक कामगार युनिअनचा सभासद होता. त्याला अपवाद असायचे टेम्पररी असलेले कामगार. शिवसिंगसारखे कामगार आठ-आठ दहा-दहा वर्षं काम करून टेम्पररी होते. पण त्यांना तोंड नव्हतं. एका कागदाच्या चिटोऱ्याबरोबर ते केव्हाही बायका-मुलांसकट अन्नाला मोताद व्हायचे. केव्हाही ब्रेक मिळायचा. व्हाऊचरनं पगार दिला जायचा आणि तो कामगार सद्गदित होऊन पुन्हा कधी बोलावणार याची केविलवाणी चौकशी करायचा. हे दहा दहा वर्षं सुद्धा चालायचं. चालतं. पण प्रभाकर शेलार वगैरेंच्या हे हाताबाहेरचं असायचं. टेम्पररी कामगार युनिअनचं सभासदत्व घेऊ शकत नव्हते. काही करू शकत नव्हते.

प्रभाकर शेलार एक कामगारच होता. तोही एक मशीन ऑपरेटरच होता. अडीच तीन रुपये रोज, अधिक महागाईभत्ता वगैरे वाला. पण ही किंमत त्याच्या पगाराची होती. कामगारांकडे प्रभाकरची जी किंमत होती तिने तो वालावलकर इंडस्ट्री विकत घेऊ शकला असता.

मनुष्य अडला म्हणजे जसा देवाला नवस करतो तसा प्रत्येक कामगार प्रभाकरला गाठायचा. कुणाची बायको बाळंत होणार आहे पण हॉस्पिटलला पैसा नाही, पावसाळा आला झोपडी कोसळली, भाडं थकलं. नोटीस आली वगैरे. तेव्हा प्रभाकर वाट्टेल ती हालचाल करून कुठूनतरी कर्ज मिळवून देणारच. कुणी दारू प्यायला तर, प्रभाकरची मुस्कटात बसायची आणि पगार घेतला की, बऱ्याच कामगारांचे रजा मारून हे कार्यक्रम चाललेलेच असायचे. किती कामगारांचा पगार कामगारांच्या बायकापोरांपर्यंत पोचवण्याचं काम प्रभाकरला करावं लागायचं. काम झालं की, कामगार प्रभाकरच्या पाया पडायचाच तेवढा उरायचा. प्रभाकरनं म्हटलं असतं तर, कंपनीतल्या बाराशेच्या बाराशे कामगारांनी आत्महत्यासुद्धा केली असती.

प्रभाकर हा कामगारांचा देवदूत होता. तसा तो एवीतेवी इतर कामगारांसारखाच होता. मात्र इतरांपेक्षा तो उंचपुरा, पिळदार शरीराचा आणि तिखट जबानीचा होता. प्रभाकर केवळ मॅट्रीक होता. पण घरी कार्ल मार्क्स, लेनीन, एन्जेल्स वगैरे साहित्य पडलेले असायचे, ट्रेड युनिअनिझमवरची पुस्तकं असायची. ई. एस. आय ॲक्ट, वर्कमेन्स कॉंपेन्सेशनसारखी कायद्याची पुस्तकं लाकडी रॅकमध्ये लावलेली असायची.

प्रभाकर त्याच्या वडिलांविषयी कधीकधी बोलायचा. कामगार कल्याण आणि कामगार चळवळ ह्यांत जीवन समर्पण करून त्याच्या वडिलांनी देह ठेवला. तो वडिलांना मानायचा. घरी त्याच्या वडिलांच्या फोटोला चंदनाचा गोंडेरी हार असायचा. त्यात मध्ये मध्ये गुलाबाची लाल फुलं असायची. मग त्याच्या वडिलांचा सात्त्विक चेहरा अधिकच सात्त्विक दिसायचा. प्रभाकरच्या वडिलांना सून बघायची होती. पण ते त्यांच्या नशिबी नव्हतं. मात्र प्रभाकरनं आपल्याच पावलावर पाऊल ठेवल्याचं त्याच्या वडिलांनी पाहिलं होतं. वडील गेल्यानंतर प्रभाकर लग्नाविषयी अतिशय उदास झाला आणि त्यानं जास्तीत जास्त वाचन आणि कामगार समस्या यांचा अभ्यास सुरू केला. सत्तावीस अठ्ठावीस वर्षांचा प्रभाकर तारुण्याच्या तेजाखाली होता. पण विचाराने अतिशय प्रौढ होता. परिपक्व होता.

● ●

देसाई, देवळीकर, चौगुलेसारख्या कामगारांच्या समस्या आणि विशेष पगारवाढीची मागणी ह्यासंबंधी एक प्रदीर्घ पत्र प्रभाकरने मॅनेजमेंटला पाठवले होते. युनिअनच्या मीटिंगमध्ये वाचून मान्य करून प्रभाकरने त्याच्यावर सही केली होती. पत्रावर ताबडतोब हालचाल व्हावी अशी प्रभाकरची अपेक्षा होती. तशीच इतर कामगार हीच आशा बाळगून होते. आठवलेसाहेब तसे प्रॅक्टिकल होते. त्वरित हालचाल हा त्यांचा गुण होता. पण ह्या पत्रावर महिना झाला तरी काहीच हालचाल नव्हती. कामगार प्रभाकरजवळ चौकशी करायचे आणि प्रभाकरलाही उत्तर देताना त्रास व्हायचा. आज दुपारीच पवार 'पत्राखाली आणि वर काही दडपणं आहेत का ?' असं थुंकून बोलला तेव्हा प्रभाकरने निदर्शने करण्याचा निर्णय घेतला. पत्र स्वतः आठवलेसाहेबांना भेटून दिलेले होते आणि चार चार पाच पाच दिवसांनी चौकशी केली होती. पर्सोनेल मॅनेजर सबनीस यांच्याकडे पत्र सोपवलेलं होतं आणि सबनीस सदैव बीझी असायचे. आठवलेसाहेब सबनीसांकडे पाठवायचे आणि सबनीस 'आज उद्या' करायचे आणि ह्यात महिना निघून गेला होता. प्रभाकरने संध्याकाळी ४ वाजता ऑफिसच्या पायथ्याशी सर्वांना बोलावले आणि सोक्षमोक्ष करण्याचा निर्णय घेतला.

संध्याकाळी शे-दोनशे कामगार जमल्यानंतर प्रभाकरने पहिली घोषणा दिली, 'वालावलकर इंडस्ट्रीज लिमिटेड कामगार युनिअन झिंदाबाद.' झिंदाबादचा गजर झाला आणि 'पत्राचं उत्तर द्या, कामगारांचं मोल जाणा' वगैरे घोषणा पेटल्या. बराच वेळ घोषणांचं चक्र गरगरत राहिलं. प्रभाकरचा आवाज चढत चढत बुलंद झाला. तो बेभान झाला. त्याची स्थिती पाहून सर्व कामगार भट्टीत पडल्यासारखे घोषणा देऊ लागले.

मळकट, मेनचट कपडे, तोंडे आणि केस तांबारलेले, कितीतरी दिवसांत तेल न मिळाल्याने केस राठ आणि भुरकटलेले, साठ सत्तर पाय अनवाणी, कितीतरी पाठी रफूच्या, कितीतरी डोळे पिकल्या तोंडल्यासारखे लाल झालेले पिऊन पिऊन. पण प्रभाकरच्या नेतृत्वाखाली सर्वांची जात एकच होती. कामगार.

आठवलेसाहेबांची चिठ्ठी घेऊन पर्सनल डिपार्टमेंटचा माणूस दबकत दबकत आला तेव्हा घोषणा थंड झाल्या. प्रभाकर चिठ्ठी वाचत होता आणि इतर कामगार त्याच्या मानेवरून डोकावून डोकावून पाहत होते. काही क्षणातच प्रभाकरने गिरकी घेतली आणि कामगारांच्या गर्दीकडे तोंड केले. त्याने सर्वांना बसण्याची खूण करताच पायाचे स्क्रू ढिले पडावेत तसे एक एक एक एक खाली बसले. एकटा प्रभाकर उभा होता. त्याच्या ओठातून शब्द झिरपू लागले. मन फुरफुरू लागलं.

'बंधूंनो, आपणा सर्वांना माहीत आहे की, आपण गेल्या छत्तीस दिवसांपूर्वी एक पत्र आपल्या कंपनीच्या मॅनेजमेंटला पाठविलेले होते. कोणत्याही प्रकारचे उत्तर मॅनेजमेंटने आपल्याला ह्या क्षणापर्यंत दिलेले नाही. आत्ता माझ्या हातात जो कागद आहे तो आपल्या एम. डी. साहेबांनी पाठवलेला आहे. त्यांना प्रश्न चर्चेने सोडवायचे आहेत. योग्य मार्गाने सोडवायचे आहेत. मित्रांनो, आपण काही त्यांना आपले प्रश्न सोडविण्यासाठी इतर मार्ग अवलंबायला सांगितलेलं नव्हतं. योग्य मार्गाने प्रश्न सुटावेत, असं मॅनेजमेंट कागदावर लिहिते, पण आम्ही ते हृदयावर लिहिलेले आहे. हे सांगितलेच पाहिजे असं नाही. पण मॅनेजमेंटने आमच्यावर विश्वास ठेवावा. आमचे हृदय फाडून बघण्याचा प्रयत्न करू नये, अशी माझी त्यांना कळकळीची विनंती आहे.'

'मित्रांनो, आपल्याला माहीत आहे. महागाई पाऱ्यासारखी वरवर चढते आहे. तरी गेले सहा वर्षं आपल्याला विशेष पगारवाढ, विशेष प्रकारचे आर्थिक फायदे, विशेष सोयी, की ज्या इतर आपल्यासारख्याच कंपन्यांतून देण्यात येतात ह्याला आपण अद्यापी वंचित आहोत. गेल्या सहा वर्षांत दरवर्षी कंपनीचा फायदा कितीतरी लाखांनी वाढतो आहे तरी दरवर्षी बोनससाठी आपण घसा फोडतो आहोत, मनात नसतानाही संप करतो आहोत. बोनस मिळण्याची ही एक पद्धत झालेली आहे. कामगार चरफडला, तरफडला, दुःखी झाला तर, मालकाला आनंद होतो, हेच कामगारांचे मोठे दुःख आहे. त्यांना उत्पादनवाढ पाहिजे. आम्ही देऊ. रक्त ओकू. रक्त आटवू. उत्पादनवाढ

देऊ. त्याच वेळेला आम्ही आमचा मोबदला विचारला तर, आम्ही चुकतो काय ? देणं घेणं हा व्यवहार आहे. कामगारांपेक्षा मालक सूज्ञ आहे. स्वतःला म्हणतात तरी तसं. पण हा सूज्ञपणा आम्हाला दिसू शकत नाही. तो अस्तित्वात आहे काय ? बंधूंनो, उत्पादन वाढले, नफा वाढला, महागाई तर मानगुटी-वर बसली. आपण मात्र पूर्वी होतो तसेच आहोत. पूर्वीपेक्षा अधिक दबलो गेलो आहोत. मित्रांनो मी आता वेळ घेणार नाही कारण मला माहीत आहे की, मॅनेजमेंटबरोबर झालेल्या चर्चेचा वृत्तान्त ऐकण्यासाठी तुम्ही थांबणार आहात. वाट पाहणार आहात. मी अपेक्षा करतो आपल्या मॅनेजमेंटला सुबुद्धी होईल.'

मग 'वालावलकर इंडस्ट्रीज लिमिटेड कामगार युनिअन झिंदाबाद'चा प्रचंड गजर झाला आणि गर्दी पांगली. प्रभाकर ऑफिस-मध्ये शिरला. बाहेर वैकुंठ पानवाल्याची गर्दी वाढली आणि शेट्टीचं चालू चहाचं पिप खाली झालं.

● ● ●

'तुमचा माझ्यावर विश्वास आहे की नाही' आठवले प्रभाकरला शांत करीत विचारत होते.

'साहेब प्रश्न विश्वासाचा नाही. व्यव-हाराचा आहे. आमचे पत्र मिळाले अशी लेखी पोचसुद्धा तुम्ही आम्हाला दिलेली नाही. ते सोडलं. पण मी स्वत: तीनचार वेळा टेलिफोन करून विचारलं, तुम्ही सब-नीसांकडे जायला सांगितलं. सबनीससाहेब 'आज उद्या आज उद्या' करायला लागले. एकदा चिकाटी धरून बसलो तेव्हा 'आज बघू' म्हणाले. त्यांचा 'आज' काही उजाडला नाही. आणि आम्हाला 'हे' करा-यची पाळी आली.'

'पण मिस्टर शेलार हा काही मार्ग नव्हे'. आठवलेसाहेब चष्मा टेबलावर ठेवत म्हणाले. चष्मा बाहेर काढला तेव्हा ते फारच भयानक दिसले. पण काचा पुसून जेव्हा तो पुन्हा डोळ्यावर बसला तेव्हा गुप्त झालेले आठ-वलेसाहेब पुन्हा आलेत असं वाटलं.

'सगळेच मार्ग बंद झाले तेव्हा हा मार्ग दिसला. साहेब स्पष्ट बोलतो, राग मानू नका, पण तुम्ही लोक इकडे एअरकंडिशन्ड केबीनमध्ये बसता, आमच्या पाचपट पगार घेता पण एक दिवस आम्ही कामगार लोखं-डाच्या भट्टीवर आमच्या शरीराचं कसं पाणी करतो हे पहा. एकदा पहा तुम्ही. माणसाला हृदय असेल तर, त्याच्या डोळ्यांतून नक्कीच पाणी येईल. त्याची आतडी पिळवटेल — नक्कीच.'

आठवलेसाहेबांनी कर्रर्र करून बेल दाबली आणि एकनाथला प्रभाकरसाठी थंड पाणी आणायला सांगितलं.

'सी, मिस्टर शेलार, तुमच्या मागण्या अवास्तव आहेत असं मला म्हणायचं नाही. तुम्हाला काही मिळू नये असंही मला वाटत नाही तुमचा जर असा समज असेल की, तुमचं लेटर मी दडपून ठेवलं, तर ते खरं नाही. एखादी गोष्ट अमलात आणताना मॅनेजमेंटला विचार करावा लागतो. बरं; मी काही वाटेल तो निर्णय घेऊ शकत नाही. माझ्यावरसुद्धा डायरेक्टर बोर्ड आहे. काही लिमिटेशन्स असतात.'

'बोर्ड आणि लिमिटेशन्स अशा गोष्टी आम्हाला सांगू नका. मागे आपले वीस ऑफिसर्स जर्मनीला गेले तेव्हा वालावलकर साहेबांनी नुसत्या फोनवर केवढी मोठी अमाऊंट सँक्शन केली होती. स्वत:च्या अधिकाराखाली नंतर एका महिन्याने बोर्ड मीटिंगमध्ये तो एकमताने निर्णय घेतला. वालावरकरसाहेब म्हणतील तशी पूर्व दिशा आहे. कारण बहुतेक भागभांडवल त्यांचंच आहे. त्यांनी उद्या ठरवलं तर, पुढच्या महि-न्यापासून आम्हाला सुधारित पगार मिळेल. तेव्हा साहेब बोर्ड वगैरे सगळं नावाला आहे, तुम्ही वालावलकरसाहेबांना विचारा. आम्ही ३६ दिवस थांबलो असे अजून ३–४ दिवस थांबू.'

शेलार तुम्ही म्हणता इतकं काही साधं सरळ नसतं. कंपनीच्या बजेटवर किती बोजा पडेल, काही सरकारी निमसरकारी निर्बंध ह्यांचा विचार करता करता वेळ जातो. बरं, कायद्याप्रमाणे अशा गोष्टींबद्दल बोर्ड मीटिंग-मध्ये निर्णय घ्यावा लागतो. तुमच्या पत्रावर खूप विचार केला आहे. चार दिवसांपूर्वीच सेक्रेटरीला सांगून अजेंड्यावर तुमचा विषय ठेवला आहे पुढल्या बोर्ड मीटिंगला. आता तुम्हाला काय म्हणायचंय ?

'गेल्या बोर्ड मीटिंगच्या अजेंड्यावर हा विषय का ठेवला नाही, हे सांगाल का ?

तेव्हा वालावलकरसाहेब म्हणाले की, 'पुढच्या अजेंड्यावर ठेवा, ह्या वेळेस फार विषय आहेत. दुसरा हेतू नाही.'

'साहेब, बोर्ड मीटिंगनंतरच्या पार्टीत किती वेळ जातो, हे मला माहीत आहे. तो वेळ कामगारांना त्यांच्या प्रश्नासाठी देता आला असता. पण वालावलकरसाहेबांची पॉलिसी निराळी आहे. हे मला माहितीय. तेवढाच एक महिना त्यांनी पुढे ढकलला. आणि आम्ही आमच्या पत्राचं विसरलो असतो तरी, ते त्यांना हवंच होतं.

'सी. शेलार, अशी बोलणी करण्यात आपण नाहक वेळ घालवतोय. मी आजच वालावलकरसाहेबांशी संपर्क साधतो. त्यांच्या कानांवर सर्व गोष्टी सविस्तर घालतो, आणि एवढं आश्वासन देतो की, तुमच्या मागण्यां-साठी मी शिफारस करीन आणि शक्य तेवढा प्रयत्न करीन. शेलार, परहॅप्स यू डोन्ट नो. कामगाराचं जीवन मी काही काळ जगलो आहे. कामगार मी जवळून पाहिलाय. तुम्ही माझ्यावर विश्वास टाका.'

'साहेब, तुम्ही म्हणताच आहात तर, टाकतो आम्ही विश्वास. पण आमच्या विश्वासाचं मोल सर्वांनी जाणावं, ही आमची अपेक्षा आहे.'

प्रभाकर शेलार उठून गेला आणि आठवलेंच्या एकदम लक्षात आलं. त्यांनी पुन्हा बेल दाबली आणि एकनाथला प्रभा-करला मागे बोलावण्यास धाडला. प्रभाकर केबीनचं दार ढकलून आत आला, तसे आठवलेसाहेब चटकन म्हणाले, 'मिस्टर शेलार, फॅक्टरीचं काम पुन्हा सुरू होऊ द्या.'

'ठीक आहे' म्हणत प्रभाकर आल्या-पावली निघून गेला आणि आठवलेसाहेब विचार करू लागले. मागण्या न्याय्य होत्या, वास्तव होत्या. ताबडतोब देणं आवश्यक होतं, हे त्यांना पटत होतं. आठवले एवीतेवी एक-दोन गोष्टी सावरण्यासाठी खोटं बोलायचे, नाही असं नाही, पण त्यांच्या जीवनात एक सरळपणा होता. स्वतःशी प्रामाणिक राहणं त्यांना जमलं होतं. ते कामगारांच्या मागण्यांबद्दल वालावलकर-साहेबांना विचारणार होते. त्यांनी प्रभाकरला

तसा शब्दही दिला होता आणि प्रभाकरनं विश्वासाचं मोल जाणण्याची विनंती केली होती. ती पायदळी तुडवणं आठवलेसाहेबां-सारख्या माणसाला जमणार नव्हतं. पण वालावलकरसाहेबांसारख्या माणसाकडून अशा विनंतीला आणि मागण्यांना काय मोल मिळेल ह्याबद्दल ते साशंक होते.

● ●

तुफान ट्रॅफिकमध्ये ती मर्सिडीझ प्रचंड वरातीतून नवरा चालल्यासारखी दिसत होती. आपल्या भावंडांबरोबर तीही पुढे चालली होती. त्यांच्याकडे पाहून कितीतरी दिवे खट्याळपणे डोळे मिचकावीत होते आणि ट्रॅफिक सिग्नल त्यांना थोपवून धरीत होता आणि झडती घेऊन सोडावं तसा सोडत होता. पीऽपीऽऽपीऽऽऽ हॉर्नस्नी डोकं उठून जात होतं, आणि रस्त्यावरची संध्याकाळची वर्दळ जत्रेसारखी होती.

तशात रेसचा मोसम होता. त्यामुळे रेस-कोर्सपासून सेकंदासेकंदाला दहा दहा कार पळत होत्या. तिथूनच ही मर्सिडीझ निघाली होती.

आजचा दिवस काही चांगला वाटत नव्हता. म्हणजे तसा फुकटच गेला होता. आज घोडा पडेल असं मात्र वाटलं नव्हतं, आणि सकाळचं तरतरीत जनावर संध्याकाळी मरेल असं स्वप्नातही नव्हतं. पण प्रश्न आणि दु:ख नुकसानीचं नव्हतं. आजचा वेळ वाया गेला ह्याचं एक दुःख होतं. मर्सि-डीझच्याच वेगाने हे विचार चालले होते. लगोलग जॉकीबरोबर घोड्यांची पाहणी करून दोन लाखांचा एक घोडा सिलेक्टही झाला होता. काही प्राथमिक उपचार होऊन तो दोन लाखाचा जबरदस्त अरबी घोडा त्या मेलेल्या घोड्याची गादी सांभाळणार होता. मर्सिडीझ हे विचार ऐकत होती. तिला हेही समजत होतं की, घोड्याला आली तशी दोन लाखाची किंमत माणसाला काही आली नसती.

तशी ही मर्सिडीझ सुखी होती. स्वतंत्र, स्वच्छ गॅरेज 'अंबर' सारख्या प्रासादतुल्य बंगल्यात होतं. ड्रायव्हरला मर्सिडीझच्याच रंगाचा पांढराशुभ्र ड्रेस असे. वाटेल तितके वेळा लॉंड्रीत टाकला तरी, चालत असे. पण बर्फाच्या शिखरासारखा पांढराशुभ्र लागा-यचा. क्लीनरही तिला काळजीपूर्वक धुवत असे. कारण मालक मोठा चोखंदळ होता. पगार पाच रुपये जादा द्यायचा पण जरा काळा कण चालायचा नाही.

आज मर्सिडीझचं नशीबच होतं. मालक स्वतः तिच्या स्टीअरिंगवर बसला होता. घोड्याचं सिलेक्शन झाल्यावर मर्सिडीझला घेऊन मालक एकटा निघाला होता. मर्सि-डीझ स्वत:ला धन्य समजत होती.

गाडी पार्क करून वालावलवकरसाहेब त्यांच्या नेहमीच्या रुबाबदार आणि भार-दस्त चालीने बंगल्याची, बागेची, उगाचच कसून पाहणी करीत संगमरवरी पायऱ्यांवर बूट आपटत बंगल्यात शिरले. लहान पोर पाळण्यात निजावं तशी मर्सिडीझ गॅरेजमध्ये पहुडली होती. साहेबांचा 'अंबर' बंगला त्या भागातलं एक बघण्यासारखं स्थान होतं. बाहेरून पाहूनही लोक समाधान पावायचे. बंगल्यासमोर हिरवं पोपटी लॉंज. कडेकडेने आणि वाटेने सुंदर पिवळ्या तपकिरी पानांची शोभेची झाडं. गुलमोहराची झाडं तर अशी फुललेली असायची की, वाटावं ह्या झाडांची 'पाने लाल' आणि 'फुले हिरवी' असावीत. अशी एक ना अनेक झाडं. त्या रंगीबेरंगी पार्श्वभूमीवर पांढराशुभ्र 'अंबर' आणि वर निळंशार आकाश. मन गुलमोहरासारखंच फुलायचं. ह्याच सुखात ती मर्सिडीझ होती.

वालावलकरसाहेब आत आले आणि त्यांनी बूट सोडून मोकळे करून ठेवले. आवाज ऐकून लीलाताई बाहेर आल्याच.

'केव्हा, आत्ताच आलात?' लीलाताईंनी बोलणं सुरू केलं.

'हूं, द्वारका पडवीत दिसत नाही, कुठे गेला?' साहेबांनी उठून कोट काढण्यासाठी हात लांब केले. काही बोलले नाहीत.

'जवळपासच गेले असतील' लीलाताईंनी त्यांच्या पाठीशी जाऊन कोटाला मोकळं करीत सांगितलं.

'हू.' साहेबांनी हुंकार आणि टाय दोन्ही सोडलं.

● ●

साधारण पंचेचाळीस सेहेचाळीसचे वालावलकरसाहेब अत्यंत भारदस्त आणि तुफान व्यक्तिमत्त्वाचे होते. त्यांनी सोडलेली ऑर्डर 'ना' म्हणण्याची प्राज्ञा असणार? नव्हताच. वास्तविक आठवलेसाहेब वालवल-करसाहेबांपेक्षा वयाने पाच सहा वर्षांनी मोठेच. पण वालावलकरसाहेबांचे केस आठ-वल्यांपेक्षा जास्त पांढरे होते. वालावलकर-साहेबांच्या चष्म्याची फ्रेम सोनेरी असायची. चेहरा पांढराशुभ्र आणि सतेज असायचा. त्यांच्याबाबतीत पांढऱ्या रंगाला खूपच महत्त्व होतं. सगळंच शुभ्र सुखावणारं.

साहेबांची कोटयवधी रुपयांची इस्टेट ही काही वडिलोपार्जित नव्हती. इंजिनीअर झाल्यानंतर त्यांनी काही काळ नोकरी केली. नंतर स्वत:चा वर्कशॉप उघडला आणि शेअ-र्सच्या व्यवहारातही लक्ष टाकलं. मात्र त्यांचं नशीब फळफळणार होतं हेच खरं. वर्क-शॉपचा कारखाना झाला. कारखान्यात होणाऱ्या स्पेअर पार्टस्‌ना प्रचंड मागणी आली. त्यानंतर पाचशे कामगार झाले. कार-खाना प्रायव्हेट लिमिटेड झाला, आणि आता हजार कामगार झाले तेव्हा 'प्रायव्हेट' हा शब्द पुसावा लागला. पाचशे रुपयांचं वर्क-शॉप प्रचंड 'वालावलकर इंडस्ट्रीज लिमि-टेड' मध्ये बदललं.

हे साहेबांचं नशीब होतंच, पण त्यामागचे साहेबांचे कष्ट, हुशारी आणि कर्तृत्व याला तोड नव्हती. पण जेव्हा कंपनी लिमिटेड झाली तेव्हा साहेबांनी कंपनीच्या कारभाराची बहुतेक जबाबदारी आपणहून सोडली. कारण कंपनी सुस्थितीत मार्गक्रमण करीत होती. तिला वालावलकरसाहेबच हवे होते असं नव्हतं, आणि त्यांच्या इतर कामामुळे कंप-नीच्या दैनंदिन कारभारात सात आठ तास दवडणे ही त्यांना परवडण्यासारखी गोष्टही नव्हती. फक्त बोर्ड मीटिंगला ते चेअरमन ह्या नात्याने हजर असत. पण ते हजर असतीलच ह्याची खात्री नसायची. साहेब टूरवर असायचे, किंवा दुसऱ्या काही अडचणी-मुळे त्यांचा फोन जायचा. मीटिंगला त्यांची अनुपस्थिता जाणवायची. साहेबांनी दैनंदिन कारभारावरली जबाबदारी सोडली असली तरी, कंपनीवरचा त्यांचा ताबा आणि हुकू-मत सोडलेली नव्हती. बहुतेक शेअर्स त्यांचेच होते आणि मॅनेजिंग डायरेक्टर म्हणून त्यांनी आपल्या सासुरवाडीचे नातेवाईक आठवले यांची नेमणूक केली होती. साहेब कंपनीत फारसे जात नसत हे खरं, पण आवक जावक,

उत्पादन, एक्सपोर्ट, नव्या लिफ्टची खरेदी, रीसर्च अँड डेव्हलपमेंट वगैरेबद्दल त्यांना संपूर्ण माहिती लागायची, आणि ती अभ्यासून ते बोर्ड मीटिंगमध्ये त्यांना वाटेल तो निर्णय घ्यायचे. कोणतीही मोठी गोष्ट वा मेजर प्रॉब्लेम साहेबांपर्यंत जावाच लागायचा. आठवल्यांना तशी अटकळच होती.

वालावकर इंडस्ट्रीजच्या यशापासून ते जवळजवळ वीस पंचवीस कंपन्यांचे डायरेक्टर होते. शहरातल्या किती संस्थांचे अध्यक्ष होते, कितीचे ट्रस्टी होते वगैरे वगैरे त्यांनाच माहीत. शिवाय रेस हा त्याचा शौक होता. कित्येकदा त्यांचे घोडे रेस मारायचे आणि लक्ष्मी त्यांचं पारडं जड करायची. लक्ष्मी त्यांच्याकडे पाणी भरीत होती आणि त्याचा ओघ कोठपर्यंत पसरलाय त्याचा तिचा तिलाच अंदाज नव्हता. सरस्वतीही त्यांच्याकडे पाणी भरून त्यांच्या डोक्यात वीणा वाजवीत बसली होती.

• •

कपडे उतरवून साहेबांनी गाऊन चढवला. चहाचा कप तोंडाशी नेऊन डोळे पेपरावर रोखले. वेफर्स न खाताच परत पाठवली. दोनतीनदा टेलिफोन खणखणला, तेव्हा त्यालाही तोंडाशी नेऊन चार शब्द ऐकवले. नंतर भराभर आलेली पत्र फोडली आणि चाळून रिमार्क मारून फायलिंगसाठी पॅडला लावली. सिगरेटकेस उघडून एक सिगरेट ओठांच्या चिमटीत ठेवली. महागडा नक्षीदार लायटर किरकिरला आणि धुराने उडी घेतली. वातावरण धूसर होऊन गेलं. देवघरासारखं. साहेबांचे विचार सुसाट धावू लागले.

साहेबांच्या वैभवाला साजेशा देखण्या अॅश ट्रेमध्ये सिगरेट झटकून ते उत्साहाने रूममधून बाहेर आले. रात्रीचे आठ वाजले होते. द्वारका अजून आला नव्हता. त्यांनी विकासच्या खोलीत डोकावले. तो त्याच्या स्टडीरूममध्ये इंटरचा अभ्यास करीत गढला होता. मुलाच्या अभ्यासाबद्दल त्यांच्या मनात समाधानाची एक लकेर उठून गेली. कोण नोकर काय आणि कसा काम करतोय ह्यावर त्यांची तिखट नजर फिरली. नोकरांनी माना खाली टाकल्या. लीलाताईकडे जात त्यांनी पुन्हा विचारलं, 'अग आठ वाजून गेले, द्वारका गेलाय तरी कुठं,.. फिरायला म्हणजे किती वेळ... किती वाजता गेला ?'

'सहा वाजता' लीलाताईंचं आज्ञाधारक उत्तर.

'कुठं फिरायला जातो तो ?' पुन्हा प्रश्न.

'तसं काही सांगत नाहीत ते.' पुन्हा लीलाताई स्वयंपाकाची तयारी करता करता उत्तरल्या.

'त्याला आल्याबरोबर माझ्याकडे- माझ्या खोलीत- पाठव. कुठं ट्रॅफिकमध्ये अॅक्सिडेंट झाला, काही झालं तर लोक म्हणायचे भावाला बाहेर सोडलंच कसं? ' साहेब हे स्वतःशीच बोलले.

• •

द्वारका साहेबांचा सख्खा भाऊ. वयाने पस्तीशीचा. तंतोतंत बघायचं म्हणजे पुढल्या वर्षी पस्तीस पूर्ण होतील. साहेबांपेक्षा दहा वर्षांनी लहान. साहेबांच्या कर्तृत्वाचा इतिहास जेवढा स्फूर्तीदायक तेवढाच द्वारकाचा इतिहास करुण. दुर्दैवी.

लहानपणी द्वारका कुठल्याशा आजारात सापडला आणि मरता मरता वाचला. त्या आजाराने त्याच्या दुर्दैवाचं उद्घाटन झालं. आजारातून उठल्यानंतर एकाच महिन्याने त्याला पुन्हा वात झाला. आणि त्यातून उठला तेव्हा तो साफ वेडा झाला होता. त्याच्या मेंदूला अस्तित्व उरलं नव्हतं.

त्याचा संपूर्ण आजार त्याच्या मेंदूवरच घसरला होता. वेडाचे झटके आल्यानंतर मात्र द्वारका फारसा आजारी पडला नाही. उलट त्याचा आधार वाढला, झोप वाढली, आणि देहही वाढला. असा विचित्रपणे द्वारका बदलला. पण त्या वेडाच्या निमित्ताने द्वारकाच्या मनात जो प्रचंड न्यूनगंड निर्माण झाला त्याने द्वारका 'माणूस' म्हणून मारला गेला. जगात वावरणं त्याला नको वाटू लागलं. शाळा थांबली. जे काही थोडंफार ज्ञान होतं तेही नासलं. वेड लागल्यापासून द्वारका एकलकोंडा, एकाकी झाला होता. पडवीच्या कोपऱ्यात गुडघ्यात मान घालून बसणं हे दिवस घालवण्याचं त्याचं साधन होतं.

द्वारका शहाणा व्हावा म्हणून दादाजींनी वडिलांनी – अतिशय प्रयत्न केले. इलेक्ट्रिक शॉक्स किती दिले, किती गोळ्या, कॅपसुल्स, इंजेक्शन्स, औषधे, ट्रीटमेंट्स त्याला गणना नाही. द्वारका ह्या उपचारांनी थोडा सुधारला. अगदीच वेडा राहिला नाही. वेडसर राहिला. मुलाची अवस्था पाहून दादाजी खूप खचले. पुढं द्वारकाच्या ह्या दोषामुळे त्याचं लग्न होऊ शकलं नाही. कुणी तसा प्रयत्न केलाही नाही. प्रयत्न करणंही वेडेपणाचं होतं. द्वारकाचं आयुष्य रेंगाळतच राहिलं. लहानपणीची हाफपँट त्यानं मोठेपणीही सोडली नाही आणि शर्टाच्या बटणांचा त्याला अजूनही मेळ लावता येत नव्हता. नवीन कपड्यांचा शौक नव्हता. आवड नव्हती. पंधरा पंधरा दिवस गालाला वस्तरा नको असायचा. हवी असायची फक्त गुडघ्यात मान आणि उगाच दचकणं.

• •

काही दिवसांपूर्वीच साहेबांना काही फोटो द्वारकाच्या अंथरूणात मिळाले होते. ते अश्लील, उत्तान फोटो द्वारकाकडे कसे आले ह्याचं त्यांना भलतंच आश्चर्य वाटत होतं. थोडा रागही उसळून येत होता. म्हणूनच साहेब एवढी आवर्जून द्वारकाची चौकशी करीत होते.

ह्या अश्लील, उत्तान फोटोंचा आणि द्वारकाच्या बाहेर फिरायला जाण्याचा काही संबंध आहे काय ह्याची चिकित्सा ते मनातल्या मनात करू लागले. फार विचार झाला. खूप सिगरेट्सची राख झाली. पण त्यांना कसलंही आकलन झालं नाही. संशयाचा भोवरा भिरभिरत राहिला. द्वारकाबद्दलचे विचार दाटत राहिले.

• •

बाहेर चाहूल 'बाटली तेव्हा चष्म्याची सोनेरी फ्रेम दाबत साहेब दिवाणखान्यात आले. त्यांची नजर दिवाणखान्याच्या खिडकीतून आरपार पडवीत पोहोचली तेव्हा पडवीत

संशयाचा भोवरा भिरभिरत राहिला. द्वारकाबद्दलचे विचार दाटत राहिले.

आलेल्या द्वारकावर ती खिळून राहिली. कोरडे कोरडे करडे केस. थोडे पिंजारल्यासारखे, पण राठ, दाट आणि वाढलेले. दाढी अर्धा इंचापर्यंत खुरटलेली. देह थोराड. डोळ्यांत विलक्षण विचार आणि भयानक चमक. पण साहेबांना ह्याची सवय झालेली. हाफपँट कुठेतरी बसल्याने मळलेली. खूप जुनाट बुशशर्ट. त्यात एकदम तळाचं बटण तुटलेलं आणि अनवणी उघड्या पायांचा सावळा द्वारका पडवीतून दिवाणखान्यात चोरून नजर टाकताना साहेबांना पाहून थबकला. त्यानं नजर फिरवली. साहेब गंभीर झाले आणि त्यांनी द्वारकाला हाक मारली.

'द्वारका, इकडं ये.'

द्वारकानं मुंडकं वळवलं. क्षणभर थांबला आणि मग त्याच्या विचित्र ढबीनी उगाचच पोक काढीत पायात चाचरत तो दिवाणखान्यात आला. आणि साहेबांपासून अंतर राखून उभा राहिला. दोन भावांमधलं ते नेहमीचं अंतर होतं.

'कुठे गेला होतास?'

'ऊं?'

'कुठे गेला होतास?'

'मी?' द्वारकाने छातीकडे पंजा नेत विचारले. त्याचे हातपाय थरथरत होते. डोकं थरथरत नव्हतं पण आतला मेंदू नक्कीच थरथरत असला पाहिजे. वालावलकर साहेब शांत, गंभीरपणे आणि खंबीरपणे उभे होते.

'मी? ... मी, ... मी मारुतीच्या ... मारुतीच्या देवळात गेलो...होतो!'

वालावलकरसाहेबांच्या रागाचा स्फोट झाला. ते वेगात पुढे आले आणि आपल्या विशाल हाताने त्यांनी द्वारकाच्या गालावर फाडकन एक मुस्कटात भडकावली. द्वारका भयंकर हादरला. त्याची मान निखळून वाकली. साहेबांचा श्वासोच्छवासाचा वेग वाढला. डोळे निखारे बनले.

'मारुतीच्या देवळात? मारुतीच्या देवळात?' साहेबांची छाती अजूनही उडत होती. 'मारुतीच्या देवळातून आलेल्या माणसाच्या कपाळाला तिथले लाल गंध असते. कुठंय तुझ्या कपाळाला ते लाल गंध? तू खोटं बोलतोयस म्हणून...चालता हो' शेवटचे शब्द साहेब किंचाळल्यासारखे बोलले आणि भराभर त्यांच्या खोलीत जाऊन त्यांनी सिगरेट पेटवली. वातावरण पुन्हा धुरकट झालं. लागोपाठ तीन चार सिगरेटींची राख होत राहिली. धूर दाटत गेला. साहेब त्यांच्याच खोलीत बसून राहिले. जेवायला चला म्हणून सांगायची प्राज्ञा असलेला एकही नोकर नव्हता, की लीलाताईंचीही ती हिंमत नव्हती. शेवटी साहेब उठले. सिगरेट शिलगावत बाहेर आले. त्यांनी लीलाताईंकडे जाऊन द्वारकाच्या जेवणाबद्दल चौकशी केली. द्वारका बंगल्याच्या पडवीत थाळी घेऊन अंधाऱ्या प्रकाशात भात कालवून मचामचा खात होता. ही त्याची जेवणाची पद्धत नेहमीची होती.

गडीसुद्धा लख्ख प्रकाशात जेवायचे. दोष साहेबांचा नव्हता. ओढून आणले तरी तो टेबलावर जेवायचा नाही. पडवीत आणलं तरच जेवायचा, नाहीतर उपाशीच राह्यचा. फुलपात्र बाजूला ठेवून तांब्यानेच पाणी प्यायचा. घटाघटा. तांब्याभर. नंतर पुन्हा पडवीच्या कोपऱ्यात जाऊनं गुडघ्यात डोकं घालून बसायचा. उगाचच विचार करीत. गेल्या काही दिवसांपासून पैशाची त्याला अधिक गरज वाटू लागली. आपल्या दुर्दैवी भावाची कणव येऊन साहेब द्यायचे. मागितले की शंभराची नोट. कित्येक वर्षे बेटचाने रुपयाची नोटदेखील मोडली नव्हती.

आपल्याच रक्ताच्या भावाची गत पाहून साहेब नियतीला हसले आणि सिगरेट झिजवत झिजवत पुन्हा आपल्या खोलीत गेले. 'द्वारका कुठे फिरायला जातो' ह्याची नोंद आज त्यांच्या मनाने घेतली आणि प्रचंड चीड सुळक्यासारखी उभी राहिली. पुन्हा गेला तर, खैर नाही असा इशारा त्याला ते उद्या देणार होते. मध्येच त्याच्या लग्नाच्या शक्याशक्यतेचा त्यांनी थोडा विचार केला. पण ते अशक्य म्हणून सोडून दिलं. पडवीत भात कालवणारा द्वारका लग्नासाठी अंतरपाटाआड हार घेवून उभा राहिला नसता. किंवा तो राहिला असता तरी आंतरपाटाच्या दुसऱ्या बाजूचा हार घ्यायला कोण पुढे येणार होतं? लग्न ही त्याची लायकी नव्हती. पण 'गरज' होती.

● ●

'स्पीकिंग.' वालावलकर साहेबांनी रिस्पॉन्स दिला.

'आठवले बोलतोय' पलिकडून आवाज.

'बोला'

'हाऊ आर यू?'

'व्हेरी फाईन अँड फ्रेश.'

'एक प्रॉब्लेम डिसकस करायचा होता.'

'बोला.'

'... त्याचं काय झालंय की, सध्या एक अडचण निर्माण झालीय. तुम्हाला आठवतं, काही दिवसांपूर्वी मी युनिअनच्या एका पत्रासंबंधी तुम्हाला बोललो होतो –'

'वुईच लेटर?'

'ते कामगारांच्या पगारवाढ आणि इतर मागण्याच्या बाबतीत. रिगार्डिंग देअर ग्रेडेशन, वेजेस अँड अदर डिमांडस्.'

'हूं. त्याचं काय?'

'तर, त्याला उत्तर काय द्यायचं?'

'त्याला उत्तरच द्यायचं नाही. बी क्वाएट. ते पत्र दाबून टाका.'

'पण ते ... म्हणजे परवा असं झालं को, महिनाभर लेटरवर रिस्पॉन्स नाही म्हणून लेबर प्रॉब्लेम झाला होता. पाऊणतास काम बंद करून वर्कर्सनी ऑफिसजवळ घोषणा दिल्या आणि वातावरण तंग केलं.'

'बट व्हाय आर यू नॉट इनफ्लुएंसिंग देअर लिडर? लीडरला बोलवायचं. थातुरमातुर काहीतरी सांगायचं. तोंड बंद करायचं. अहो, ते कामगार आहेत आणि अक्कल नावाची गोष्ट कामगारांकडे नसते!'

'बट मिस्टर वालावलकर प्रॉब्लेम असा आहे की, युनिअन लीडर प्रभाकर शेलार म्हणून आहे. तो आपल्याकडलाच एक वर्कर आहे, रादर सिनीअर. आणि त्याची एकच युनिअन आपल्या कंपनीत आहे. बरं, 'शंभर टक्के' वर्कर्स तिचे मेंबर्स आहेत आणि प्रत्येकजण प्रभाकर शेलार म्हणजे दैवत मानतो. असा प्रचंड होल्ड आहे.

'त्या युनिअन लीडरला विकत घ्या!'

'नो सर. वुई कान्ट हेल्प. प्रभाकर शेलार इज व्हेरी स्ट्रेट फॉरवर्ड अँड ऑनेस्ट यंग फेलो. त्यानं कामगार चळवळीला निष्काम वाहून घेतलंय. तो आमिषांना फसणं शक्य नाही. इटस् क्वाईट इंपॉसिबल.'

'हाऊ इट इज इंपॉसिबल? कॅन यू नॉट डॉमिनेट ए सिंगल वर्कर? उद्या उठून ते काय वाटेल ते मागवतील. हजार रुपये पगार

मागतील. वर्किंग अवर्स कमी करा म्हणतील. दरवर्षी तीन महिने प्रिव्हिलेज लीव्ह मागतील. यूनिअनच्या जोरावर. शक्य आहे का ते ?'

'पण गोष्ट अशी आहे की, आपण गेल्या १० वर्षांत त्यांना कोणतीही पगारवाढ दिलेली नाही. त्यांच्या मागण्या न्याय्य आहेत. त्या मान्य करायला हव्यात.'

'यू सिली मिस्टर आठवले, बरोबर आहे. त्यांच्या मागण्या ,न्याय्य आहेत असं तुम्हीच म्हणू लागलात तर, ते आकांत करणारच. अहो, सरळ आहे. किती लाखाचे अॅटोमॅटिक प्लांटस् आले ? पण व्हॉट अबाउट प्रॉडक्शन ? इट इज कॉन्स्टंट.'

'पण आपण तेवढीच रिट्रेंचमेंटही केली होती.'

'ओहो, आठवले, यू कान्ट अंडरस्टॅंड मी.' मिस्टर वालावलकर यू कॅन ऑबझर्व्ह प्रॉफीट फीगर्स. दरवर्षी आपला प्रॉफीट लाखोंनी वाढतोय.'

'यू सिली अगेन. प्रॉफिटचा आणि कामगारांचा संबंधच काय ? मालकाला फायदा व्हावा ह्या दृष्टीने काम करणारा कामगार अजून जन्मायचाय. अहो कामगार का काम करतात तर, समोर सुपरवायझर असतो म्हणून. आणि पोटासाठी नोकरी हवी असते म्हणून. आपण काही सक्ती केलेली नाही आमच्याकडे कामाला रहा म्हणून.'

'पण साहेब वर्कर्स ह्यावर गरम होणार. उत्तर तरी कसं द्यायचं हा प्रश्नच आहे !'

'हे बघा प्रॉडक्शन सॅटिस्फॅक्टरी झाल्याशिवाय एक पैसाही कामगारांना मिळणार नाही. दुसरी गोष्ट, 'लेस वेजेस अॅण्ड मोअर प्रॉडक्शन' इज द पॉलिसी, हे लक्षात ठेवून युनिअनशी टॅक्टफूल बोलणी करा. कनव्हिन्स देम. धिस इज द मॅटर ऑफ स्कील. हॅंडल द लीडर स्कीलफुली. परस्वेड हीम. डू एनिथिंग, बट स्टॉप धीस ब्लडी डिमांडस्. तुम्ही लीडरशी काय बोललात ?'

'त्या दिवशी कामगारांनी प्रचंड आरडाओरडा केला तेव्हा मी प्रभाकर शेलारशी १५-२० मिनिटं बोलणी केली. हा मनुष्य कामगार असला तरी, त्याच्यात फॅंटॅस्टिक गटस् आहेत. प्रत्येक मागणी त्याने भरपूर आधार देवूनच मागितलेली आहे. कोणालाही त्याचे ते पत्र डिनाय करता येणार नाही. दुसरी गोष्ट म्हणजे त्यादिवशी वातावरण अतिशय गरम असल्याने शेलारला थंड करण्यासाठी मी तुमच्या मागण्यांबाबत वालावलकरसाहेबांना विचार करायला लावतो असे म्हटले. तुमच्यावर त्यांचा विश्वास आहे तेव्हा त्यांना उत्तर काय द्यायचं ते नक्की सांगाल तर बरं !'

'म्हणजे एवढा घसा फोडून रामाची कोण सीता ' हेच विचारलंत. मिस्टर आठवले कंपनी बजेट कॅननॉट बेअर ए सिंगल पैसा फॉर लेबर. अहो मागण्या मान्य करा, काय चेष्टा आहे का पोरखेळ आहे ? किती लाखाचा बोजा वाढेल याचा हिशेब केलात का ? अहो तेवढ्या लाखांनी प्रॉफीट डाऊन होणार, तेवढा डिव्हिडंड रेट डाऊन होणार, तेवढी कंपनीची इभ्रत कमी होणार. शेअरबाजारात कंपनीच्या शेअर्सना कुत्रा तरी विचारील काय ? हॅव यू थॉट धीस ?'

'मग प्रकरण हाताळणं मला कठीण आहे !'

'यू सी आठवले, युनिअन फोडा !'

'अहो पण शंभर टक्के कामगार एकाच युनिअनमध्ये आहेत आणि युनिअनवर देवासारखी श्रद्धा आहे. कशी फोडणार युनिअन ?'

'दोन तीन स्टुपिड वर्कर्स पकडा, त्यांना प्रमोशन वगैरे द्या आणि दुसरी युनिअन स्थापण्याची कंडिशन टाका. व्हेरी ईझी.'

'बट हाऊ डेंजरस सर ! हे जर कामगारांना कळलं तर ते दोघे तिघे स्टुपिड पोचलेच पण आपणही मार खाल्ला म्हणून समजा !'

'ओ हो, यू आर थिंकिंग इन वन डिरेक्शन ओन्ली. मिस्टर आठवले. यू आर मॅनेजिंग डायरेक्टर अॅंड यू मस्ट एक्झिक्युट अवर पॉलिसीज ...... युनिअनच्या मागे कोणती पोलिटिकल पार्टी आहे ?'

'युनिअन इंटर्नल आहे, आणि लीडर्सही इंटर्नल आहेत. माझ्या माहितीप्रमाणे कोणत्याही राजकीय पक्षाला ही युनिअन घेता आलेली नाही. पण प्रभाकर शेलार मार्क्विस्ट आहे असं ऐकलंय. बट ही इज नॉट द मेंबर ऑफ कम्युनिस्ट पार्टी. कामगाराविषयीचं तत्त्वज्ञान त्यानं मार्क्सकडून उचललंय.'

'अहो कपाळाचं तत्त्वज्ञान ! कार्ल मार्क्स म्हणजे भाजी का ' भाकरी ' विचारलं तर भाजी म्हणतील. कार्ल म्हणून कारल्याची कडू. मिस्टर आठवले स्पष्ट बोलतो, तुम्ही फार सरळ स्वभावाचे आणि प्रामाणिक प्रशासक आहात. थोडे भोळे आहात. इतके दिवस तुम्हाला राजकारण खेळावं लागलं नव्हतं आणि खेळायचं तर तुमची बुद्धी ते मानीत नाही. खरी गोष्ट ही आहे.'

आता तुम्ही काही म्हणा, आय डोन्ट माइंड. पण मी तुमच्यापेक्षा पाचसहा पावसाळे जास्त काढलेत. स्पष्ट बोलतो. क्षमा करा. आता कामगारांना निगेटिव्ह रिप्लाय द्यायचा म्हणजे कंपनीचं अॅडमिनिस्ट्रेशन ढासळणार. कदाचित स्ट्राईक होईल आणि दोन्ही बाजूंचं नुकसान होईल. निष्पन्न काहीही होणार नाही. आता तुमच्या पॉलिसीपुढे मला आणखी काही बोलायचं नाही. मी बोर्ड मीटिंग बोलवावी असं म्हणतो. म्हणजे बोर्ड जो निर्णय देईल तो निर्णय अंमलात येईल. मला हे माहीत आहे की, तुमचा निर्णय धुडकावण्याची बोर्ड मीटिंगची ताकद नाही. म्हणजे तुमचा निर्णय हाच बोर्ड मीटिंगचा निर्णय; हे मी जाणून आहे. पण मीटिंगमध्ये तसा निर्णय आला म्हणजे तो कागदोपत्री लागेल. ते मला सोयीचं पडेल. आणि आता माझं वय पंचावन्न होऊन गेलंय. ह्या वयात ही हेवी लेबर डिसप्युटस् म्हणजे हॉरिबल.'

'असं बघा आठवले, माझी पॉलिसी म्हणजे माझी पॉलिसी. इट मस्ट बी एक्झिक्युटेड. इफ यू आर नॉट विलींग, अॅंड अॅज पर युवर एज, आय विल सजेस्ट यू–तुम्ही राजीनामा द्या. फ्रेश फेलो विल फेस द प्रॉब्लेम. बट माय पॉलिसी मस्ट बी एक्झिक्युटेड इन एनी कंडिशन. नो अपील.'

'पण केवळ ह्या तुमच्या ताठर पॉलिसीमुळेच मला राजीनामा द्यावा लागणार आहे. ह्या बोर्ड मीटिंगमध्ये मी तो सादर करतो.'

## माझी पॉलिसी म्हणजे माझी पॉलिसी . . . नाही तर तुम्ही राजीनामा द्या.

'राजीनाम्यात 'प्रकृतीच्या कारणामुळे' असं टाका. नोबडी शुड नो माय पॉलिसी. आणि झालेल्या बोलण्याबाबत एक अक्षरही कुठे काढू नका. बोर्ड मीटिंगनंतर माझ्यातर्फे एक पार्टी अरेंज करा. तुम्हाला निरोप देण्यासाठी. शेलारला बोर्ड मिटिंगपर्यंत थांबायला सांगा......ओके ?'

'..... ओ......के......'

साहेबांनी फोन खाली टाकला आणि सिगरेटचे फुत्कार सोडले.

● ●

बोर्ड मीटिंगपर्यंत थांबायला प्रभाकर तयार नव्हता. त्याला कमीतकमी तोंडी निर्णय तरी हवा होता. 'बोर्ड मीटिंग घ्या नाहीतर घेऊ नका, आम्हाला सुख दुःख नाही' हे शब्द शेलारने आठवलेंना ऐकवले होते. पण मजा अशी होती की, आज आठवलेसाहेब काहीच बोलत नव्हते. प्रभाकरची कठोर वडबड ऐकून शेवटी ते एवढंच म्हणायचे 'बोर्ड मीटिंगपर्यंत थांबा.' प्रभाकरला वाटलं आठवलेसाहेब मूडमध्ये नसतील. त्याने दोन दिवस विचारासाठी म्हणून आणखी दिले. पण दोन दिवसांनंतर आठवलेसाहेब 'बोर्ड मीटिंगपर्यंत थांबा' असेच दीनपणे म्हणाले. ह्यावर प्रभाकरच्या काही लक्षात आले नाही. तो भडकला. 'तुम्ही किती ताणणार आहात ?' प्रभाकरने दांतओठ आवळत विचारले. पण आठवलेसाहेबांनी हे शेवटचं थांबायला सांगितलं होतं. शेवटचा विश्वास ठेवा म्हणून विनवलं होतं. प्रभाकरलाही उगाचच त्यांची दया आली. कणव वाटली.

● ●

आज सकाळी चर्चेला भलताच ऊत आला होता. आठवलेसाहेबांनी राजीनामा का दिला ह्यावर कुणालाच अंदाज नव्हता. निरनिराळे तर्क लढवले जात होते. पण आठवलेसाहेबांचं चांगुलपण मात्र प्रत्येकाच्या तोंडी होतं. हेही खरं होतं की, आठवलेंनी कुणाचं कधी 'वाईट' केलं नव्हतं. कुणाचं नुकसान केलं नव्हतं, आणि त्यांच्या कारकीर्दीत युनिअनला कधी राजकारण करावं लागलं नव्हतं. आठवले खरोखरी मेले असते तर, त्यांचं जे गुणगान झालं असतं तसंच आज चाललं होतं.

अखेर दहा वाजता नोटीस लागली. निरनिराळ्या नोटीसबोर्डांवर कामगारांची एकच गर्दी झाली. प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळे सतत काम जमत नसल्याने त्यांनी राजीनामा दिला होता. त्यांच्या सेवेबद्दल व कामाबद्दल नोटीसमध्ये खूपच स्तुती होती. आणि खाली वालावलकरसाहेबांची सही होती.

● ●

कंपनीचा एरिआ प्रचंड होता. वालावलकरसाहेबांनी जेव्हा छोटा वर्कशॉप सुरू केला तेव्हा त्या वर्कशॉपच्या तिन्ही बाजूंना नुसतं जंगल होतं. अर्थात चार पाच वर्षांत जेव्हा आजूबाजूला परदेशी कंपन्या आणि फॅक्टरीज् वाढत गेल्या तसतशी जंगले साफ झाली आणि तो भाग शहराला जोडला गेला. रेल्वे स्टेशन सुधारलं. एक दोन प्लॅटफॉर्म वाढले. मालगाड्यांसाठी दोन सांधे जास्त टाकले गेले. सकाळ, दुपार, रात्र कामगारांचे थवेच्या थवे त्या त्या पाळीला दिसत. सुटताना कामावर जाताना.

एक दोन शेट्टी आले. त्यांनी अंतरा अंतरावर दुकानाच्या गाळ्याएवढ्या जागेत हॉटेलं टाकली. नंतर तीन चार गाळ्यांएवढी ती विस्तारली. आगे मागे त्यांनी ही जागा कोठून पैदा केली हे समजलं नाही. 'हॉटेलच्या बाहेर पानवाला' म्हणीप्रमाणे तेही आले. आता हे पाववाले अमुकच प्रांतातले किंवा अमुकच जातीजमातीचे वगैरे असं काही ठरलेलं नसतं. पानाची गादी, मग ती कुणीही चालवावी. पण गिऱ्हाईकांना ह्याच्याशी सुतराम कर्तव्य नसतं. उधारीपुरतं गावाची चौकशी वगैरे झाली तर तेवढीच. जातवाल्याकडून नाहीतर गाववाल्याकडून सेकंड शीफ्टसाठी तेवढंच विड्याचं बंडल, नाहीतर 'एकसोबिस बनारसी बांधके' असं हक्काने सांगता यायचं.

आजूबाजूला इंडस्ट्रिअल एरिआ वाढतोय हे लक्षात येताच वालावलकरसाहेबांनी आजूबाजूची प्रचंड जागा विकत घेतली आणि मोठं कंपाउंड टाकलं. पुढे हे कंपाउंड उडवलं आणि त्याजागी सहा फूट भितीची तटबंदी बांधली. ह्या तटबंदीचं रक्षण करण्याकरिता वालावलकर इंडस्ट्रीज लिमिटेडच्या सिक्युरिटी स्टाफमधले पंधराएक वॉचमेन ठराविक अंतराअंतरावर ड्युटीवर असतात आणि पंधरावीस फुटांच्या आवाक्यात अंतर्गत फोन असतो,

सध्याच्या वालावलकर इंडस्ट्रीजचं चित्र मोठं मनोहर आहे. कंपनीच्या मेनगेटला लागून सिक्युरिटी ऑफिसरची पांढरीशुभ्र पारदर्शक केबीन दिसते. ह्या केबीनच्या माथ्यावर कंपनीचं नाव इंग्रजी अक्षरात आणि सोनेरी रंगात झळकताना डोळ्यात भरते. त्याच्यावर असलेला कंपनीचा देखणा मोनोग्राम प्रत्येकाला प्रेमात पाडतोच. 'वालावलकर इंडस्ट्रीज लिमिटेड' मधील प्रत्येक शब्दाचं अद्याक्षर घेऊन त्याचा WIL हा शब्द तयार केलेला. ह्या शब्दातील प्रत्येक रेष म्हणजे एक एक हातोडा. उभा, आडवा, तिरका. त्याखाली बारीक अक्षरात एक ब्रीदवाक्य. 'WIL HAS STEEWILL.'

मेनगेटच्या आत खास राखलेल्या हिरवळीने व्यापलेली लहानशा मैदानाएवढी मोकळी जागा. ह्या पोपटी हिरवळीच्या कडेकडेने अनेकरंगी शोभिवंत झाडे, साडीच्या किनारीइतकीच आकर्षक. त्याच्याच बाजूने मेनगेटशी उगम पावलेला आणि आत फॅक्टरीत घेऊन जाणारा चकचकीत काळा डांबरी रस्ता. ह्या रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी चवऱ्या ढाळणारी तुतीसारखी झाडे. त्यामुळे वातावरण थंडगार आणि हिरवंगार. त्यात वर्षानुवर्षे फॅक्टरीच्या मशिन्सचा दुमदुमणारा तो गोंगाट आणि वर्कशॉप्सच्या पोटातील बाराशे कामगारांची ती वर्दळ. एवढा आवाज पचवणारी ती कर्कश्य शांतता वालावलकर इंडस्ट्रीजमध्येच पहावी. हिरवळीच्या पलीकडच्या तीरावर पहिलं वर्कशॉप 'ए'. त्याला लागून दुसरं 'बी', पुढे 'सी' 'डी' तशीच लागून. एकूण चार मोठी वर्कशॉप्स रांगेत आणि शिस्तीत उभी.

वर्कशॉप 'बी' समोर ऑफिसची सुंदर इमारत. अनेक एअर कंडिशनर्स चिकटलेले आणि स्वच्छ काचांचा चांगला उपयोग ऑफिससाठी केलेला. ह्याच ऑफिसच्या पायथ्याशी असणाऱ्या मोकळ्या हिरवळीवर प्रभाकर वगैरे मंडळींनी निदर्शने केली होती.

ऑफिसच्या शेजारी वर्कशॉप 'सी' समोर कँटिनची इमारत. ह्यात पहिला भाग कामगारांच्या कँटिनचा. अपरिहार्यपणे

बकाल झालेला. वर पाटी लटकावलेली 'वर्कर्स कॅंटिन'. शेजारचे स्वच्छ 'स्टाफ कॅंटिन' आणि पुढचे पॉश कॅंटिन ऑफिसर्स मॅनेजर लोकांचे. वर्कर्स आणि स्टाफ कॅंटिनमध्ये स्त्रियांसाठी एक राखीव भाग पार्टिशन टाकून तयार केलेला. वर्कर्स लेडिज म्हणजे सगळं पॅकिंग डिपार्टमेंट. स्टाफ लेडिज म्हणजे स्टेनो टायपिस्ट वगैरे मंडळी. कॅंटिनच्या मागे दोन बंगले. कधीतरी व्ही. आय. पी. व्हिजिटर्स येतात तेव्हा आणि बोर्ड मीटिंगसाठी उपयोगी. सर्वांत वर म्हणजे धूर ओकणारी एक चिमणी. तेवढीच एक गोष्ट काळ्या रंगाची. बाकी शुभ्र मनोहर.

● ●

वॉटरकुलरजवळ, अंधाऱ्या टॉयलेटसमध्ये, वर्कशॉपमागच्या त्या मोठ्या डेरेदार आंब्याच्या झाडाखाली, शिवाय जिथेजिथे बारा महिने सावली असते, त्या त्या नेहमीच्या ठिकाणी झुपक्या झुपक्याने चर्चा चालू होती. लंचचा सायरन झाला तेव्हा मात्र बिळात पाणी ओतल्यावर मुंग्या भगभग बाहेर याव्यात तसे वर्कर वर्कशॉपमधून बाहेर आले आणि कॅंटिन हे एकच ध्येय पुढे ठेवून मार्ग आक्रमू लागले. साडेबाराची वेळ. ऊन कडक होतंच, पण सर्वांची पोटं त्यापेक्षाही भुकेनं पेटली होती. कॅंटिनमध्ये ही प्रचंड गर्दी झाली. सर्वजण दाटीवाटीने कसेतरी दहादहा फूट लांबीच्या बाकांवर स्थिरावले आणि दोन्ही हातांनी पाव ओढत तो भाजीत बुडवून पोटात ढकलू लागले. त्यावेळी त्यांना कुणाचीच आठवण नव्हती.

कॅंटिनमधून जेवून एक एक जण बाहेर पडला आणि मागली लागला. कुणी विड्या पेटवल्या तर, कुणी चारमिनार शिलगावली आणि ठरलेले घोळके ठरलेल्या ठिकाणी जमले. कुणी लॉनवर डोक्याखाली हात ठेवून पहुडले तर, कुणी पाय पसरून पत्र्याला टेकून बसले. कुणी कसेही वाटेल तसे बसले आणि काहीतरी विषयाची सुरवात झाली. विषय कुठलाही असो, मधून मधून सर्वांनी एकदम हंसायचं आणि आय माय भैनसंबंधी शिव्याओव्यांचा पाऊस पाडायचा. त्यातच कमालीचं रंगून जायचं. देहभान विसरायचं. त्या पंधरावीस मिनिटांसाठी. शीफ्ट पुन्हा सुरू होण्यापूर्वी वॉर्निंग सायरन व्हायचा आणि मग एक एक एक एक उठायचे.

पण आज विषय म्हणजे एम. डी. साहेबांचा राजीनामा. कुणीही काहीही बोलो, गप्पा आपल्या पुढे चालू. प्रभाकर शेलारच्याभोवती त्या दिवशी कमीतकमी पंचवीसजण तरी होतेच होते. प्रभाकर चारमिनारचे झुरके घेत विचार करत होता. कामगार काहीतरी विचारत होते. तिकडे त्याचं लक्ष होतं का नव्हतं हे कळत नव्हतं.

● ●

भागवत ब्राह्मण होता. पण 'भट' म्हणून त्याला कुणी कधी चिडवायचे नाहीत. भागवत सर्वांत जुना कामगार होता. आता एक दोन वर्षात रिटायरीला आलेला. काळपट खाकी हाफ पॅंट. ती ढिली होऊ नये म्हणून त्याला पांढरी नाडी घट्ट बांधलेली आणि निळा शर्ट खोचून ठेवल्याने ती नाडी स्पष्ट दिसायची. बाकी पायात कधी चप्पल नाही की, डोक्याला तेल नाही. बऱ्याच जणांना वाटायचे भागवतचे केस वाढतच नाहीत. भागवत जुना होता, अनुभवी होता पण 'उलट्या डोक्याचा' होता. तसा त्याच्यामुळे प्रभाकर दोनचार वेळा गोत्यातही येणार होता.

एकदा काय झालं कुणास ठाऊक. पण कॅंटिनच्या पुऱ्या नुसत्या काळपट झालेल्या. इतक्या जळलेल्या पुऱ्या कॅंटिनमध्ये पहिल्यांदाच. बस. पुऱ्या बाजूला ठेवून कामगार पाव खाऊ लागले. भागवतचा मेंदू थरथरला. तो उठला आणि त्याने एका टोपल्यात त्या जळलेल्या सर्वच्या सर्व पुऱ्या गोळा केल्या आणि प्रॉडक्शन मॅनेजर जेवायला गेल्यावर त्याच्या पारदर्शक केबिनमधल्या चंद्राकार टेबलावर त्या पुऱ्यांचा ढीग त्याने ओतून ठेवला. काचेच्या केबीनमध्ये तो पुऱ्यांचा ढीग पाहण्यासाठी चिक्कार कामगार गोळा झाले होते. भागवत मात्र एका बाजूला जाऊन विडी ओढत बसला. असा हा 'उस्ताद'. 'उस्ताद' हे भागवतांचं इतर कामगारांनी केलेलं 'बारसं' होतं. ते असो. पण ही 'पुऱ्यांची' घटना घडली. नेमका त्याच दिवशी प्रभाकर आला नव्हता. नंतर सबंध कंपनीत त्यावर पोटभर हशा पिकला. त्या पुऱ्या नेऊन टेबल साफ होईपर्यंत कामाची वाट लागली. प्रॉडक्शन मॅनेजर गुप्ता जाम लाल झाला. अशी मजा.

आज त्याच भागवतने प्रभाकरला ओरडून विचारले, 'प्रभ्या, राजीनामाबिजिनामा काय लफडी चालल्येत, ह्यांना सुखासुखी कंपनीत व्हायचंय नं?'

'भागवत, थोडं धीरे धीरे घ्या!' प्रभाकरने त्यांना रोखत म्हटले, 'लफडी काय होतात त्याच्याशी आपल्याला कर्तव्य नाही. आपल्या मागण्या मान्य झाल्याच पाहिजेत. कारण त्या न्याय्य आहेत, वास्तव आहेत. आठवलेसाहेब गेले. दुसरे कोणीतरी येतील. तिकडे कोण आले कोण गेले, आपल्याला पर्वा नाहीं. सरळ मार्गाने मिळत नसेल तर, टेढी ऊंगलीसे घी निकालेंगे. डरो मत'

'च्या ×××, ह्यांना साडेचारशे रुपयावर बायकापोरं सांभाळायला लावली पाहिजेत. ×××××××' भागवत चिडले.

'हे बघा, ढीगभर शिव्या घातल्या तरी उपयोग नाही. व्हायचं ते व्हायचं तेव्हाच होणार. आठवले गेले. त्यांच्या जागी नवा कोण येतो बघायचं. तो चांगला असला, विचार करणारा असला तर ठीक. नाहीतर 'जिंकू किंवा मरू' सुरू.'

'कोण येईल तिकडे असं वाटतं?' भागवतनी विडी जमिनीवर दाबून विझवत विचारलं.

कुणी का होईना, त्याला युनियनच्या पत्राची एक कॉपी जाईल. एकदा प्रश्न समजावून दिला जाईल. मानलं तर ठीक. नाही मानलं तर, सरळ वालावलकरसाहेबाकडे जायचं आणि घेराव टाकायचा. बस हाच आखरी उपाय. पण थोडी तुटो नाहीतर...'

'चकोट होवो.' भागवत किडलेले दात दाखवत फदाफदा हसत विनोद करीत म्हणाले. 'हमारी मांगे म्हंगता है!'

तेवढ्यात नवाथे लंगडत लंगडत पण धावतच आला. हा नाऱ्या नवाथे 'बस्ती का

**आज चर्चेचा विषय एम्. डी.चा राजीनामा हाच होता. आता नवीन कोण येणार?**

मुसाफिर' म्हणून फेमस होता. माड्या चढून चढून तो दोन्ही पायांनी लंगडा झाला होता. नवाथे आला आणि धापा टाकीत म्हणाला, 'आयला, नवी नोटीस लागली. वालावलकरसाहेब स्वतः एम. डी. म्हणून येणार. उद्यापासून.'

आयच्या भना करत सगळे उठले आणि नोटीसबोर्डाकडे गोळा झाले. तेवढ्यात भोंगा झाला आणि प्रत्येकजण आपापल्या मशिनकडे गेला. गॉऽगॉऽ गॉऽऽ गॉऽऽऽ करत मशिनं सुरू झाली आणि मशिनव्यतिरिक्त सर्व शांत झाले.

● ●

दुनियेच्या दृष्टीने द्वारका हे निरुपयोगी आणि अनावश्यक असं जनावर होतं. द्वारकाचा उपद्रव दुनियेला सोडाच, पण खुद्द वालावलकर कुटुंबियांनाही नव्हता. मिळेल ते अन्न पडवीत बसूनच खायचा आणि अंगदी पातळ आणि तोकड्या अंथरूण पांघरूणात तिथेच झोपायचा. अंथरूण पांघरूण भरपूर असायचं पण ते उशाशी घ्यायचा त्यामुळे अंथरूण तोकडं पडायचं. ते त्याच्या अंगवळणी पडलेलं होतं. अंथरूणाचं उसं करायचा आणि उशा अंगावर ठेवून निजायचा. असं उलटसुलट आणि विचित्र. त्यानं मनात आणलं असतं तर, चांगल्यापैकी बेडवर सुंदर आणि एअरकंडिशन बेडरूममध्ये तो झोपू शकला असता आणि वालावलकरसाहेबांनीही त्याला ते दिलं असतं. पण साहेबांच्या नशिबात जसा राजयोग होता तसा द्वारकाच्या नव्हता. पडवीत झोपणं आणि खाणं हेच त्याचं तकदीर होतं. त्याला तो तरी काय करणार?

पंचवीशीपर्यंत द्वारका लहान पोरासारखाच होता. म्हणजे खेळायचा बिळायचा असं नाही. असायचा पडवीतच. आत्तासारखाच उगाचच विचार करीत आणि जगाच्या मागे राहत. पण त्याची लैंगिक भावना सुस्त होती. पंचविशीनंतर काय काय उद्रेक झाले, कळलं नाही, पण द्वारका अस्वस्थ झाला. वेडा झाला. काही झालं तरी न बोलणं हा एक त्याचा गुणधर्म होता. सांगितलं तर खरोखरीच विश्वास बसणार नाही, द्वारकाने पंचविशीपर्यंत अक्षरशः एक दमडीदेखील खर्च केली नव्हती. साहेब जेवण-खाण चहापाणी सर्व काही द्यायचे. काही विशेष असेल तर, ते आठवणीने आग्रहाने मिळायचंच. कपड्यांबद्दल त्याची तक्रार नसायची. पण साहेबच सक्ती करून नवीन कपडे शिवायचे. आणि काही क्षणातच त्या कपड्यांना तो पोतेऱ्याचं स्वरूप आणायचा. अंथरूण पांघरूण जुनं झालं तर, लगेच नवीन यायचं. दर चार दिवसांनी ते मोलकरणीला धुवायला लागायचं, आणि जेव्हा वालावलकर कुटुंबीय कुठे बाहेरगावी जात तेव्हा साहेबांच्या खास सूचनेवरून द्वारकासाठी खाणावळीतून डबा यायचा तोही पडवीतच.

पंचविशीनंतर मात्र द्वारका साहेबांकडे पैसे मागू लागला. हिंडू फिरू लागला. हिंडण्या-फिरण्याने, जगात बाहेर पडण्याने तरी त्याच्यात काही सुधारणा होईल अशी साहेबांची अपेक्षा असायची. द्वारका संध्याकाळी बाहेर पडायचा तो साडेनऊ दहापर्यंत जेवायच्या वेळेस घरी यायचा. परंतु वयाच्या तिशीपर्यंत आपली वासना कशी भागवावी ह्याबद्दल त्याला कोणताच मार्ग सापडत नव्हता. तो त्यातच करपत होता. तिशीपर्यंत एखादी शंभराची नोट तो महिना दोन महिने टिकवायचा. खाणं, पिणं, हिंडणं असं काहीतरी करून पैसे उडवायचा. एक विरंगुळा म्हणून. ह्याच काळात सिनेमा बघण्याचं भलतंच वेड त्याला कसं कुणास ठाऊक पण लागलं आणि सिनेमातले सीन बघून तो अधिकच अस्वस्थ होऊ लागला. पण त्याचबरोबर त्याचा मानसिक विकासही थोडाफार होऊ शकला.

गेल्या काही वर्षातच वस्तीत जायची सवय त्याला लागली. आणि साहेबांकडून हजारो रुपये मागून त्याने ते तिथे उधळले. त्याच्या वासनेचं समाधान तो तेथून विकत घेत होता आणि त्याला ते आवडलं होतं. द्वारकाला तेवढंच व्यसन होतं.

गेल्या वर्षी त्याची आणि प्रेमाची भेट झाली तेव्हा त्याच्या मनातलं धुकं थोडं थोडं निवळू लागलं.

द्वारकाचे पाय आज तेथेच चालले होते.

● ●

संध्याकाळची वेळ. वस्तीतले दिवे उगाचच इतक्या लौकर लागलेले. रस्ताही काही कारण नसताना किंचित चिकट झालेला. काही नेहमीच्या आणि काही अनोळखी अशा गिऱ्हाईकांनी विरळ, विरळ गर्दी केलेली. साधारण बाजाराचेच वातावरण ते. फक्त दुकानं नसलेला बाजार. दुतर्फा चाळीवजा इमारती आणि त्यांतून मादक यौवना गाल फुलारून डोळे मिचकावताना उगाचच पदर पाडीत होत्या. पदर पडला की, त्यांचे पुष्ट यौवनाचे बरेचसे दर्शन व्हायचे. कुणी फारच नजरेने बघू लागला म्हणजे त्या ब्लाऊजची बटणं तोडायच्या आणि मग ते गिऱ्हाईक विरघळायचं साफ. फेरीवाल्याचं ओरडणं आणि ह्या वेश्यांचं 'हे' ह्यात फारसा फरक नव्हता. पानवाले मात्र तितक्याच फॉर्मात होते. रंगेलपणा हा त्या वस्तीचा प्राण होता.

द्वारका त्या वस्तीला आणि ती वस्ती द्वारकाला आता नवीन नव्हती. निरागस पण भयाण चमक असलेला द्वारका खाली मान घालून डोळे मिटून चालल्यासारखा चालला होता. त्याला सर्वच खाचखळगे आता माहीत झाले होते. तो निमूटपणे प्रेमाचा जिना चढून वर गेला. प्रेमा अजून वेणीफणी करीत होती. आज भलतीच नटली होती. द्वारका तिच्या खोलीत शिरला. दरवाज्याचे पडदे झोपाळ्यासारखे हलले. प्रेमाच्या त्या खोलीतच द्वारका तेवढ्यापुरताच शहाणा व्हायचा. त्याला वेडा म्हणणं हे त्यावेळेला शहाणपणाचं लक्षण नसायचं. कारण तो तसंच बोलायचा एरवी मुका.

प्रेमा ही द्वारकाची 'ठरलेली' होती. वयाने चोविशीची प्रेमा सुडौल बांध्याची, घायाळ करणाऱ्या उफाड्याची, केवड्याच्या रंगासारखी गोरीपान आणि गुलाबाच्या फुलासारखी सुंदर आणि नाजूक होती. तिचा सौदा कोणाला फारसा परवडत नसे, पण द्वारका हे तिचं नेहमीचं आणि कायम गिऱ्हाईक होतं. साधारण आठवड्यातून एकदा तरी द्वारका तिच्याकडे फिरकायचाच. बेपर्वाईने साहेबांकडून घेतलेल्या नोटांची आंघोळ तो प्रेमाला घालायचा. प्रेमाला द्वारकाचा स्पर्श नको असायचा. नोटांच्या आंघोळीमुळे प्रफुल्लीत होऊन ती द्वारकाला पचवायची. ह्याच प्रेमानं द्वारकाचं मन ढवळलं होतं.

'वाऽऽ, आज एकदम सुंदर!' द्वारका असं काही बोलेल असं कुणी म्हटलं असतं तर लोक हसले असते.

'हूं.' प्रेमाचा हा 'हूं' सुद्धा इतका सुंदर होता की, त्यात दुनिया बुडाली असती. प्रेमाने उगाचच जास्त वेळा फणी फिरवली आणि मग आरसाफणी ठेवण्यासाठी ती कोनाडयाकडे गेली. द्वारका एकदम तिच्या-मागे धावला. त्याच्याकडे वळत तिने लाडि-कपणे विचारलं– 'आज इतक्या लौकर ?'

'हो, तुझी आठवण झाली आणि...धावत धावत आलो...' द्वारकाच्या तोंडून शब्द आणि लाळ झिरपत होती. द्वारकाच्या ह्या शब्दावर प्रेमा विलक्षण लाजली. तिचं हे लाजणं धंदेवाईक होतं. लाजताना गालावर खळया कोरून प्रेमा गोड हसली. प्रेमा वेश्या होती हे खरं; पण इतर वेश्यासारखी ती फाजील नव्हती. 'पैसा' हा तिचा धर्म होता हेही खरं, पण तरीही इतर वेश्यांच्या तुलनेत ती फारच वेगळी होती.

द्वारका तिच्याशी खूप वेळ बोलत राहिला. तिला नोटांची आंघोळ घालीत राहिला. प्रेम-बिम अशा आदर्श गोष्टी द्वारकाला माहीत नव्हत्या पण त्याला असं वाटायच की, प्रेमा आपल्याला एकटयालाच मिळावी. एकटया-लाच. कायमची हक्काची. ह्यासाठी तो प्रेमाला खुश ठेवण्याचा प्रयत्न करायचा. साहेबांकडून सारखे पैसे घ्यायचा. घाईगर्दीत साहेब बेहेशेबी पैसे द्यायचे. द्वारका बेहिशेबी वागायचा. द्वारकाचा हा खर्च कधीतरी साहे-बांना जाणवायचा. मग ते दरडावून चौकशी करायचे. वरवर. पण मागितले की, पैसे काढून द्यायचे.

प्रेमाचे आणि त्याचे संबंध गेल्या वर्षा-पासूनचे होते. गेल्या वर्षीच ती तेथे आली होती. कुठून आली, ती कोण वगैरे माहिती द्वारकाला नव्हती आणि त्याची त्याला गरज नव्हती. द्वारकाने कितीतरी जणी पाहिल्या पण प्रेमापुढे त्याने पूर्णविराम दिला. तो तिथेच थांबला.

गेल्या काही दिवसांपूर्वीच द्वारका प्रेमाला म्हणाला होता, 'आपण लग्न करूया' हा सगळा मूर्खपणा वगैरे होता हे खरं पण त्याची ती अवस्था पाहून प्रेमाला देखील त्याची दया आली. त्याच्या शब्दांचा तिने फारसा विचार केला नाही आणि तिच्यावर त्याचा फारसा परिणामही झाला नाही. तरी त्याच्या शब्दांना तिने थातुरमातुर उत्तरे दिली आणि घ्यायचा तेवढा दाम घेतलाच.

ह्यानंतर एका वेगळयाच भावनेनं द्वारका तिथे जाऊ लागला आणि प्रेमा थोडयाच दिवसात फक्त 'आपली' होणार अशी आशा बाळगून राहिला. त्याबद्दल उतावीळही झाला. त्याला तोंड देता देता प्रेमा वैतागून जायची. पण त्याचं समाधान करणं प्रेमाला सोपं होतं.

● ●

सकाळी पावणेआठला फर्स्ट शीफ्ट सुरू व्हायची. कामगार सव्वासातपासून येत असा-यचे. गाडयांना जाम गर्दी असायची. फर्स्ट क्लास मोकळा असायचा. 'कँटीनका खाना जहन्नमें जाना', म्हणून काहीजण डबा आणायचे. सकाळचं अस्तित्व ह्या पलीकडे फारसं नसायचं.

आज सकाळी सात वाजताच साहेबांची मर्सिडीझ ऑफिससमोर चमकत होती. रात्र-पाळी सुटून डोळे तारवटलेले कामगार बिडी पित चालले होते. काहीजण मंजूर झालेलं कर्ज घेण्यासाठी नऊ वाजेपर्यंत थांबणार होते. नऊ वाजता कारकून मंडळींचं काम सुरू व्हायचं. कॅशिअरकडून तीस चाळीस रुपये कर्ज घेतलं की, रेशन आणून दळण टाकायला मोकळे.

साहेबांच्या पहिल्याच दिवशी त्यांनी सातला यावं म्हणजे कामगारांना चर्चेसाठी विषय होता.

साहेब सातलाच आले. आणि प्रथम बी. आर. आठवले, मॅनेजिंग डायरेक्टर' ही पाटी निखळली. त्या जागी साडेआठच्या आत 'व्ही. के. वालावलकर, चेअरमन अँड मॅने-जिंग डायरेक्टर' ही पाटी अक्षरशः झळकली. कर्मचारी मंडळी आली तेव्हा ती पाटी बघून टॉयलेटसमध्ये सकाळचा वेळ काढणारे फाय-लीत पेन खुपसून बसले.

सकाळी आल्याआल्याच जेली फरेराला साहेबांनी केबिनमध्ये बोलावलं. फायलींचा ढीग समोर ठेवून साहेब कामात गढले होते. ब्राऊन सूट आणि सोनेरी फ्रेमचा चष्मा, त्यात रुपेरी केस. मी मी म्हणणारा बितळला असता. साहेबांनी हात उडवत जेलीला समोर बसायला सांगितलं. नशीब जेलीचं की, आज ती वेळेवर आली होती. काहीबाही उभे तिरके प्रश्न विचारून साहेबांनी जेलीला जेरीस आणली आणि अर्ध्या तासाने 'डिक्टे-शनला ये' म्हणून सांगितलं.

मग साहेबांनी सटासट फोनचा सपाटा सुरू केला. आळीपाळीने पर्सोनेल मॅनेजर सबनीस, प्रॉडक्शन मॅनेजर गुप्ता, रीसर्च अँड डेव्हलपमेंट मॅनेजर कोएल्लो, मार्केटिंग मॅनेजर जॉन किसन, अकौंटंट नेमाडे, सिक्यु-रिटी ऑफिसर मेजर फडणीस इत्यादी मंडळी येऊन गेली. आली हंसतमुख, गेली घाम टिपत.

एकनाथला दिवसभर चंची सोडता येणार नव्हती, की स्टूलावर डुलक्या घेता येणार नव्हत्या. सर्व मंडळींची पाळी संपल्यानंतर जेली डिक्टेशनला बसली आणि डिक्टेशन होता होता तिची भंबेरी उडाली. 'स्पीड कमी आहे तुमचा.' साहेबांचा हा टोला ऐकून जेलीच्या डोळयात पाणी तरळलं. डिक्टेशन घेऊन घेऊन तिचे दंड दुखायला लागले. आणि हे सगळं आज साहेबांना संध्याकाळी टाईप करून हवं होतं. सकाळी तिने घेतलेला फिल्मफेअर वाईट पायगुणाचा निघाला होता.

टर्रर्रर्र ऽऽ. बेल वाजली तेव्हा एकनाथ दचकलाच. तो कोकरासारखा आत गेला. साहेबांना चहा हवा होता. त्याची व्यवस्था करण्यासाठी तो पॅंट्रीत गेला. कारण साहेबांना साखर कमी हवी होती.

नंतर साहेब सिगरेट शिलगावून कागद उलटेपालटे करीत बसले. दुपारी काही कल्पना नसताना साहेबांनी सर्व वर्कशॉप्सना भेटी दिल्या आणि कामाची जातीने पाहणी केली. साहेबांच्या आगमनाची झळ साऱ्या कंपनीला लागली होती. तो दिवस तसाच गेला. संध्याकाळी कामगारांची चर्चा चालली होती ती साहेबांच्या वर्कशॉप व्हिजीटवर.

● ●

दुसऱ्या दिवशी साहेब सकाळी म्हणजे पहाटे पाच वाजताच कंपनीत आले. पहाटेच्या काळोखात जेव्हा त्यांची ती पांढरी शुभ्र मर्सिडीझ मेनगेटमधून लाईटचे फवारे सोडीत आत घुसली तेव्हा गेटवरच्या वॉचमेनना आपण भुतालाच सलाम मारला असे वाटले. सव्वापाचला कुणी साहेब वर्क-शॉपमध्ये येईल, ही कल्पना कुणालाच स्वप्नातसुद्धा नव्हती. पण सव्वापाचला सूट-वाले एम. डी. साहेब वर्कशॉपमध्ये शिरले आणि टॉयलेटमध्ये झोपलेले आठ कामगार साहेबांनी पकडले. उद्या सरप्राईज व्हिजीट

होणार आहे, ह्याची कल्पना सबनिसांना होती. म्हणजे साहेबांनीच दिली होती. सकाळी सहा वाजताच ते हजर झाले. साडेसातला शिफ्ट सुटायच्या वेळेला त्या आठपैकी तीन टेंपररी कामगारांना टर्मिनेशन लेटर्स दिली आणि पाच कामगारांना वॉर्निंग लेटर्स देऊन त्यांची रेकॉर्डवर नोंद घेण्यात आली. त्यांना काढले नाही, कारण ते कायम होते.

सकाळी सव्वासातपासून फर्स्ट शिफ्टचे कामगार येऊ लागले, तेव्हा ही बातमी कापरासारखी पसरली. प्रभाकरही हबकून गेला. पावणेआठपर्यंत शेकडो कार्डे त्या मशिनवर खटाखटा पंच झाली आणि आठाला वर्कशॉपमधल्या मशिन्सनी ढाण ढाण ढाण ढाण वेग घेतला. नऊ वाजता पुन्हा देखरेखीसाठी साहेबांची फेरी झाली. फॅक्टरीतलं वातावरण बदलून गेलं होतं.

साडेनऊ वाजता साहेब पुन्हा केबिनमध्ये घुसले आणि त्यांनी सबनिसांना फोन फिरवला. काही क्षणांतच सबनीस धापा टाकीत हळूच केबिनमध्ये आले. युनिअनच्या लेटर्सच्या सहा कॉपीज त्यांनी काल टायपिस्टच्या मागे लागून लागून काढून घेतल्या होत्या. फाईलही तयार होती. त्यांच्या मते साहेबांनी त्यांचं कौतुक करायला हवं होतं. त्यांच्या तत्परतेची वाखाणणी करायला हवी होती. आणि ते खरंही होतं.

सबनिसांनी अदबीनं पेपर्स साहेबांच्या पुढ्यात ठेवले आणि साहेबांनी 'बसा' म्हटल्यावर ते बसले.

'व्हेअर इज दॅट ब्लडी लेटर,' साहेब गुरगुरले.

'येस सर, ह्या सहा कॉपीज रेडी आहेत.' सबनीस कार्यक्षमतेचा आव आणीत म्हणाले.

टार टार टार टार त्या साही कॉपीज साहेबांनी काही क्षणांत फाडून टाकल्या आणि कचऱ्याच्या टोपलीत ते अवशेष टाकले. सबनिसांची अवस्था त्या अवशेषांसारखीच झाली. ते हवेत असल्यासारखे पाहू लागले.

'तो बास्टर्ड कुठल्या डिपार्टमेंटला आहे ?' साहेबांनी करड्या आवाजात विचारलं.

'अं?...' सबनीस अजून तरंगतच होते.

'तो शेलार का कोण कुठल्या डिपार्टमेंटला आहे ?' साहेबांनी पुन्हा विचारलं.

'तो ॲसेंब्लिंगला आहे सर.' सबनिसात एकही अवशेष उरला नव्हता.

'यू स्टार्ट' म्हणत साहेबांनी फोन उचलला. सबनीस निमूटपणे निघून गेले. टायचा आधार घेत.

डिपार्टमेंट हेडला प्रभाकर शेलारला ताबडतोब केबिनमध्ये पाठवायला सांगून साहेबांनी फोन बंद केला आणि त्यांनी खसकन बेल दाबली. पुन्हा एकनाथ अंग चोरत आत आला. 'हे बघ, तो युनिअन लीडर शेलार येणार आहे. तो आल्यावर लगेच दोन नेस्कॉफी घेऊन ये.' साहेबांच्या ह्या शब्दावर मान हालवत एकनाथ केबिनमधून बाहेर आला.

दरवाजा वेगात आत ढकलून आत येणारा प्रभाकर पहिलाच होता. केबिनमध्ये आत आल्या आल्या करड्या नजरेनं साहेबांनी त्याला न्याहाळलं. विपुल केस व्यवस्थित चापून बसविलेले, अंगावर कामगाराचे कळकट तेलकट कपडे, दोन्ही हात काम करता करता काळे कुळकुळीत झालेले आणि तोंड घाम, धूळ ह्यांनी मळलेलं. उंचापुरा, पिळदार आणि तेजस्वी चेहऱ्याचा प्रभाकर साहेबांनी बरखाली व्यवस्थित न्याहाळला आणि खुर्चीकडे हात करत त्याला बसायला सांगितलं. प्रभाकरच्या जागी दुसरा कोणी असता तर, त्याची दातखीळ बसली असती.

'तुम्ही शेलार का ?' साहेबांनी सुरुवात केली.

'हो.' प्रभाकरचं एकेरी उत्तर.

तेवढ्यात एकनाथ नेस्कॉफीचे दोन नक्षीदार सुंदर कप घेऊन आला.

'घ्या, नेस्कॉफी आहे.' साहेबांनी प्रभाकरला म्हटलं.

'मी नेस्कॉफी घेत नाही.' प्रभाकरने परखड उत्तर दिलं.

'एकनाथ, नेस्कॉफी घेऊन जा. चहा आण.' साहेबांनी एकनाथला म्हटलं.

'मी चहाही घेत नाही.' पुन्हा प्रभाकरचं नकाराचं उत्तर.

'मग काय घेता ?' साहेबांचा सहज प्रश्न.

'कंपनीच्या कॅंटिनमध्ये कामगारांना जो लाल पाणचट चहा मिळतो तो घेतो मी कुपन देऊन.' प्रभाकरचं हे उत्तर वर्मी बसणारं.

'कामगारांना तुम्ही म्हणता तसला चहा मुळीच दिला जात नाही.' साहेबांनी साफ खोडलं.

'मी तुम्हाला आता आणून देतो, तुम्ही पिऊन सांगा.' प्रभाकर उठलाच.

'शेलार, बसा बसा. डोन्ट बी एक्साइटेड. मी चौकशी करतो.'

'साहेब, तुमच्याकडून चौकशीपेक्षा हालचालीची आवश्यकता आहे. चहा बाजूला ठेवा. कामगारांच्या रोजच्या घासाचं पाहा. आमच्या युनिअनच्या लेटरचा चांगला जबाब द्या. कामगारांचा दुवा घ्या.'

'शेलार, तुमचं लेटर मी पाहिलं आहे, त्यावर योग्य ते रिमार्क मारले आहेत.'

'आम्हालारिमार्क बिमार्कशी कर्तव्य नाही साहेब. माझे कामगार नोटीसबोर्डाकडे आशा लावून बघतायत की, ह्या नोटीसबोर्डावर पगारवाढीची नोटीस कधी लागते आणि बायकापोरांना आम्ही कधी कपडेलत्ते घेतो.'

'शेलार शेलार, मी म्हणतो ना डोन्ट बी एक्साइटेड. तुमच्या मागण्या मान्य होणार नाहीत असं नाही. पण मी सांगतो ते ऐका. तुम्ही तुमचं युनिअनचं लेटर परत घ्या.'

'अशक्य. साफ अशक्य.' प्रभाकर उठत म्हणाला. 'जीव गेला तरी ही गोष्ट होणार नाही माझ्या हातून.'

'शेलार, तुम्ही निष्कारण गैरसमज करून घेताय. मला नीट समजून घ्या.'

'आम्ही काहीही समजणार नाही. कामगारांचा गळा घोटू नका. आधीच कर्जाचे पाश आवळले गेलेत त्यांच्या गळ्याभोवती.'

'अगेन, यू यंग चॅप. माझं ऐकून घ्याल का नाही, तुम्ही तुमच्या मागण्या योग्य तऱ्हेनं दिलेल्या नाहीत. माझं ऐकून घ्या. मला असं म्हणायचंय की, मॅनेजमेंटला तुमच्या मागण्या कळविण्यापूर्वी तुम्ही त्याच्यावर नीट विचार केलेला नाही. म्हणजे असं की, शंभर रूपये वाढ मागायची तर, तुम्ही पन्नास रुपये मागितलीत. बरं, कित्येक मागण्या ह्यात नाहीतच. तुम्हाला काय मागायचंय ते एकदाच मागा. पुन्हा पुन्हा मिळणाऱ्या ह्या गोष्टी नव्हेत. मी काय, उद्या बोर्ड मीटिंगमध्ये ह्या मागण्या मान्य करून घेईन. मग पुन्हा येऊ नका. मी सांगतो, लेटर नीट 'रिवाईज' करा.'

लेटर 'रिवाईज' करून दिले असते तर, अवास्तव मागण्या म्हणून त्या नामंजूर करणं

साहेबांना सोपं गेलं असतं. हे डावपेच न कळण्याइतका प्रभाकर खुळा नव्हता.

'साहेब, आम्ही जे मागितलेलं आहे ते कमीत कमी आहे. किमान आहे. कामगारांच्या भल्यासाठी तुम्हाला आणखी द्यायचे असतील तर द्या. कामगार दुवाच देतील. आणि ज्या मागण्या ह्यात नाहीत त्या तुम्हीच न मागता द्या म्हणजे तुमचं प्रेस्टीज वाढेल.' साहेबांच्या डावपेचाचे तुकडे तुकडे झाले, तेव्हा साहेब न कचरता म्हणाले–

'हे बघा माझं काहीच म्हणणं नाही. तुम्हाला काहीच नको असेल तर, तसं लिहून द्या. मी तुमच्याच भल्यासाठी म्हटलं. सोडून द्या.'

'मग आमच्या लेटरचा निर्णय मी आशादायक समजतो साहेब.' प्रभाकर मुरलेला होता.

'शेलार, घाई करू नका. मी कालच आलोय. ह्यावर विचार करतो. कंपनीचं बजेट पाहतो. ते अॅडजेस्ट करावं लागेल. गेल्या दहा वर्षात किती टक्के उत्पादन वाढलं ते बघतो. दरडोई कामगारामागे उत्पादनवाढीचा वेग बघतो. हे सगळं मी ताबडतोब करायला सांगितलेलं आहे. त्याचा अहवाल तयार होईल. तुमच्यासाठी खास बोर्ड मीटिंग होईल. हा अहवाल दाखवला जाईल. मागण्या समोर ठेवल्या जातील. आय विल ट्राय माय लेव्हल बेस्ट.'

'साहेब, ह्या सर्वांशी काही गरज नाही. कागदी आकड्यांनी काही पोट भरायचं नाही. तुम्ही हजार कागद अहवाल काढा. आम्ही विचारणार नाही. फक्त आम्हाला नीट जगवा. आमचं जीवनमान बघा. आमच्या बायकापोरांचा आणि आमचा विचार करा. आम्ही निमूटपणे मागतो, तुम्ही निमूटपणे द्या. तुम्ही मोडता घालाल तर......'

प्रभाकर थांबला.

'शेलार, मी प्रॅक्टिकल मनुष्य आहे. प्रत्येक गोष्टीत खोलात जाऊन सत्य शोधतो. तुमचा विचार आम्ही आम्हाला योग्य वाटेल त्याप्रमाणे करू. बोर्ड मीटिंग निर्णयानंतर तुम्ही तुम्हाला वाटेल ते करा. पण काय निर्णय येतोय हे पहाल की नाही?'

'साहेब, तुटेपर्यंत ताणू नका. कामगारांची सहनशक्ती पाहू नका. बस. एवढंच सांगतो.'

प्रभाकर निघून गेला, आणि साहेब सिगरेट शिलगावून धूर सोडीत बसले. प्रभाकरला कसा उचलायचा ह्याच विचार त्यांच्या मनात होता. ● ●

## उत्तरार्ध पुढील अंकी


### –नवीन दाखल झालेली पुस्तके–

| | |
|---|---|
| १. लाल माती रंगीत मने– (व्यक्तिचित्रे) – शिवाजी सावंत | रु. २०।– |
| २. अर्धांग– (कादंबरी) – जयवंत दळवी | रु. १४।– |
| ३. कॅलिडोस्कोप– (कादंबरी) – अच्युत बर्वे | रु. १६।– |
| ४. कसम– (ऐतिहासिक कथा) – सौ. शैलजा राजे | रु. १२।– |
| ५. नवीपार– (कथासंग्रह) – चारुता सागर | रु. १५।– |
| ६. अंगावर अंधार– (कथासंग्रह) – वा. रा. सोनार | रु. १५।– |
| ७. मागोवा– (कथासंग्रह) – प्रभाकर दिघे | रु. १६।– |
| ८. पुरावा– (कथासंग्रह) – प्रभाकर दिघे | रु. १५।– |

**English**

| | |
|---|---|
| **1. You Said it (5) – (cartoons) --- R. K. Laxman** | **Rs. 5।–** |
| **2. Down where the moon is small– (Bestseller–Novel)–** Richard Llewllyn | **Rs. 10।–** |
| **3. The Industrial State– J. K. Galbraith** | **Rs. 16।–** |

- Watching T. V. will make you a conformist– but book– reading will make you an individualist –!
- नॉन मेंबर्सकरिता डेलिव्हेसीसवर पुस्तके वाचावयास मिळतील.

**दि फिनिक्स लायब्ररी**

७२७, सदाशिव पोस्टासमोर, पुणे ३०.

## सर्वोत्तम लेखक ('टाईम' वरून)

# ज्यॉ पॉल सार्त्र

परिचय जे. एन्. पोंडा
(फिनिक्स लायब्ररी, पुणे)

अल्बेर कामू एकदा म्हणाला होता, 'Mankind has but one problem and that is suicide' सीगमंड फ्रॉईडच्यावतीने मी असे म्हणतो, 'Mankind has but one problem And that is sex.'

सार्त्रचा परिचय करून देताना हे लिहायचे कारण की, तो एकदा म्हणाला होता की, मी काहीही करीत असताना माझ्या मनात बाईचे विचार सतत घोळत असतात ! आणि सार्त्रने लेखणी का उचलली माहीत आहे तुम्हाला ? आपल्या प्रतिभेमुळे बऱ्याच स्त्रियांनी भारून जावे यासाठी ! तो स्वतः खुजा असुन दिसायला कुरूप आहे. आपल्या ह्या अवतारावर कोणतीच स्त्री खूष होणार नाही असे त्याला वाटले. परंतु आपण जर आंतरराष्ट्रीय कीर्ती असलेलें प्रभावी लेखक झालो तर, कित्येक स्त्रिया आपणहून येतील असे त्याला वाटले. एकदा कीर्ती आपल्या पदरी पडली की, आपली 'कुरूपता त्यात लुप्त होईल' असे त्याला वाटले व तसे झालेही. स्त्रिया या नुसत्या दिसायला सुरेख अशा Adonis वर प्रेम करीत नसतात पण कर्तृत्वाबर प्रेम करीत असतात असा एक समज आहे. अगदी अलिकडे सार्त्रची मुलाखत Catherine Chaine हीने Le Nouvel Observateur या नियकालिकात दोन भागांत प्रसिद्ध केली होती. याच मुलाखतीत सार्त्रने बाईविषयी आपल्या डोक्यात सतत विचार चालू असतात असे सांगितले होते.

सार्त्रने Simone de Beauvoir या बाईशी बऱ्याच वर्षांपूर्वी एक दोन वर्षांचा तोंडी करार केला होता. त्या दोघांनी असे ठरविले की, लग्न न करता त्या दोघांनी दोन वर्षे रहायचे आणि प्रत्येकाने 'करारबाह्य' शरीरसंबंध ठेवायचे व त्याची माहिती एकमेकांनी प्रामाणिकपणे दुसऱ्याला द्यायची. दोन वर्षांनंतर दोघांच्या संमतीने कराराचे परत नूतनीकरण करायचे. अशा तऱ्हेने कितीतरी वर्षे निघून गेली आणि अजूनसुद्धा तो म्हातारा व ती म्हातारी लग्न न करता बरोबर राहिली आहेत. जगातले प्रत्येक जोडपे इतक्या प्रामाणिकपणे राहिले तर कितीतरी संघर्ष टळतील. लग्न झाले की, जोडप्याने बरोबर रहायलाच पाहिजे अशी समाजाची अपेक्षा असते ती अत्यंत चुकीची आहे. पुरुषाला प्रत्येक गोष्टीत Variety हवी असते आणि त्यातल्या त्यात मला वाटते, जे पुरुष highly creative असतात ते highly Sexed असतात. सार्त्र, पिकासो, केनेडी (तो politically-creative होता !) व इतर कैक उदाहरणे देता येतील. याच्याविरुद्ध highly sexed पुरुष highly creative असतातच असा अर्थ कुणी लावू नये. नाहीतर क्रिएटीव्हिटी वाढण्याऐवजी क्रिएशनच वाढेल !

अल्बेर कामूचा परिचय करून देताना मी असे सांगितलेच होते की, सार्त्र हा थोडासा धंदेवाईक व acedemic तत्त्वज्ञ आहे. सार्त्रची भाषेवर जबरदस्त पकड आहे. शब्दांशी व विचारांशी तो कसा खेळत राहतो हे वाचून आपण आश्चर्यचकित होतो. ज्यांनी मूळ फ्रेंच भाषेत सार्त्र वाचला आहे ते तर, त्याच्या प्रभुत्वाने स्तंभितच होतात. त्याच्या लिखाणामुळे त्याला निश्चितच भरपूर स्त्रिया मिळाल्या असतील.

ज्यॉ पॉल सार्त्र जगभर प्रसिद्ध झाला तो त्याच्या अस्तित्ववादाच्या लिखाणासाठी. अस्तित्ववाद म्हणजे आता या घटकेसाठी जीवन जगणे. नावाप्रमाणे जीवनाचे अस्तित्व हेच सर्वात अधिक महत्त्वाचे मानले जाते. अस्तित्ववादाचा खरा जनक म्हणजे Soren किरकेगार्द (Kirkegaard). पण सार्त्रसारखा या तत्त्वज्ञाचा अस्तित्ववाद नास्तिक नव्हता. किर्केगार्दने 'ख्रिश्चन अस्तित्ववादाला' जन्म दिला. पुढे जॅस्पर्स, हायडेगर, युनामुनो वगैरे तत्त्वज्ञांनी स्वतःच्या दृष्टिकोनातून अस्तित्वाद मांडला. ते दोन चमत्कारिक लेखक, डॉस्टॉव्हस्की व काफ्का, यांच्या साहित्यात सुद्धा अस्तित्ववादाचे प्रतिबिंब उमटलेले दिसते. डॉस्टॉव्हस्कीच्या साहित्यात त्याच्या पात्रात 'मी' असल्याची 'माझे अस्तित्व असल्याची' जाणीव इतकी तीव्र असते की, त्या जाणीवेनेच ती पात्रं गुदमरून जात असतात. सार्त्रने मात्र अस्तित्ववादाच्या जणू सीमा आखल्या व त्या अस्तित्ववादाला स्वतःचे असे रूप व आकार दिले.

अर्थात अस्तित्ववाद हा नशीबास मानत नाही, परमेश्वराला मानत नाही. स्वतःच्या actions साठी मनुष्य हा स्वतःच जबाबदार असतो असे अस्तित्ववादी म्हणतात. मनुष्य हा स्वतःच्या free will ने अनेक गोष्टींची निवड करीत असतो. अस्तित्ववादाला या free will बरोबर जबाबदारीची जाणीवसुद्धा असावी लागते. त्यानी जर निवड करण्याचे टाळले व बाह्यगोष्टींचा त्यावर असर होऊ लागला तर तो कमकुवत आहे व त्याच्या अपयशासाठी तोच जबाबदार आहे असा काही अस्तित्ववादाचा समज आहे. [परंतु कोणतीही निवड न करणे ही सुद्धा एक प्रकारची निवडच नाही का ?] ते असेही सांगतात की, अप्रगट मन हे rational नाही व जीवन हे सतत बदलणारे व dynamic आहे, व ते जगण्यासाठी सतत action हवी. अस्तित्ववाद हा जीवनाकडे पाहण्याचा एक दृष्टिकोन आहे आणि हा एक दृष्टिकोनसुद्धा वेगवेगळ्या लोकांनी वेगवेगळ्या रंगांच्या चष्म्यातून पाहिला आहे. या अस्तित्ववादाचे पडसाद पुष्कळ साहित्यामधून उमटलेले दिसतात.

अस्तित्ववाद अस्तित्ववाद आपण ज्याला म्हणतो तो आहे तरी काय असा प्रश्न पूर्वी मला पडत असे पण या विषयावर साहित्य वाचले तेव्हा कळले की, हा अस्तित्ववाद एक नसून त्याचे अनेक पैलू आहेत. म्हणजे आता तुम्हाला अस्तित्ववाद काय आहे असे विचारायचे झाले तर, 'किर्केगार्दचा अस्तित्ववाद हा काय प्रकार आहे ?' 'सार्त्रचा अस्तित्ववाद म्हणजे काय ?' 'मार्टीन हायडेगरचा अस्तित्ववाद कोणता ?' असे विचारायला लागेल.

सार्त्रचा अस्तित्ववाद कळायला त्याचे Being and Nothingness हे पुस्तकच वाचायला हवे. आधीच हे पुस्तक भाषांतर केलेले आहे. जेव्हा जेव्हा साहित्यकृतीचे

भाषांतर होत असते तेव्हा तेव्हा त्याचा एखादा लचका तुटला जातो आणि त्या भाषांतर केलेल्याच साहित्यकृतीतून जेव्हा समीक्षक वेगवेगळे अर्थ काढायला लागतात तेव्हा तर, त्या साहित्यकृतीचे इतके लचके तुटतात की ती ठार मरते. एक तर या कारणामुळे Being and Nothingness या पुस्तकाबाबत माझे स्वतःचे मत मी देणार नाही. आणि दुसरे म्हणजे हे पुस्तक ८११ पानी आहे आणि त्याचे विवेचन करायला 'माणूस' चा सबंध अंक पुरणार नाही. खरोखरच Being म्हणजे अवकाशातले (Nothingness) एक भोक आहे !

आणखीन एक मुद्दा उपस्थित होतो तो असा की, निव्वळ बाईला वश करण्यासाठी उचललेल्या लेखणीला किती महत्त्व द्यायचे ? बायांना बघून सार्त्रचा प्रत्येक देहकण तिकडे धाव घ्यायचा. याचे उत्तर असेच देता येईल की, सार्त्रने स्वतःच तशी कबुली दिली असली तरी, या गोष्टीला आपण फारसे महत्त्व देऊ नये. प्रतिभा ही नुसतीच बायांच्या मागे धावण्याने येत नसते. बऱ्याच वेळा प्रतिभा ही उपजत, उत्स्फूर्त असते. कधी कधी प्रतिभासाधनेने पण प्रतिभा येते. पण त्यासाठी रक्त आटवावे लागते. Genius is an infinite capacity for taking pains ही जी इंग्रजीत म्हण आहे ती अगदी योग्य आहे. सार्त्रची प्रतिभा ही उपजत आहे. सार्त्र हा प्रतिभाशाली आहे हे म्हणणे म्हणजे सूर्याला प्रकाश असतो असे म्हणण्यासारखे होईल. सार्त्रचे लिखाण अत्यंत धारदार आहे. सार्त्रची ही प्रतिभा केव्हा ना केव्हा तरी फाकलीच असती म्हणून 'बाया मिळवण्यासाठी मी लेखणी उचलली,' या सार्त्रच्या विधानाकडे आपण दुर्लक्ष केले पाहिजे. त्याच्या लिखाणांची परीक्षा त्याच्या–गुणावगुणांवरूनच करायला हवी.

असे म्हणतात की, अस्तित्ववादात abstractions नसतात पण सार्त्रच्या Being and Nothingness या पुस्तकात भरपूर abstractions आढळतात. पुस्तक भाषांतरीत झाले म्हणून असे वाटत असेल. पण पुस्तक वाचताना 'केवढे हे पांडित्यदर्शन' हा विचार मनात आल्याशिवाय राहत नाही.

जाता जाता एक असे सांगून टाकतो की, सार्त्र एकदा समकालीन इंग्रजी साहित्याला Ladies' Orchestra म्हणाला होता. पण सार्त्रचे साहित्य वाचले की, त्याला Philarmonic Orchestra हे नाव देणेच योग्य ठरेल असे वाटते. साहित्याचे वर्णन करताना सुद्धा बाया आल्याच ! अस्तित्ववादापेक्षा सार्त्र Tantric Philosophy मध्येच किती रमला असता हाच विचार मला वारंवार मनात येतो.

सार्त्र ज्या त्वेषाने म्हणतो, 'Man is condemned to be free' त्या त्वेषालाच एक प्रकारचा असहिष्णुतेचा, कर्मठपणाचा वास येतो. 'Man is condemned to be free' च्या ऐवजी त्याने 'Man is born to be free' असे तो म्हणाला असता किंवा condemned च्या पुढेच जर त्यांनी पूर्णविराम दिला असता तर, तेवढे ते मला खटकले नसते ! अस्तित्ववादात माणसांचे भविष्य हे पूर्वनियोजित नसते व ते तो स्वतःच घडवित असतो असे ठामपणे सांगितले जाते. माणूस स्वतःच्या फ्री विलनेच निवड करतो की, याप्रमाणे वागावे की, त्याप्रमाणे वागावे. free will हा अस्तित्ववादाचा स्तंभ आहे असे म्हटल्यास गैर होणार नाही. पण मला वाटतं. हे फ्री विल मुळातच तेवढं फ्री नसतं. DNA molecules मुळे आनुवंशिक message transmit केले जातात. म्हणजे माता पित्याचे अनेक गुण आणि दुर्गुण अर्भकाला त्यांच्या इच्छेविरुद्ध दिले जातात. अजून तरी हे दिलेले गुण वा अवगुण कुणी बदलू शकत नाही. नजीकच्या भविष्यात कदाचित विज्ञानाच्या साह्याने ते शक्य होईल पण तोपर्यंत तरी 'मनुष्याला free will आहे' असे म्हणणे योग्य होणार नाही.

free will चा दुसरा कट्टर शत्रू म्हणजे भोवतालची परिस्थिती. या परिस्थितीचा असर आनुवंशिकतेपेक्षाही प्रभावी असतो, असे काही मानसशास्त्रज्ञ मानतात. अलीकडे ethology हे शास्त्र अमेरिकेत प्रचलित आहे. यामध्ये प्राण्यावर प्रयोग करून ते माणसाला extrapolate केले जातात. या प्रयोगात असे सिद्ध झाले आहे की, अनुवंशिकता व भोवतालच्या परिस्थितीमुळे जवळजवळ जखडलेलाच असतो. B. F. Skinner हा एक अमेरिकेतला प्रख्यात ethologist आहे. त्याने 'Beyond freedom dignity' नावाचे एक अत्यंत खळबळजनक पुस्तक लिहिले आहे. त्या पुस्तकाचे वर्णन एका वाक्यात असे करता येईल, 'Man is nothing but a product of chemical secretions and muscular reactions.'

कॉनरॅड लॉरेंझ हा दुसरा प्रख्यात ethologist. त्याचे On Agression हे पुस्तकही स्कीनरच्या पुस्तकाइतकेच वादग्रस्त आहे. कॉनरॅड लॉरेन्झने तर, एका प्रयोगात असे सिद्ध केले की, आनुवंशिकतेमुळे बदकांची पिल्ले जन्माला आली की, हालणाऱ्या वस्तुमागे पळतात ! म्हणजे त्यांच्या आईमागे पळायचे याचे ज्ञान या पिल्लांना जन्मतःच असते. स्मरणशक्तीसुद्धा आनुवंशिकतेमुळे पुढच्या पिढीला मिळू शकते ! आनुवंशीकतेमुळे जर इतकी क्षुल्लक गोष्ट पुढच्या पिढीला मिळू शकते, तर आणखीन काय काय मिळत नसेल ! यालाच genetic transplantation of memory असे म्हणतात. हे सर्व सांगण्याचे कारण असे की, आनुवंशिकता व भोवतालची परिस्थिती याचा इतका प्रचंड परिणाम असतो की, त्यापुढे free will चा चुराडाच होऊन जातो. या सर्व गोष्टी विचारात घेतल्या तर, अस्तित्ववादाचा पायाच हादरून जातो.

नॉर्मन मेलर हा naked and the dead या कादंबरीचा अमेरिकन लेखक. सार्त्रनी १९६४ मध्ये नोबेल पारितोषिक नाकारले होते त्यावेळेला हा नॉर्मन मेलर म्हणाला होता, 'मध्यमवर्गीय लोक सार्त्रला विकृत अस्तित्ववादी असे म्हणतात. सार्त्रनी जर नोबेल पारितोषिक स्वीकारले असते तर, विकृत अस्तित्ववादीने नोबेल पारितोषिक स्वीकारले,' असे मध्यमवर्गीय म्हणाले असते, इतकेच.'

Simone de beauvoir याने सार्त्र व कामू युद्धानंतर पॅरीसमध्ये असताना The Mandarins या नावाची त्या दोघावर कादंबरी लिहिली आहे. □

# टेक इट लाईटली

संजीव मंगरूळकर

## □ एका चिकूवाल्याची गोष्ट

हा चिकूवाला हेही पुण्याचं एक मोठं प्रस्थ आहे. प्रस्थ म्हणण्याइतकी प्रतिष्ठा, राजमान्यता वगैरे त्याला लाभलेली नसेल, कारण तसला भारदस्तपणा काही त्याच्याजवळ नाहीं. आहे ते विनोद, झंगडपणा, रांगडेपणा आणि सरळसोटपणा यांचे एक मासलेवाईक मिश्रण. आणि या सगळ्या मिश्रणामुळे त्याचे चिकू खपतात असे मुळीच नव्हे. चिकू खपणे, न खपणे हा अगदीच गौण मुद्दा आहे आमच्या दृष्टीने आणि कदाचित त्याच्याही ! पण या मिश्रणामुळे उपस्थितांचे भरपूर आणि मोफत मनोरंजन मात्र हमखास होते.

साधारणपणे दुपारची कुठली तरी वेळ असते. ही वेळ गल्लीनुसार बदलते. रस्त्यावर बहुतेक शांतता पसरलेली असते. गल्लीबोळात कुठे तुरळक पोरांचा गोटयांचा डाव रंगत असतो, कुठल्याश्या कट्ट्यावर चार टारगट पोरांचा विचकट गप्पांचा फड पडलेला असतो. करूनसवरून थकलेल्या भागलेल्या महिला दुपारची वामकुक्षी करता करता 'गृहिणी,' 'वनितासमाज' सारख्या होतकरू कार्यक्रमांमधून 'बाळाची निगा कशी राखाल ?' किंवा 'केळाची भाजी कशी करावी' यांसारख्या उपदेशामृताचे कडबट गुटके गिळत असतात. एकूण वेळ पुरती बोअर करणारी. अशा वेळेला तो कुठूनतरी साद घालतो – 'अरे खा बडे बडे' 'या चिकूंना पुण्यात तोड नाही तोऽऽड !' आणि मग सगळ्या सुस्त वातावरणाला जाग आल्यासारखी होते. दमल्याभागल्या गृहकृत्यदक्ष भगिनी आपली अर्धवट वामकुक्षी संपवून रेडिओ बंद करतात. टारगट पोरांचा कंपूदेखील टिंगलखोरपणे चिकूवाल्याकडे पाहून हसू लागतो. त्याची रेवडी उडवण्यासाठी ! अगदी लहानगी पोरंसुद्धा गोटयांचा डाव अर्धवट सोडून त्याच्याकडे आदराने पाहू लागतात. नुकताच बोलायला शिकलेला कुणी पोर आपल्या आईच्या कडेवरूनच 'अले खा बले बले ... असा एक टाहोही फोडतो.

आणि या सगळ्या स्वागताच्या पूर्वसिद्धतेकडे अगदी दुर्लक्ष करून चिकूवाला मात्र पुढेच निघतो. जणू आपण त्या गावचेच नव्हेत असा आविर्भाव ! मग लहान पोरांचा त्याच्या हातगाडीभोवती गराडा पडतो. ती त्याला वेडावून दाखवतात. हसून दाखवतात. त्याच्या वाटेत आडवी आडवी येतात. कुणी थोडा मोठा पोरगा त्याची नक्कल करतो. पण चिकूवाला बघत नाही. तो पुढेच जाणार अशी लक्षणे दिसतात. आणि मग मात्र न राहवून एखादा मोठा बाप्याच त्याला हाळी घालतो.

'काय चिकूवाले आज काही विशेष बातमी ?'

'काय राव आज काहीतरी बार उडवा ! अशी एकूण मनधरणी सुरू होते.

आणि मग तो खुशीत येतो. खुलतो. अगदी रंगात येतो.

डोक्यावर काळी विस्कटलेली टोपी, त्यातून अस्ताव्यस्तपणे नको तिथून बाहेर पडणारे काळे केस, अजागळपणे वाढलेले दाढीचे खुंट, अंगावर मळका शर्ट आणि पायजमा, डोळयात एक बेदरकार मिस्किलपणा ... असे सगळेच निगेटिव्ह पॉइंट्स् ! अशी व्यक्ती रंगात येऊन येऊन करणार तरी काय ?

मग तो मिस्किलपणे हसत आसपास बघतो. चिकूची गाडी थांबते. हातात एक वर्तमानपत्राचा तुकडा. तो नजरेसमोर उचलून धरलेला. बोलताना आसपासच्या मंडळींच्या नजरेला नजर देण्याची शरम वाटत असावी कदाचित. आणि मग चिकूवाल्याचं वक्तव्य सुरू होते. तिरकी मान करून आणि डोळे किलकिले करून तो मुक्ताफळं उधळू लागतो. राजकारण हा त्याचा आवडता आणि हातखंडा विषय. राजकारणावर बोलताना त्याची प्रतिभा अगदी बहरून येते. निवडणुकीच्या आधीच्या काळात त्याच्यातला राजकारणी मुत्सद्दीच जागा झाला होता. त्याची त्यावेळची अशीच काही विनोदी वक्तव्ये ती अगदी अजूनही चांगली आठवतात.

निवडणूक प्रचाराच्या धुमश्चक्रीत एकदा तो म्हणाला होता –

'अरे लोक म्हणतात ( हे नेहमीचं पालुपद ! ) या निवडणुकीत तुम्ही कोणाच्या बाजूनं उतरणार ?...अर्थात काँग्रेसच्या ! लक्षात ठेवा ( हे नेहमीचंच धृपद. ) काँग्रेस हा एक अतिशय जबरदस्त आणि प्रभावी पक्ष आहे. पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी या आमच्या नेत्या आहेत. यशवंतराव चव्हाण आमचे शिलेदार आहेत आणि चिकूवाला एक शिपाई आहे. लक्षात ठेवा, या निवडणुकीत काँग्रेसच हमखास विजयी होणार ...अरे खा बडे बडे (ही नेहमीचीच सम.)'

तर अशा रीतीने निवडणुकीत त्याने काँग्रेसची बाजू उचलून धरली. अगदी मनापासून उचलून धरली. त्याची जात मुत्सद्याची त्यामुळे त्याची खात्रीच होती – भारतात काँग्रेसला पर्याय असणार नाही. भारतीयांचे पातिव्रत्य, एकनिष्ठता अढळ आहे! 'जनता' प्रेमी मंडळींना त्याचा राग येई. या अडाण्याला काय समजते ? उगीच जास्त वटवट करतो. चिकूपेक्षा साल्याला राजकारणाचीच हौस– असा त्यांचा रोष. एक दिवस चिकूवाल्याने कमालच केली. बोलू लागला –

'अरे लोक विचारतात ह्या निवडणुकीत कोण विजयी होणार – काँग्रेस की जनता ? मी सांगतो. या निवडणुकीत काँग्रेसच हमखास विजयी होणार. आमच्या नेत्या इंदिरा गांधी म्हणाल्या– आज विरोधकांनी काँग्रेसची कोंडी केली आहे. देशभर इंदिरा गांधी ही कोंडी फोडत आहेत सातार्‍यात यशवंतरावजी ही कोंडी फोडत आहेत. आणि पुण्यात चिकूवाला ही कोंडी फोडत आहे...... अरे खा बडे बडे '

त्याचा आत्मविश्वास हा असा एकूण

जबरदस्त. स्वाभिमानाचं अवसानही तसंच जबरदस्त ! त्याच्या या अवसानावरच सगळं पब्लिक खूश आहे. अगदी 'जनता'प्रेमी राजकारणीसुद्धा ! निवडणुकीच्या काळात चिकूवाला असा अगदी हिट झाला ! आया-बाया पोरेसोरे त्याला आवर्जून अडवू लागली. बातमी विचारू लागली. चिकूवालाही प्रचार करू लागला. कॉंग्रेसची कोंडी फोडू लागला. निवडणुकीच्या बहात्तर तास आधी त्याने आपले प्रचारकार्य थांबवले ! अगदी तसे जाहीरसुद्धा केले ! निवडणुकीच्या दुसऱ्या दिवशी येऊन निकाल सांगण्याचे आश्वासनही दिले.

आणि निवडणुका झाल्या. त्यांचे निकालही लागले. त्यात कॉंग्रेसचा पुरता निकालही लागला. एकूण हवामान जरा निवळताच सगळ्यांना चिकूवाल्याची आठवण झाली. त्याची कॉंग्रेस पडली होती. त्याच्या नेत्या पडल्या होत्या. चिकूवाल्याचा अभिप्राय ऐकायला सगळेच आता उत्सुक झालेले. पण चिकूवाल्याचे कुठेच चिन्ह नाही. तीन दिवसात त्याची आरोळी ऐकू आली नाही. चिकूवाल्याचा आवाज बंद झाला असेही काहींना वाटले.

आणि एक दिवस पुन्हा तो आला ! अगदी गरजत आला. नेहमीसारखा अगदी आत्मविश्वासाने —

'अरे लोक विचारतात गेले दोन दिवस तुम्ही कोठे होता ? लोकहो, मी विचार करत होतो. या निवडणुकीत कॉंग्रेस पक्षाला जबरदस्त हादरा बसला आहे......

आणि मग त्याने तितक्याच सहज विनोदाने कॉंग्रेसच्या पराभवाची बातमीही जाहीर केली. जनता पक्षाच्या कलाने भाषणे सुरू केली. त्याचा मतलब चिकू विकण्याशी फक्त ! एक दिवस त्यानेही आपण कॉंग्रेस सोडण्याचा विचार करीत असल्याचे जाहीर केले. इंदिरा गांधींविषयी एकदा तो बोलला.

'आता इंदिरा गांधी शोकसागरात मग्न आहेत. संजय गांधी गटांगळ्या खात आहेत, यशवंतराव भोवऱ्यात सापडले आहेत आणि चिकूवाला त्यांच्या मदतीसाठी दोर फेकीत आहे. या यशवंतराव बाहेर या ! ...अरे खा बडे बडे ! '

कॉंग्रेसच्या राजकारणाची दशा त्याला उमगली असावी. आता त्यानेही टोपी फिरवली होती. उगवत्या 'जनता'पुढे तो आता नम्र होत होता. त्यांचे गुणगान करत होता. मग एक दिवस त्याने नवीन पंतप्रधान मोरारजी देसाई यांची माहिती सांगितली —

'अरे लोक विचारतात, आम्हाला मोरारजींची माहिती सांगा. सांगतो ऐका. पंतप्रधान मोरारजी हे भारताचे पोलादी पुरुष आहेत ! भारतात पोलादी पुरुष एकूण तीन — एक सरदार वल्लभभाई, दुसरे मोरारजीभाई आणि तिसरा आपला चिकूवाला ! ... अरे खा बडे बडे.

आपण त्याच्या या पोलादीपणावर फिदा आहोत. त्याचे चिकू भले न खपोत, त्याचे राजकारण सर्रास खपते, अगदी मनापासून गोड लागते. कारण तेच अगदी मनापासून खरे आहे ! आणि तेच खरे तुमचे आमचे राजकारण आहे ! □

---

# अवती-भवती : पृष्ठ ७ वरून

असल्यास टाळता येणार नाही का ?

चंद्रशेखर : राजकीय जिवनामध्ये समतोल साधला जाण्याची आवश्यकता असतेच, आणि त्या दृष्टीने कॉंग्रेसचा पूर्ण निप्पात ही एक दुर्दैवी गोष्ट ठरेल. समजा तू म्हणतोस त्याप्रमाणे जनता पक्षाला विधानसभा निवडणुकांमध्ये अतिप्रचंड बहुमत मिळाले तर, कोणाही एका व्यक्तीचे अवाजवी महत्त्व न वाढता—पक्षांतर्गत लोकशाही राहील यासाठी मी झटून प्रयत्न करीन. कॉंग्रेसमध्ये पक्षांतर्गत लोकशाही सुमारे २५ वर्षे मोठ्या प्रमाणात अस्तित्वात होती. गेल्या चार-पाच वर्षांमध्ये या पक्षांतर्गत लोकशाहीला नख लावले गेले. आणि हा प्रचंड वृक्ष उन्मळून पडला. जनता पक्षाचा अध्यक्ष म्हणून मला असे मनापासून वाटते की, बदललेल्या परिस्थितीमध्ये कॉंग्रेसने जबाबदार विरोधी पक्षाची भूमिका बजवावी.

प्रश्न : तसे होऊ शकले नाही तर ?

चंद्रशेखर : तर जनता पक्षाला—अन्यत्र होणाऱ्या टिकेची दखल घेत आणि पक्षांतर्गत लोकशाहीची जोपासना करत वाटचाल करावी लागेल. लोकशाही जिवंत आणि क्रियाशील ठेवण्याचा तेवढा एकच मार्ग जनता पक्षापुढे शिल्लक उरतो.

प्रश्न : बदलती हवा लक्षात घेऊन जनता पक्षामध्ये संधीसाधू आणि काळाबाजारवाले यांचा मोठ्या प्रमाणावर भरणा होत आहे असे तुम्हाला वाटत नाही का ?

चंद्रशेखर : आम्ही कितीही प्रयत्न केले तरी, पुढे त्रासदायक ठरणारी काही मंडळी या संधीचा फायदा घेत पक्षात येणारच भारतासारख्या देशामध्ये या गोष्टी टाळता येण्यासारख्या नाहीत फक्त पक्षाच्या ध्येयधोरणांवर या मंडळींचे वर्चस्व निर्माण होणार नाही एवढी काळजी घेणे मात्र अत्यंत आवश्यक आहे.

प्रश्न : काही उद्योगपतींचे कॉंग्रेसवर वर्चस्व होते. सत्ताधारी पक्षामधील मंडळींना हाताशी धरून त्यांनी धोरणे ठरवण्याबाबत वर्चस्व गाजवले, आता तेच लोक जनता पक्षाच्या नेत्यांभोवती कडे करून उभे आहेत. आणि आज ना उद्या जनता पक्षाच्या ध्येयधोरणांवर प्रभाव पाडण्याचा ते जरूर प्रयत्न करतील असे मला वाटते.

चंद्रशेखर : कॉंग्रेसमध्ये एक गट संपत्तीमधून निर्माण होणाऱ्या सत्तेला अवाजवी महत्त्व देत होता. राजकीय उदात्त विचारांबरोबर ज्यांचे कवडीचे संबंध नव्हते अशा मंडळींना केवळ पैशासाठी जवळ करण्यात आले आणि पैशाच्या बदल्यात तडजोडी केल्या गेल्या. जनता पक्षाबाबत यासाठी मी प्रयत्न करीन. मात्र उगाच फाजील दावे आताच करण्यात काहीएक अर्थ नाही. आताच्या वातावरणामध्ये या मंडळींवर ताबा ठेवणे सोपे आहे. पुढील गोष्टी अनुभवान्ती ठरतील. बघू काय होते ते.

प्रश्न : निवडणुका आल्या आहेत पैसे लागणारच. एकेकाळी तुम्ही असे म्हणत होतात की, देणगी म्हणून हजार रुपयांहून जास्त रक्कम आली तर तिला खुशाल काळा पैसा म्हणावे. आता असा काळा

पैसा आला तर, तो थोपवण्यासाठी तुम्ही काय कराल ?

चंद्रशेखर : काळ्या पैशाचे विष इतक्या खोलवर भिनले आहे की, त्याचा असा तडकाफडकी निचरा करणे केवळ अशक्य आहे. कंपनींच्या देणग्याबाबत मी आक्षेप घेतले. पण पैशाला वेगळ्या मार्गाने पाय फुटले आणि ज्याच्याबाबत संदेह निर्माण होईल, अशा अनेक मार्गांनी पैसे येतच राहिले. आता मात्र असे वाटते की; देणग्या देण्याबाबत व्यवसायिक कंपन्यांना मुभा असावी. त्यामुळे निदान दिल्या पैशाचे हिशेब तरी द्यावे लागतील. कोणत्या का मार्गाने होईना जे पक्षासाठी पैसे गोळा करू शकतात त्यांना पक्ष यंत्रणेमध्ये असाधारण महत्त्व पूर्वी दिले गेले आहे. पैसे गोळा करण्याबाबत प्रामाणिक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना महत्त्व देणे मी पसंत करीन.

प्रश्न : मोठे नेते आणि मंत्री वैभवशाली राहणीचे आणि संपत्तीचे जे हिणकस प्रदर्शन करतात त्याबाबत काही करता येणार नाही का ?

चंद्रशेखर : नियमाबाबतच्या बंधनामध्ये जखडून याबाबत फारसे काही करता येणार नाही असा माझा अनुभव आहे. वरिष्ठ नेत्यांनी याबाबत आदर्श घालून दिले पाहिजेत. असा इशारा मुरारजीभाईंनी दिला आहे ! आता इतरांनी त्याचे अनुकरण केले पाहिजे, परंतु हे प्रत्येक वेळी शक्य होत नाही. आता माझेच पहाना. भेटायला येणाऱ्यांची इतकी गर्दी उडालेली असते. की, घराबाहेर–तंबू शामियाने उभारावे लागले आहेत. मग मला सुचवण्यात आले आहे की, मोठ्या जागेत जा.

प्रश्न : मग या मोहाला तुम्ही बळी पडणार का ?

चंद्रशेखर : या विशिष्ट परिस्थितीमध्ये या विचाराला मोह असे म्हणता येणार नाही. मा जरी आहे येथेच राहिलो तरी, येणारांची काहीतरी सोय करावीच लागते. सध्या तरी तसेच केले आहे, आणि जागा बदलण्याचा माझा तरी विचार नाही.

प्रश्न : आयाराम–गयाराम प्रकरणी आपले मत काय आहे ? राजकीय पक्षबदलाचा प्रश्न कायदा करून सोडवता येईल काय ?

चंद्रशेखर : पक्ष बदलाला बंदी करणारा कायदा असावा असे मला जरूर वाटते. पण आणीबाणीनंतरच्या परिस्थितीचा मी वेगळा विचार करतो. कार्यकर्त्यांना, नेत्यांना, आपली मते निश्चित करण्याचे स्वातंत्र्य पुन्हा एकदा मिळाले पाहिजे असे मला वाटते. आणीबाणीच्या काळात जबर मुस्कटदाबी झाली. कॉंग्रेसमधील अनेक कार्यकर्ते पूर्णपणे गुदमरून गेले, होते... आता खुल्या वातावरणामध्ये पुन्हा एकदा मोकळेपणे विचार करण्याची संधी त्यांना दिली पाहिजे असे मला वाटते.

प्रश्न : एकाधिकारी सत्तेबाबत... प्रश्न तोडून मध्येच चंद्रशेखर म्हणतात–माझा त्याला पूर्ण विरोध होता, आहे, आणि राहिल !

## वर्गणीदारांस सूचना

१ : अंक न मिळाल्याची तक्रार अंक प्रसिद्ध झाल्यापासून ३ दिवस वाट पाहून करावी. अंक शिल्लक असल्यास दुसरा दिला किंवा पाठवला जातो.

२ : वर्गणी पाठविताना किंवा पत्रव्यवहार करताना नेहमी वर्गणीदार क्रमांकाचा उल्लेख करावा. अन्यथा पत्रोत्तरास विलंब अपरिहार्य आहे.

३ : तीन वर्षांची वर्गणी रु. १००/– आहे.

४ : रु. ३००/–ठेव ठेवल्यास व्याजाचे मोबदल्यात अंक विनामूल्य पाठविला जातो.

## इंदिरा गांधी .. भवितव्य

लंडन येथून प्रसिद्ध होणाऱ्या 'संडे टाईम्स'च्या वार्ताहाराने पाठवलेल्या वार्तापत्रामध्ये असे मत नोंदवले आहे की, संजय गांधी यांच्या विविध उद्योगांबाबत चौकशी करण्याचा अंतिम उद्देश–राजकीय आघाडीवरून इंदिरा गांधींना पूर्णपणे नामशेष करणे हाच आहे. आवश्यकता वाटली तर, इंदिरा गांधींवर भ्रष्टाचाराचे आरोप ठेवले जातील आणि ते सिद्ध झाले तर, त्यांना कदाचित तुरुंगवासही होईल. खासदार कन्वरलाल गुप्ता असे विश्वासाने म्हणतात की त्यांना पुन्हा एकदा न्यायालयासमोर उभे रहावे लागेल, आणि आता सुटका संभवणार नाही. खाजगी गप्पांमध्ये जनता पक्षाचे काही मंत्रीही असेच मत व्यक्त करतात असे लिहून हा वार्ताहार पुढे म्हणतो–आता बाई सर्वस्वी पराभूत आहेत. त्यांनी निवडणुका गमावल्या आहेत, लोकसभेमधील स्वतःची जागा गमावली आहे, पक्षाचे नेतृत्व गमावले आहे आणि व्यक्तिगत प्रतिष्ठाही गमावली आहे. परंतु... आज भारताचे नेतृत्व करणाऱ्या नेत्यांच्या तुलनेत बाई चक्क एका पिढीच्या अंतराने तरुण आहेत. चुका सुधारण्याची त्यांना भरपूर संधी आहे, केवळ जाहिररीत्या त्यांनी आपल्या मुलाबरोबर असलेले संबंध तोडले... तरीसुद्धा परिस्थितीमध्ये मोठा बदल होईल असे संडे टाईम्सच्या वार्ताहाराला वाटले. परंतु गाय वासराला सोडणे मुश्किल आहे असे मतही त्याने नोंदवले आहे.

□

# राजहंस प्रकाशन सूची

| | | | |
|---|---|---|---|
| १ | शिलंगणाचं सोनं | ब. मो. पुरंदरे | ३ – ५० |
| २ | शनवारवाड्यातील शमादान | ब. मो. पुरंदरे | ३ – ५० |
| ३ | पुरंदरच्या बुरुजावरून | ब. मो. पुरंदरे | ४ – ०० |
| ४ | पुरंदऱ्यांचा सरकारवाडा | ब. मो. पुरंदरे | ७ – ०० |
| ५ | फिडेल, चे आणि क्रांती | अरुण साधू | ७ – ०० |
| ६ | परसूच्या पशुकथा | वसंत सबनीस | २ – ०० |
| ७ | सहा साहसे | दा. सी. देसाई. | २ – ०० |
| ८ | पूर्णिया | अनिल अवचट | ६ – ०० |
| ९ | गुजरातेतील मराठी राजवट | वि. गो. खोबरेकर | ७ – ०० |
| १० | कोठे आणि कधीतरी | डॉ. सुधीर फडके | १० – ०० |
| ११ | रातराणी | विजय तेंडुलकर | १२ – ०० |
| १२ | आणि ड्रॅगन जागा झाला | अरुण साधू | १४ – ०० |
| १३ | एका पराभवाची कहाणी | अनंत भावे | १५ – ०० |
| १४ | श्रीग्रामायन | श्री. ग. माजगावकर | १५ – ०० |
| १५ | आनंदाच्या दाही दिशा | रवींद्र पिंगे | १० – ०० |
| १६ | नाझी भस्मासुराचा उदयास्त | वि. ग. कानिटकर | ४५ – ०० |
| १७ | पॅपिलॉन | रवींद्र गुर्जर | २५ – ०० |
| १८ | हैद्राबाद मुक्तिसंग्रामातील अज्ञात कथा | अशोक परळीकर | १२ – ०० |
| १९ | देवाघरचा पाऊस | रवींद्र पिंगे | १० – ०० |
| २० | मॅक्झिम गॉर्की | सुमती देवस्थळे | १० – ०० |
| २१ | लालकिल्ल्यातील अभियोगाची कहाणी | पु. ल. इनामदार | २० – ०० |

**आगामी**

| | |
|---|---|
| प्रतापगड आणि शिवदर्शन | ब. मो. पुरंदरे / श्री. ग. माजगावकर |
| पुरंदऱ्यांची दौलत | ब. मो. पुरंदरे |
| पुरंदऱ्यांची नौबत | ब. मो. पुरंदरे |
| सांगत्ये ऐका | हंसा वाडकर (ति. आ.) |
| संध्याकाळ | गजानन जागीरदार (दु. आ.) |
| शतपावली | रवींद्र पिंगे (दु. आ.) |
| टॉलस्टॉय - एक माणूस | सौ सुमती देवस्थळे (दु. आ.) |
| मी नेताजींना बघितलंय | अशोक शहाणे |

**राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०**

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

### २१।५।७७ ते २७।५।७७

**मेष : प्रगतीला उपकारक**

दुसरा रवी–गुरू, ही एकच गोष्ट तुमच्या प्रगतीला आकार द्यायला पुरेशी आहे. राहू सहावा आला आहे तो कोणत्याही क्षेत्रात विरोधकांना वरचढ होऊ देणार नाही. सुखस्थानात शनी अजून जरी मनाची स्थिती दोलायमान ठेवणार असला तरी, त्यामुळे वाईट परिणाम घडणार नाही. यावेळी अनेक क्षेत्रांत तुमच्या कर्तृत्वास चांगलाच वाव मिळेल. धंद्यात नवीन काहीतरी घडवू शकाल. नव्या योजना आणून प्रगतीचा मार्ग सुकर करू शकाल. आर्थिक बाजू ठीक राहील. पैसा कमी पडणार नाही. अनेक बाजूने पैसा मिळेल. मात्र तो बचतीत गुंतवणे आवश्यक आहे. नाही तर खर्चाचे नवे नवे मार्ग मोकळे होणार आहेत. नोकरीत सारे ठीक राहील. शुभ दिनांक २१, २६.

महिलांना : अंगभूत गुणांना वाव मिळेल.

विद्यार्थ्यांना : बुद्धीचा प्रभाव पडेल.

**वृषभ : आर्थिक प्रगती**

रवी राशीत आल्यापासून तुमचे सारे प्रयत्न प्रगतीकारक व यशाच्या दृष्टीने घडत आहे यांत शंका नाही. गुरू राशीत ही एक समर्थ घटना आहे. यावेळी यश व सामर्थ्याचा प्रत्यय आला नाही तरच नवल. तुम्ही कोणत्याही क्षेत्रात असा व कोणतेही काम करा यशाचा तुरा तुमच्या डोक्यावर उभारल्याखेरीज राहणार नाही. नावीन्य व आकर्षण यांची प्रचित्ती येईल. नोकरीची स्थिती काही वेळी समाधानकारक राहील. वरिष्ठांना तुमचे वारंवार साहाय्य लाभेल. बेकारांना समाधानकारक नोकरी मिळेल. जुणे येणे वसूल होईल. नोकरांचा प्रश्न सुटेल. शुभदिनांक २४, २७.

महिलांना : संसारात आनंददायक पर्वाची सुरुवात होईल.

विद्यार्थ्यांना : सारे मनासारखे होईल.

**मिथुन : थोडे जपून**

चौथा राहू, बारावा रवी व गुरू ही ग्रहरचना फार वाईट नसली तरी, ती असावी तेवढी अनुकूलदेखील नाही हे लक्षात ठेवा. ज्योतिष हे मार्गदर्शक असते. त्यामुळे सावध होता येते. वाईट ग्रह म्हणजे मन दुर्बळ होणे नव्हे व हातपाय गाळून बसणेदेखील नव्हे. सावध राहा व थोडे जपून कारभार करा असेच तुम्हाला ग्रहांचे सांगणे आहे. या आठवड्यात कोणताही महत्त्वाचा करारमदार करू नका. नोकरीत वरिष्ठांबरोबर मतभेद होणार नाही. याची काळजी घ्या. चुका होऊ देऊ नका तसेच हिशोबात दक्ष राहा. व्यापारी व उद्योग व्यावसायिकांनी खरेदी–विक्री संबंधाचे वायदे करताना काळजी घ्यावी. तब्येत साधारण ठीक राहील. शुभदिनांक २४, २५.

महिलांना : उपासना मार्गाने मन शांत ठेवा.

विद्यार्थ्यांना : अपेक्षित स्थित्यंतर घडेल.

**कर्क : नवे पर्व**

तुमच्या जीवनात नवे पर्व निर्माण करणारा हा आठवडा आहे. रवि–गुरू अकरावे, राहू तिसरा व शनी पहिला ही सारीच ग्रहरचना उत्साहवर्धक आहे. यश आणि प्रगतीचा मार्ग सुलभ होणार आहे. व्यवसाय व व्यापार सुखाच्या नव्या मार्गावर वेगाने धाव घेणार आहे. नोकरीत सर्व प्रकारच्या अडचणी दूर होऊन प्रगतीच्या मार्गातील अडथळे दूर होऊन हितकारक असे नवे पर्व सुरू होणार आहे. आजवर मनात जपून ठेवलेल्या इच्छा–अपेक्षा सफळ होणार आहेत. बेकारांची मनःस्थिती उल्हासाची राहावी असेच त्यांच्या बाबतीत घडणार आहे. पैशाची परिस्थिती समाधानकारक राहील. रेस व लॉटरी या मार्गाने नशीब उजळून निघाले तर आश्चर्य वाटू नये. शुभ दिनांक–२२, २५

महिलांना : मनात घर करून बसलेली काळजी दूर होईल.

विद्यार्थ्यांना : नव्या इच्छेप्रमाणे शिक्षणाची संधी मिळेल.

**सिंह : नोकरीत प्रगती**

शनीची साडेसाती असली तरीदेखील तुमची त्रासाची स्थिती आता बरीच कमी झाली आहे. बाराव्या शनीची उग्रतादेखील कमी झालेली आहे. दहावा गुरू हा अभूतपूर्व यशाची हमी असून आता तुम्ही जे हाती घ्याल त्यांत यश आणि सफलता तुमच्या हाती आल्याखेरीज राहाणार नाही. धंद्यातील अडचणी दूर होणार आहेत. शेती अगर जमिनीची स्थिती समाधानकारक राहणार आहे. व्यापारात प्रगतीचे नवे पर्व उदयाला येणार आहे. सार्वजनिक कार्यात प्रतिष्ठा वाढणार आहे. नोकरीत सारे गैरसमज दूर होऊन आजवर न मिळालेले लाभ दृष्टिपथात येणार आहेत. बेकारांना नोकरी मिळेल. अविवाहितांचे विवाह ठरतील. शुभ दिनांक–२३, २५.

महिलांना : नोकरीत साऱ्या अपेक्षा पुऱ्या होतील.

विद्यार्थ्यांना : आशादायक वातावरण राहील.

**कन्या : कटकटी कमी होतील**

कन्या राशीच्या व्यक्तींना जरी अधूनमधून अनपेक्षित यश मिळत असले तरी, कष्ट व कटकटी यांच्या दिव्यातून त्यांना जावेच लागते. राशीत राहू आला आहे. तो काही अपेक्षा ध्यानीमनी नसतानाही पुऱ्या करील तर काही वेळा त्रास देईल. नोकरीत तुमच्या कष्टाचे चीज होणार असले तरी वरिष्ठांबरोबर मतभेद होऊ देऊ नका. उगीचच मानसिक त्रास होणार आहे. पण भाग्यस्थानी गुरू नि लाभस्थानी शनी हे दोन ग्रह तुमचा सर्व प्रकारचा त्रास व सर्व अडचणी दूर करून अपेक्षित यश पदरात टाकतील. आर्थिक परिस्थिती साधारण चांगली राहील. जुने येणे वसूल होणे जरा कठीणच आहे. तब्येत चांगली राहील. शुभ दिनांक-२२, २५.

महिलांना : आपुलकीची माणसे भेटतील.

विद्यार्थ्यांना : स्पर्धेत यश मिळेल.

**तूळ : व्यवहार जपून करा.**

आठवा गुरू व बारावा राहू ही ग्रहस्थिती काही अत्युत्तम म्हणता येणार नाही. आठवा गुरू तुम्हास काही अनपेक्षित लाभ पदरात टाकील. न ठरवलेला प्रवास–प्रामुख्याने परदेश पर्यटन होणार आहे. जमीन घ्यायची तुमची इच्छा असेल तर पुरी होईल.

परिस्थितीप्रमाणे पाहून खरेदी होईल. नवे वाहन मिळेल. रेस अगर लॉटरी या साधनात तुम्ही भाग्यवान ठराल. त्याचप्रमाणे ग्रंथ प्रकाशन बक्षीस असेही काही तरी घडू शकेल. मात्र बाराव्या राहूपासून ध्यानीमनी नसलेला खर्च व किरकोळ त्रास होणार आहे. नोकरीत स्थलांतर अगर स्थित्यंतर अपेक्षित आहे. कामाचे चीज, त्याचे समाधान मिळणे जरा कठीणच. कलाक्षेत्रात टीका सहन करावी लागणार आहे. नव्या कलावंतांनी भावनावश बनू नये. शुभ दिनांक २४, २५.

**महिलांना :** कलाक्षेत्रात प्रसिद्धीचा प्रकाश दिसेल.

**विद्यार्थ्यांना :** शैक्षणिक विषयात बदल करा.

## वृश्चिक : अधिकार वाढतील.

अंतरिक्षातील सामर्थ्यशाली ग्रहांचे सामर्थ्य पाठीशी उभे असल्यानंतर जे घडणार नाही असे वाटते. ते घडते व जे त्रासदायक होणार नाही असे वाटते तेच लाभदायक होते. तुमच्यावर सध्या अनेक समर्थ व उच्च ग्रहांची कृपा आहे. त्यामुळे असेच अनपेक्षित फळ पदरात पडणार आहे. तुम्ही कोणत्याही क्षेत्रात नोकरीस असा तुमचे अधिकार वाढणार आहेत. प्रामुख्याने तुम्ही सरकारी नोकरीत-पोलिस खाते, रेव्हेन्यू खाते, शेती खाते, अगर बांधकाम खाते यांत काम करीत असाल तर, तुम्ही खूप मोठे होणार आहात. बेकारांना आता कोणताच त्रास नाही. त्यांना नोकरी मिळेल. व्यापारातील सुधारणा बँकेकडून कर्ज मिळवण्याच्या योजना सफल होतील. अविवाहितांचे विवाह पार पडतील. संसारात आनंद राहील. शुभ दिनांक २४, २६.

**महिलांना :** संसारात सारे काही सुखकारक घडणार आहे.

**विद्यार्थ्यांना :** बुद्धीच्या प्रभावाने लोक चकित होतील.

## धनु : अनुकूलता राहील.

राहू वाईट असला तरी, त्याचे स्थानाचे महत्त्व कमी होत नाही. त्यामुळे दहावा राहू तुमच्याबाबतीत काही तरी चांगले केल्याशिवाय राहणार नाही याची खात्री बाळगा. प्रामुख्याने नोकरी व धंदा या दोन्ही क्षेत्रात काहीसे हितकारक व अनुकूल असे स्थित्यंतर घडणार आहे. उत्पादनात वाढ व अधिकारात वाढ असे त्यांचे स्वरूप असेल. खूप दिवस मनात बाळगलेले स्वप्न साकार होण्याची शक्यता आहे. चालू धंद्यात अनुकूल बदल अगर बदली असेही होऊ शकेल. धंद्यात आजवर फसलेले धोरण यावेळी सफल होईल. अनेकांचे सहकार्य मिळेल. सार्वजनिक कामात प्रतिष्ठा मिळेल. महत्त्वाचा असा एखादा प्रवास घडू शकेल. शुभ दिनांक २३, २७.

**महिलांना :** नोकरीत सहकार्य व आपुलकी मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** अपेक्षापूर्तीचे समाधान मिळेल.

## मकर : राहू अनुकूल

मकर राशीच्या व्यक्तींना आजचे एकंदर ग्रहमान असावे तेवढे अनुकूल नाही. डावपेच खेळून इतरांना स्वतःच्या हातात ठेवण्याची बुद्धी गेले काही दिवस सफल होत नाही, याची तुम्हाला जाणीव असेलच. शनीचे तुम्हाला अजून साहाय्य आहे म्हणूनच तुमचे डावपेच थोडे तरी यशस्वी होत आहेत. पण आता त्यावर फारसे विसंबून राहण्यात अर्थ नाही. पाचवा गुरू व भाग्यस्थानी असलेला राहू थोडेफार उपकारक आहेत. विशेषतः राहूमुळे तुमचे आर्थिक जीवन सुधारेल. उद्योगात बदल करता येईल. विसकटलेली घडी नीट बसवता येईल. धंद्यासाठी आर्थिक साहाय्य मिळवण्याचे प्रयत्नात यश येईल. नोकरीत विरोधक वाढणार आहेत. काही जुन्या भानगडी बाहेर येण्याची शक्यता आहे. शुभ दिनांक २१, २३.

**महिलांना :** सर्व प्रकारची काळजी दूर होईल.

**विद्यार्थ्यांना :** शिक्षणाची प्रगती समाधानकारक होईल.

## कुंभ : आर्थिक स्वास्थ्य

शनीप्रधान अशी तुमची रास आहे. सध्या दुसरा मंगळ, चौथा रवी–गुरू व सहावा शनी अशी ग्रहरचना आहे. ती फारशी समाधानकारक आहे असे म्हणता येणे कठीणच. तरी पण अति विचारांच्या आहारी जाऊन मनःस्वास्थ्य बिघडवण्यात काही अर्थ नाही. गुरू शत्रूंचा विरोध मोडून पाडणार आहे, हे यावेळेचे वैशिष्ट्य आहे. राजकारणातील तुमचे स्थान पुन्हा प्रस्थापित होण्याची शक्यता आहे. बदलता जमाना लक्षांत घेऊन तुम्ही जर वागलात, तर अनेक प्रकारे तुमचे काम होईल. नोकरीची स्थिती समाधानकारक राहील. तुमच्या मागण्याच्या बाबतीत वरिष्ठांची प्रतिक्रिया एकंदरीत अनुकूल राहील. मात्र यावेळी नोकरीत बदल करू नका. बेकारांना काही तरी तात्पुरते काम मिळेल. प्रवासाचा बेत तडीस जाईल. शुभ दिनांक २२, २५.

**महिलांना :** लॉटरीचे तिकीट घ्यायला अनुकूलता आहे.

**विद्यार्थ्यांना :** स्वावलंबनाचा आनंद मिळेल.

## मीन : कर्तृत्वाला संधी


राशीत असलेल्या मंगळामुळे तुमचे सामर्थ्य वाढलेले आहे. तुमच्या व्यक्तिमत्वाला उठाव मिळालेला आहे. त्यामुळे यावेळी प्रत्येक आघाडीवर तुमची सरशी होणार आहे. तुमच्या शब्दाला फार मोठे वजन प्राप्त होणार आहे. तिसरा गुरू ही तुमच्या कर्तृत्वाची पताका उंचावणार आहे. अंगी आजवर गुप्त राहिलेले गुण प्रकट होतील. आत्मसामर्थ्य प्रकट होईल. साक्षात्कारी सामर्थ्य असे ज्याचे वर्णन करता येईल असे काहीतरी तुमच्या ठिकाणी प्रकट होईल. उपासना सफल होईल. दैवी शक्तीचा संचार होईल. एकूण हा आठवडा बराच अनुकूल आहे. नोकरीत गेलेले हक्क पुन्हा मिळतील. अधिकार वाढेल. प्रमोशन–बढती असे काही तरी होऊ शकेल. सर्व क्षेत्रांत पुढे पाऊल पडेल. लेखकांची स्फूर्ती जागृत होईल. अपुरे राहिलेले लेखन पुरे होईल. विवाहाचा बेत जमून जाईल. संसारात आनंदी घटना घडेल. शुभ दिनांक २४, २६.

**महिलांना :** मन शांत व समाधानी राहील. नोकरीत वाव मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** कलावंतांना वाव मिळेल. □

डोले पीक सर्वदूरऽऽ..
सुख समृद्धी भरपूर..

ऐका हो ऐका . . . ऽऽऽ . . .
पिकं भरघोस होणार . . .
अन् डोलू लागणार . . .
व्हय, व्हय - आणि आपणही नाचणार
पण कवा ?
पिकांना लागणारी खते भरपूर
प्रमाणात मिळतील तवा.
खते - मग ती जमिनीतून देण्याची असोत
अथवा पिकावर फवारण्याची असोत - भरपूर
प्रमाणात द्या. त्या साठी जर आर्थिक
सहाय्याची जरुरी असेल तर आमच्या
जवळच्या शाखेस भेट द्या.



बँक ऑफ महाराष्ट्र
११७७, बुधवार पेठ, पुणे ४११००२.

*जेथे अर्थसहाय्याची खरी जरूरी। तेथे 'बँक ऑफ महाराष्ट्र' लावी हजेरी।*

PRAJAKTA